# १

# लोकसंख्याशास्त्र स्वरूप, व्याप्ती आणि महत्त्व

# DEMOGRAPH NATURE SCOPE AND SIGNIFICANCE

**घटक रचनाः**


१.१ अभ्यासाचा उद्देश
१.२ प्रस्तावना
१.३ लोकसंख्याशास्त्राचा अर्थ
१.४ लोकसंख्याशास्त्राच्या व्याख्या
१.५ लोकसंख्याशास्त्राची व्याप्ती
१.६ लोकसंख्याशास्त्रीय सिद्धांत
१.७ लोकसंख्याशास्त्राचे स्वरूप
१.८ लोकसंख्याशास्त्राचे महत्त्व
१.९ सारांश
१.१० सराव प्रश्न
१.११ संदर्भ ग्रंथ


## १.१ अभ्यासाचा उद्देश

१. लोकसंख्याशास्त्राचा अर्थासह व्याख्यांचे आकलन करुन घेणे.
२. लोकसंख्याशास्त्राच्या व्यापकता समजून सांगणे.
३. लोकसंख्याशास्त्रा संबंधी सिद्धांताचे ज्ञान करुन देणे.
४. लोकसंख्याशास्त्राच्या स्वरूपाची ओळख करुन देणे.
५. आधुनिक काळात लोकसंख्याशास्त्राचा अभ्यासाचे महत्त्वाची चर्चा करणे.

## १.२ प्रस्तावना

लोकसंख्या वाढीची समस्या संपूर्ण जगाला भेडसावत आहे, म्हणून अशा अभ्यासाची गरज भासू लागली आहे. समाजातील समस्या, आर्थिक नियोजन, आरोग्य सुविधांचा पुरवठा, नागरी सुविधा पुरवठा वगैरे बाबींसाठी लोकसंख्याशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा होताना दिसत आहे. भारतामध्ये, दारिद्र निमूर्लन, रोजगार निर्मिती, स्त्री-पुरुष विषम प्रमाण वगैरे घटकांवर

उपाय शोधण्यासाठी लोकसंख्याशास्त्राचा अभ्यास केला जात आहे. देशाची जनगणना करुन लोकसंख्याची योग्य माहिती मिळवली जात असते. यासाठी लोकसंख्याशास्त्रीय नियम, कसोट्या व सिद्धांताचा वापर करुन सर्वेक्षण केले जात असते. जमा झालेल्या माहितीचे लोकसंख्याशास्त्रीय तत्त्वांनुसार विश्लेषण केले जात असते. आधुनिक काळात वाढत्या लोकसंख्याचा परिणाम पर्यावरणावर पण होताना दिसतो. म्हणून लोकसंख्याशास्त्रीय स्वरूपाचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे.

## १.३ लोकसंख्याशास्त्राचा अर्थ

लोकसंख्याशास्त्र हा मराठी शब्द Demography या इंग्रजी शब्दाचा भाषांतरीत आहे. तर Demography हा शब्द मुळचा ग्रीक भाषेतील आहे. 'Demos' आणि 'Graphy' या शब्दांच्या संक्रमणातून बनलेला आहे. याचा अर्थ लोकांचा अभ्यास असा आहे. म्हणजेच लोकसंख्येचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे 'लोकसंख्याशास्त्र' होय. ही संकल्पना सर्वप्रथम १८५५ साली फ्रेंच विचारवंत अचीले ऑर्यलार्ड यांनी मांडली होती. या शास्त्रात लोकसंख्येच्या आकारमानात बदल घडवून आणणाऱ्या चलांचे विश्लेषण करत असते. जनन, मर्त्यता व स्थलांतर या सारख्या मुलभूत चलांचा व वैशिष्ट्यांचा लोकसंख्या शास्त्रात अभ्यास केला जात असतो. व्यापक दृष्टिकोनातून या शास्त्रात संख्यात्मक व गुणात्मक बाबींचा अभ्यास केला जातो.

लोकसंख्या हा सजीव घटक असल्यामुळे वातावरण व वेळेनुसार विशिष्ट देश, प्रदेश यांच्यानुसार लोकसंख्येत बदल घडून आलेला आपल्याला दिसून येतो. लोकसंख्येत बदल होणे, वाढ होणे व घट होणे इत्यादी नैसर्गिक प्रक्रिया आहेत. जनता म्हणजेच जन्माचे प्रमाण तर मर्त्यता म्हणजेच मृत्यूचे प्रमाण होय. या क्रिया निसर्गचक्राप्रमाणे घडत असतात. लोकसंख्या हा घटक एखाद्या देशाच्या संदर्भात महत्त्वाचा असतो. कारण त्या विशिष्ट देशाची प्रगती व विकास यांच्याशी लोकसंख्येचा जवळचा संबंध असतो. लोकसंख्या हा घटक सर्वच पैलूंवर प्रभाव टाकत असल्याने या घटकांचा स्वतंत्र्य शास्त्र म्हणून अभ्यास करणे महत्त्वाचे वाटू लागले आहे. म्हणून जगात लोकसंख्याशास्त्राचा उद्देशपूर्ण उदय झाला आहे.

सर्व प्रथम इंग्लंड मध्ये लोकसंख्याशास्त्रास १७ व्या शतकात एक सामाजिकशास्त्र म्हणून मान्यता मिळाली होती. पुढे जर्मन, फ्रान्स, अमेरिका वगैरे इतर युरोपीय राष्ट्रातही लोकसंख्या शास्त्राच्या अभ्यासावर भर देण्यात येऊ लागला आहे. Demography या ग्रीक भाषेत जन्माला आलेला शब्द संपूर्ण जगाने स्विकार केला आहे. Demos या शब्दाचा अर्थ लोक किंवा व्यक्ती असा होतो तर Graphy या शब्दाचा अर्थ माहिती मिळवणे असा होतो. यामुळे लोकसंख्याशास्त्र हे लोकसमुहांचा शास्त्रीय अभ्यास करणारे विज्ञान म्हणून विश्वात स्विकारले आहे. लोकसंख्या शास्त्राचे लक्ष महत्त्वाच्या तीन घटकांवर केंद्रीत असतो.

अ) लोकसंख्येतील बदल - लोकसंख्येतील घट व वाढ
ब) लोकसंख्येची रचना वैशिष्ट्ये
क) लोकसंख्येचे आकारमान व विभाजन

munotes.in

या तीन घटका शिवाय लोकसंख्या शिक्षण, लोकसंख्या परिवर्तन, लोकसंख्या विकास वगैरे अभ्यास केला जात असतो. आधुनिककरण, देशाची जनगणना ही लोकसंख्याशास्त्रा प्रमाणे केली जात असते. यामुळे आरोग्य, शिक्षण, रोजगार, इतर नागरी सुविधांचा पुरवठ्यांचा आढावा घेतला जात असतो. भारतामध्ये स्त्री-पुरुष विषम प्रमाणांचा अभ्यास हा लोकसंख्या शास्त्राच्या कसोटीवर केला जात असतो.

## १.४ लोकसंख्याशास्त्राच्या व्याख्या (DEFINITION OF DEMOGRAPHY)

लोकसंख्याशास्त्रा संबंधी विविध अभ्यासकांनी दिलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

१. अर्थशास्त्राची ऑक्सफर्ड कोश, 'लोकसंख्याशास्त्र म्हणजे मानवी लोकसंख्येचे वैशिष्टपूर्ण अभ्यास होय.'

२. डब्लु. सी. वर्क्रले - व्यक्तीच्या वर्तुणुकीशी लोकसंख्याशास्त्राचा संबंध नसतो. पण फक्त ती लोकांच्या एकुण किंवा त्यांच्या घटकांशी पण संबंधीत असते. मानवी लोकसंख्येच्या संबंधीत शब्दचित्रालाच लोकसंख्याशास्त्र म्हणून ओळखले जाते.

३. थॉमसन व लेविस, "लोकसंख्याशास्त्राच्या अभ्यासकाला लोकसंख्यांचे आकारमान, रचना, विभाजन तसेच काळानुसार होणारे बदल, या बदलांची कारणे यात रस असतो. या सर्व बाबी मानवी कल्याणाशी संबंधित आहेत."

४. प्रा. सर्जेराव एन. बोराडे, "लोकसंख्याशास्त्र म्हणजे केवळ लोकसंख्येची संख्या आणि आकारमान मर्यादित अभ्यास न करता उपलब्ध लोकसंख्येचा अभ्यास साधनसंपत्तीशी मेळ घालणारा अभ्यास होय."

५. फ्रँक लॉरीमेर, "लोकसंख्याशास्त्रात लोकसंख्येचा संख्यात्मक व गुणात्मक बाजुने अभ्यास केला जातो."

६. डॉनॉल्ड जे. बोगे - लोकसंख्याशास्त्र हा गणितीय संख्याशास्त्री अभ्यास आहे यामध्ये मानवी लोकसंख्या आकारमान रचना व अवकाशित विभाग या अंगाचा व त्यात झालेले बदलांचा जनन, मृत्यू, विवाह, स्थलांतर व सामाजिक गतिशिलता या प्रक्रियांद्वारे अभ्यास केला जातो. यात प्रत्येक प्रक्रियेतील बदल व त्यांचे एकत्रित परिणामांचे वर्णनात्मक व तुलनात्मक विश्लेषण करुन अभ्यास केला जातो. याचे दुरगामी ध्येय म्हणजे सिद्धांत विकास करणे घटनांच्या नकाशाचे स्पष्टीकरण करुन तुलनात्मक अभ्यास होईल.

७. पिटर आर. कॉक्स, लोकसंख्या मानवी लोकसंख्यांचा संख्यात्मक पद्धतीने आकार वाढ आणि घट यांचा संख्यात्मक बदलाचा जीवनमान, जन्म किंवा मृत्यू विशिष्ट क्षेत्रात जनन, मर्त्यता, स्थलांतर, विवाह इत्यादी कार्यात्मक संबंधाचा अभ्यास केला जातो.

८. फिलीप एम. हॉसेर, "लोकसंख्याशास्त्र मध्ये आकार, क्षेत्रीय विभाग आणि तुलना लोकसंख्या परिवर्तन, त्यांच्या घटकात्मक बदल ज्याचा आधारे जनन, मृर्त्यता, स्थलांतर आणि सामाजिक दर्जात्मक गतिशीलता यांचा अभ्यास केला जातो."

वरील विविध व्याख्यांच्या अभ्यासावरुन लोकसंख्याशास्त्र ही संकल्पना अधिक स्पष्ट होईल.

## १.५ लोकसंख्याशास्त्राची व्याप्ती

**१) जनन :** एखाद्या स्त्रीने केलेले प्रत्यक्ष प्रजोत्पादन म्हणजे 'जनन' होय किंवा स्त्रीला प्रत्यक्षात झालेल्या अपत्याचा जन्म म्हणजे जनन होय. जन्मदरातील वाढीमुळे लोकसंख्येत वाढ होते. जननावर जीवशास्त्रीय, शरीरशास्त्रीय, लोकसंख्याशास्त्रीय सामाजिक-आर्थिक - राजकीय आणि प्राकृतिक घटकांचा परिणाम होत असतो. याचा अभ्यास लोकसंख्याशास्त्रात केला जातो.

**२) मर्त्यता :** जनन व मर्त्यता या जीवशास्त्रीय घटना आहेत. जननामुळे आयूष्याची सुरुवात होते तर मर्त्यतेमुळे आयूष्याचा अखेर होतो. व्यक्तीच्या जन्मानंतर व्यक्तीच्या जिवंतपणाची सर्व लक्षणे नष्ट झाली तर त्या घटनेला 'मृत्यू' असे म्हणतात. लोकसंख्येच्या अभ्यासात लोकसंख्येतील गतिमानता किंवा होणारा बदल हा जन्म आणि मृत्यू या घटनेवर अवलंबून असतो. लोकसंख्या वाढ ही केवळ मृत्यूच्या प्रमाणात झालेली घट याच कारणामुळे जास्त झालेली आहे.

'मृत्यू' या घटनेचा अभ्यास करताना मृत व्यक्तीचे वय, लिंग, वैवाहिक जीवन त्याचबरोबर मृत्यूचा दिनांक, वेळ, ठिकाण व कारण इत्यादी घटकांचा विचार करावा लागतो. या सर्व बाबींचा अभ्यास लोकसंख्याशास्त्रात केला जातो.

**३) स्थलांतर :** विशिष्ट कालावधीत एका भौगोलिक किंवा राजकीय विभागातून दूसऱ्या आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय विभागात जाऊन वास्तव्य करणे म्हणजे स्थलांतर होय. यामुळे लोकसंख्येत बदल होतो. म्हणजे स्थलांतर झालेल्या ठिकाणी लोकसंख्या एकदम वाढते किंवा ज्या ठिकाणावरुन स्थलांतर होते त्या ठिकाणी लोकसंख्या एकदम कमी होते. हे स्थलांतर का घडते याची कारणमीमांसा व स्थलांतरामुळे होणाऱ्या परिणामाचाही अभ्यास लोकसंख्याशास्त्रात केला जातो.

**४) लोकसंख्येचे आकारमान :** विशिष्ट प्रदेशांतर्गत जन्म-मृत्यू व स्थलांतर प्रमाणाच्या आधारे लोकसंख्येचे आकारमान लोकसंख्याशास्त्राच्या आधारे माहित करुन घेता येते.

**५) लोकसंख्येची रचना :** लोकसंख्येच्या रचनेचा अभ्यास करताना लोकसंख्येच्या वयोरचनेचा अभ्यास लोकसंख्याशास्त्रात केला जातो. लोकसंख्येचा वयोरचनेवरुन कार्यकारी लोकसंख्येची कल्पना येते. अवलंबित लोकसंख्येची माहिती होते. अवलंबून भार लक्षात येतो. विवाह प्रमाण व जन्मदर यांवरुन संभाव्य लोकसंख्यावाढीचा वेग निश्चित करता येतो. अशा सर्व बाबींचा अभ्यास लोकसंख्याशास्त्रात केला जातो.

**६) लोकसंख्येचे वितरण :** लोकसंख्येचे वितरण म्हणजे देशाच्या कोणत्या भागात किती लोक राहतात ते पाहणे होय. भारतात लोकसंख्येचे वितरण विषय आहे. लोकसंख्येची दाटी किंवा घनता म्हणजे प्राकृतिक आर्थिक, सामाजिक व ऐतिहासिक घटकांचे प्रतिबिंब असते.

लोकसंख्याशास्त्रामध्ये लोकसंख्येचे वितरण विषम का होते याबाबत सखोल अभ्यास केला जातो.

**७) लोकसंख्या धोरण :** शासनाने निर्धारित केलेली लोकसंख्येची उद्दिष्टे व या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अवलंबिलेल्या विविध उपाययोजना म्हणजे लोकसंख्या धोरण होय. अविकसित देशांत अनियंत्रिपणे लोकसंख्या वाढत आहे. यासाठी रचनात्मक असे लोकसंख्या नियंत्रण, नियोजन व धोरण आवश्यक बनले आहे. देशातील अमर्याद लोकसंख्यावाढ जोपर्यंत थांबविली जात नाही तोपर्यंत देशातील विकासात अडथळे निर्माण होणार या सर्व बाबींचा अभ्यास लोकसंख्याशास्त्रात केला जातो.

सर्वसामान्यपणे मानवी नवजात बालक / अर्भक जन्मास 'जनन' असे म्हणतात, तर जीवित अर्भकास जन्म देणाऱ्या स्त्रीचा शरीरशास्त्रीय क्षमतेला 'जननक्षमता' असे म्हणतात, लोकसंख्यात्मक दृष्टिकोनातून 'जनन' हा घटक अत्यंत महत्त्वाचा घटक समजला जातो. कारण लोकसंख्येची वाढ याच घटकावर अवलंबून असते. समाजाचे स्थायित्व टिकवून ठेवण्यासाठी जनन ही प्रक्रिया सातत्याने चालू राहणे गरजेचे असते. जनन व वंश जननदर हे घटकांमुळे नियंत्रित होते. जननदर हे प्रकार महत्त्वाचे आहेत.

प्रजननत्व अभावा जनन म्हणजे प्रत्यक्षात किती अपत्यांचा जन्म झाला ही आकडेवारी होय तर जननक्षमता म्हणजे जिवंत अपत्याचा जन्म देण्याची क्षमता होय. जनन म्हणजे एखाद्या स्त्रीने अथवा स्त्रियांच्या समूहाने केलेले प्रत्यक्ष प्रजोत्पादन होय. या घटनेला जैविक व भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान आहे. जनन हे वंश व जननदर या घटकांमुळे नियंत्रित होते. वयात येण्याचा काळ, अपत्यक्षमता, स्त्रियांचा जननक्षम काळ बंध्यत्व हे जैविक घटकांवर आधारित असते.

**जननमापनाची विविध परिमाणे :**

जनन मोजण्याचे सामान्य परिणाम म्हणजे पाच वर्षाखालील मूले व प्रजननक्षम स्त्रिया यांचे गुणोत्तर जननविषयक माहिती (आकडेवारी) प्रामुख्याने नोंदणी पद्धतीने मिळालेल्या संख्येचा उपयोग करुन मिळविली जाते. या पद्धतीने एका वर्षातील जननसंख्या प्राप्त होते. यावरुन निश्चित केलेल्या जननमापनांच्या परिमाणास कालदर (Period Rates) असे म्हणतात.

**१) ढोबळ किंवा ठोक जन्मदर (Crude Birth Rate) :**

हे जननमापनाचे सर्वात सोपे व प्रचलित परिणाम आहे. यामूळे एखाद्या समाजात दर हजारी किती जन्म होतात हे कळण्यास मदत होते. तसेच ढोबळ मृत्यूदराशी तुलना करता येते. कारण दोन्ही एकाच लोकसंख्येच्या पायावर आधारित असतात.

ढोबळ जन्मदर म्हणजे विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट वर्गातील एक हजार लोकांमागे जन्मलेल्या अर्भकांची संख्या यांचा उपयोग करुन जननामूळे लोकसंख्या वाढीवर काय परिणाम होतो ते अभ्यासता येते. ढोबळ जन्मदर पुढील सूत्राने काढतात.

ढोबळ जन्मदर काढण्याचे सूत्र :

$$\text{ढोबळ जन्मदर} = \frac{\text{एका वर्षात जन्म झालेल्या अर्भकांची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १०००$$

$$\text{Crude Birth Rate} = \frac{B}{P} \times K$$

येथे,

B – एका वर्षात जन्मलेल्या अर्भकांची संख्या

## १.६ लोकसंख्याशास्त्रीय सिद्धांत

**अ) माल्थसचा सिद्धांत :**

थॉमस रॉबर्ट माल्थस (१७६६-१८३४) यांचे शिक्षण केंम्ब्रीज विद्यापीठात झाले. इतिहास आणि राजकीय अर्थशास्त्राचे शिक्षक म्हणून कार्य केले. राष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे लिखाण फायद्याचे होते. तेव्हा चर्च आणि गुलागिरी या दोन घटकाबद्दल विवेचनात्मक लिखाण केले होते. माल्थस यांनी असे प्रतिपादन केले की, जगातील लोकसंख्या जलद गतीने वाढत आहे पण अन्न धान्याची वाढ गणितीय पद्धतीने वाढत आहे. (उदा. १,२,३,४...) पण लोकसंख्या ही भूमितीय पद्धतीने वाढत आहे. (उदा. १,२,४,१६.....) त्यांच्या विश्लेषणात लोकसंख्यावाढ आणि अन्न धान्य पुरवठ्यातील पुरकाला अधोरेखित केले होते. जर हे असेच चालू राहिले तर भविष्यात जगात अन्नधान्याचा तुटवडा होऊ शकेल म्हणून लोकसंख्या नियंत्रण करणे आवश्यक आहे असा सल्ला दिला होता. अन्यथा हे फरक वाढत जाईल यावर उपाय म्हणजे जन्मदर नियंत्रण हाच उपाय आहे. पण धर्मव्यवस्थेला हे मान्य नव्हते. यावर उपाय म्हणून विवाहाचे वय वाढवले तसेच विवाहित जोडप्याने निर्णय घ्यावा किती बालकांना जन्म देणे योग्य आहे नाहीतर जगाला उपासमारी, गरिबी आणि दूरव्यस्थांना सामारे जावे लागेल असा इशारा माल्थस यांनी दिला होता.

**माल्थसच्या सिद्धांतावरील टिका :**

१) माल्थस यांनी लोकसंख्या भूमितीय पद्धतीने वाढेल विश्वास नव्हता. अनेकांचे असे मत होते की माल्थस वैफल्यग्रंथ आहेत म्हणून असे विधान करतात. अनेकांचे मते लोकसंख्या ही नैसर्गिक आहे याला आपण थांबवू शकत नाहीत. माल्थसच्या सिद्धांत प्रमाणे होत नाही.

२) माल्थसच्या विचारानुसार अन्न उत्पादन गणिती दराने वाढते तर लोकसंख्या भूमितीय पद्धतीने वाढते यामुळे दोघांचा मेळ घालणे कठिण जाईल. यासाठी नवीन अन्न उत्पादन पद्धतीचा वापर केला जातो. अनेक शास्त्रज्ञ अन्न उत्पादन करुन अन्न पुरवठा करतात. आज हरितक्रांती होऊन सर्व चित्र बदलले जात आहे.

३) माल्थस यांच्या विचारानुसार गरीब लोकांनी विवाह करु नये का? म्हणजे लोकसंख्या वाढणार नाही. त्यापेक्षा गरीबी निमुर्लनासाठी दारिद्र्य दुर करणारे उपाय शोधले जात आहेत. यामुळे श्रीमंत हे श्रीमंत आणि गरीब राहतील. माल्थस यांचे विश्लेषणातच दोष आहेत.

४) माल्थस यांनी लोकसंख्या आणि राष्ट्रीय अन्न उत्पन्न संबंध सांगितले आहे. राज्य राष्ट्राची लोकसंख्या वाढीचा आंतरराष्ट्रीय बाजारात फायद्याचे असते कारण अधिक लोक अधिक उत्पादन करतील हा राष्ट्राचा फायदा असतो हे माल्थस विसरलेले दिसतात. वसहात काळात असे फायदे झाले होते.

५) माल्थस यांचे लोकसंख्या नियंत्रचा सल्ला अनैसर्गिक आहे. शहरी व ग्रामीण समाजाचा विचार केल्यास शहरी उत्पादन वाढत आहे. ग्रामीण क्षेत्रात विकास होत नाही याला जबाबदार लोकसंख्या प्रमाण आहे असे अनेक शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे.

६) माल्थस यांचा सिद्धांत केवळ कागदावर आहे. प्रत्यक्ष व्यवहारात कुचकामी आहे. गणितीय व भूमितीय पद्धती सिद्धांतीक आहेत. व्यवहारात तंतोतंत जुळतील याची शक्यता नसते.

७) माल्थस यांना वेस्टन चर्चील, हेन्री विलार्ड आणि इतर अनेकांनी विरोध केला. लोकसंख्या प्रमाण हे आपोआप वाढत असते. भूमितीय सुत्रात मांडणे चुकीचे आहे असे आक्षेप घेतला होता.

विविध अभ्यासकांनी माल्थस यांच्या ह्या सिद्धांतावर आक्षेप घेतले असले तरीही हा सिद्धांत जगात मान्यता प्राप्त आहे.

**ब) मार्क्सचा लोकसंख्या सिद्धांत :**

कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) हे जर्मन सामाजिक विचारवंत होते. यांनी साम्यवादी विचाराची मांडणी केली आहे. औद्योगिक काळातील जलद उत्पादन पद्धतीमध्ये सामान्य कामगारांचे शोषण होऊन नवे असे मत मार्क्स यांचे होते. भांडवलवादी व्यवस्था संपवुन साम्यवादी समाजव्यवस्था निर्माण व्हावी असे त्यांचे विचार होते. मार्क्स यांच्या मते लोकसंख्या वाढ आणि भांडवलशाही व्यवस्थेचा संबंध आहे. परंतु दोघे ही वेगवेगळे आहेत. दारिद्र आणि बेरोजगारी हे लोकसंख्या वाढीला जबाबदार नाहीत. पण भांडवलशाही व्यवस्था रोजगार पुरवठा करण्यास असमर्थ ठरतात म्हणून लोकसंख्या वाढ होत असते. समाजातील ठराविक लोकांच्या हातात संपत्ती एकवटलेली असते. तेच लोक या समस्येस जबाबदार असतात.

१) मार्क्सच्या मते जगातील भौतिक राष्ट्रात लोकसंख्या वाढत आहे. त्यास भांडवली राज्यव्यवस्था जबाबदार आहे. नवीन यंत्राच्या साहाय्याने अधिक उत्पादन करुन अतिरिक्त मुल्य कमवुन बेरोजगारी निर्माण करतात. परंतू कामगारांच्या रोजगार दरात वाढ होत नाही. यामुळे अशा कामगारांच्या कुटुंबात दारिद्र निर्माण होते. खरे तर अशा लोकसंख्यावाढीत अतिरिक्त लोकसंख्या ही चुकीच्या राजकीय धोरणामुळे होत आहे.

२) कार्ल मार्क्स यांनी माल्थसच्या सिद्धांताला नाकारले होते. कार्ल मार्क्सच्या मते लोकसंख्या वाढ ही निसर्ग किंवा वैश्विक नाही. लोकसंख्या सिद्धांत भांडवलशाही उत्पादन पद्धतीत जबाबदार मानतो आहे. त्यांचा साम्यवादी जाहिरनामा मुलभूत समाजवादी समाजाला प्रस्तूत करतो. कुटुंबात स्त्रीला स्वातंत्र्यांचे समर्थन मार्क्स यांनी केले आहे म्हणजे लोकसंख्या नियंत्रणास मदत होईल.

मार्क्स यांनी माल्थस यांच्या विचाराला नाकारुन नवीन आर्थिक घटका महत्त्व देणार विचार मांडला आहे.

**क) नव-माल्थसवादी सिद्धांत :**

नव माल्थसवादी सिद्धांत माल्थस आणि मार्क्स यांच्या सिद्धांतील लोकसंख्या समस्यांना दोघांच्या विचारांचा एकत्रित अभ्यास केला जातो. नव-माल्थसवादी विचारवंत माल्थसच्या जगातील लोकसंख्यावाढ आणि अन्नधान्य पुरवठा तुलनात्मक अभ्यासाला सहमती देतात. पाऊल इहर्लीच्या मते जगातील लोकसंख्याचे स्वरुप हे पर्यावरणाला हानीकार आहे. तो म्हणतो पृथ्वी हा मरमुख ग्रह झाला आहे. लोकसंख्या नियंत्रण करुन सामान्य लोकसंख्या वाढ होणे गरजेचे आहे.

नव-माल्थसवादी हे मार्क्सच्या लोकसंख्या सिद्धांताचे पण समर्थन करतात. कारण औद्योगिक राष्ट्र चुकीच्या संपत्ती हाव्यासामुळे जगातील संसाधनाचा ऱ्हास करत आहेत. माल्थसवादी जन्मदर नियंत्रण आणि मानवी उपयोगाची संसाधाने संबंधनाला महत्त्व देऊन लोकसंख्या वाढीचे समर्थन करतात. नव-माल्थसवादी सिद्धांतामुळे दारिद्र आणि पर्यावरण ऱ्हासाच्या सामाजिक समस्या निर्माण करु नये. नव माल्थसवादीच्या मते लोकसंख्या वाढीचा परिणाम पर्यावरण ऱ्हास होतो. पण असे प्रगत राष्ट्रांनी पर्यावरण संवर्धनासाठी काम करत आहेत.

माल्थस, मार्क्स आणि नव-माल्थसवादी सिद्धांत हे लोकसंख्या वाढीच्या परिणाम आणि कारणांचा आढावा घेतला आहे.

## १.७ लोकसंख्याशास्त्राचे स्वरूप

अ) लोकसंख्येचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे लोकसंख्याशास्त्र होय. या शास्त्रात जनन, मर्त्यता व स्थलांतर या लोकसंख्येच्या मुलभूत चलांचा व वैशिष्ट्यांचे अध्ययन केले जाते.

ब) लोकसंख्येचा राष्ट्राचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घटकांवर प्रभाव पडतो. राष्ट्रातील विविध सामाजिक प्रथा, परंपरा, संस्कृती, विवाहाच्या पद्धती, विवाहाचे वय व धार्मिक स्वरूपाच्या बाबी इत्यादी घटकांचा लोकसंख्येवर प्रभाव पडून लोकसंख्या प्रभावित होत असते. या कारणांमुळे या सर्व सामाजिक घटकांचा लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून व लोकसंख्येचा या सामाजिक घटकांच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

क) लोकसंख्याशास्त्र वर्णनात्मक, संख्यात्मक, गुणात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

ड) लोकसंख्येतर्गत होणाऱ्या बदलांचा सांख्यिकीय स्वरूपाचे अभ्यास आणि हे बदल ज्या कारणांमुळे घडून येतात ती कारणे लोकसंख्याशास्त्राच्या अभ्यासात शक्य आहे.

इ) लोकसंख्येच्या आकारमाना बरोबरच लोकसंख्येच्या रचनेतील धार्मिक, वंशिक जातीय तत्त्वावर विभागणी सरासरी आयुर्मान इत्यादी घटकांचा स्थूलमानाने विचार केला जातो.

ऊ) लोकसंख्येतील जनन, मर्त्यता व स्थलांतर यांसारख्या घटकांच्या आधारे भविष्य काळाबाबतचे अंदाज व्यक्त करता येत असल्यामुळे हे एक व्यवहारोपयोगी शास्त्र आहे.

लोकसंख्येचा संबंधी विविध घटकांशी येतो म्हणून दिवसेंदिवस व्याप्ती वाढत आहे.

munotes.in

## १.८ लोकसंख्याशास्त्राचे महत्त्व

देशातील विविध कल्याणकारी योजना आखणी, नियोजन करताना तसेच तयार केलेल्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन अधिकारी, प्रशासक, शासन यांना लोकसंख्येचा अभ्यास महत्त्वाचा ठरत आहे. म्हणून लोकसंख्याशास्त्रात होणाऱ्या बदलाचा विचार केला जातो.

### १) लोकसंख्याशास्त्र व आर्थिक विकास :

देशातील आर्थिक समस्या व विकासात्मक नियोजन यासाठी लोकसंख्या अभ्यास महत्त्वाचा ठरत आहे. लोकसंख्यावाढीचे प्रमाण व आर्थिक वृद्धी म्हणजे विकास यांच्या मध्ये सहसंबंध माहिती मिळवण्यासाठी लोकसंख्याशास्त्र आवश्यक आहे. लोकसंख्या व आर्थिक विकास श्रमशक्तीचा विकास, जनन क्षमता, आर्थिक घटक समजण्यासाठी लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासाचे महत्त्व प्राप्त झाले. अर्थव्यवस्थेतील उपभोक्ता व उत्पादक या दोन्ही भूमिका लोकसंख्याशास्त्र पार पाडत असते. दरडोई उत्पन्न, विकासदर या अर्थशास्त्रीय चलावर लोकसंख्यांचा थेट परिणाम होतो. लोकसंख्या रचनेतील बदल देशाच्या आर्थिक विकासावर सरळ परिणाम करतात. देशाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय नियोजनासाठी लोकसंख्याशास्त्राचा आधार घेतला जातो.

### २) लोकसंख्याशास्त्र व सामाजिक विकास :

राष्ट्राचे लोकसंख्यात्मक दृष्टिकोनातून लोकसंख्येचे वास्तव चित्रण डोळ्यासमोर येत नाही. तो पर्यंत नियोजनकार किंवा प्रशासनाला योग्य त्या सामाजिक, आर्थिक योजना राबवता येत नाही. लोकसंख्या वितरण लक्षात आल्याशिवाय सामाजिक विकास घडवून आणणाऱ्या योजना आखता येत नाहीत. लोकसंख्याची रचना जैविक, सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर समजावून घेऊन त्यानुसार योग्य त्या समाज विकास घडवून आणणाऱ्या योजना प्रशासकीय पातळीवर राबवणे शक्य आहे. विवाहाचे वय, स्त्री-पुरुष विषय गुणोत्तर प्रमाण, शैक्षणिक स्थिती, स्त्रियांच्या सामाजिक दर्जा लोकसंख्येची वयानुसार रचना, जननदर, मृत्यूदर इत्यादी सामाजिक घटकांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करुन सामाजिक विकास साधणे शक्य आहे.

### ३) लोकसंख्याशास्त्र व पर्यावरण :

लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासातून लोकसंख्यावाढ व पर्यावरण ऱ्हास यातील सहसंबंध स्पष्ट झाला आहे. अतिरिक्त लोकसंख्या वाढीचा परिणाम म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास होत असतो. नैसर्गिक वाढ, स्थलांतर यामुळे लोकसंख्येची क्षमता विशिष्ट प्रमाणात वाढत असते. अतिरिक्त लोकसंख्याला गरजा पुर्तीसाठी निसर्गातील साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर केला जातो. अतिरिक्त लोकसंख्या ही प्रदुषण वाढीला जबाबदार असते. मुंबई, दिल्ली, चैन्नई, कोलकत्ता, हैद्राबाद वगैरे शहरांच्या विकासातून पर्यावरण ऱ्हास होताना दिसून येतो. लोकसंख्याशास्त्राच्या माध्यमातून लोकसंख्येचे वास्तव चित्र तयार करुन लोकसंख्येचे योग्य नियोजन केल्यास पर्यावरण संवर्धनास मदत मिळत असते.

### ४) लोकसंख्याशास्त्र व प्रशासकीय नियोजन :

देशाच्या भौतिक व सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वरूपाच्या योजना तयार करताना तसेच त्यांची प्रभावी अंमलबजावणी करताना लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास महत्त्वाचा ठरतो. लोकसंख्येची रचना, घनता, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादीच्या स्थितीचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करुन लोकसंख्येचे वास्तव चित्र डोळ्यासमोर ठेवून योजनाकार, प्रशासकीय अधिकारी योजना तयार करत असतात. देशाच्या विकासासंबंधी नियोजन करतात. त्यामुळे लोकभिमुख योजना तयार करण्यास मदत होत असते. परिणामकारक प्रभावी योजना यशस्वीपणे राबवता येत असतात. योजनाचे इच्छित फलित साध्य होण्यास मदत मिळत असते.

### ५) लोकसंख्याशास्त्र व औद्योगिक विकास :

औद्योगिक विकास हा भांडवल, कच्चा माल यंत्रसामुग्री व मनुष्यबळ या घटकांची गरज असते. औद्योगिक क्षेत्रातील महत्त्वाचा घटक म्हणजे मनुष्यबळ होय. सक्षम, सशक्त व कार्यकुशल मनुष्यबळ हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असते. आज संपूर्ण जगात माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढत आहे. त्याच बरोबर मनुष्यबळाची मागणीही वाढत आहे. संपूर्ण जगाने आधुनिक तंत्र-कुशल कामगारांची निर्मितीसाठी प्रयत्न सुरु केले आहेत. मानवी संसाधन विकास ही नवीन संकल्पना विकसित झाली आहे.

लोकसंख्या रचनेतील वयोगटानुसार विभागणी करुन तरुण व कार्यक्षम लोकसंख्येची स्थिती जाणून घेऊन त्यांच्या कार्यात्मक विकास घडवून आणण्यासाठी जगातील सर्वच देशात योजनात्मक प्रयत्न सुरु झालेले आहेत. देशातील शैक्षणिक विकासा बरोबर तंत्र व व्यवसायिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न सुरु झालेले आहेत.

## १.९ सारांश

आधुनिक काळात विविध शास्त्रांचा विकास होत आहे. त्यापैकी लोकसंख्याशास्त्र हे एक महत्त्व पूर्ण शास्त्र उदयास आले आहे. १९ व्या शतकापासून जगात वाढत्या लोकसंख्येची समस्या निर्माण झाली आहे. अशा वाढत्या लोकसंख्यांचा जीवनावश्यक गरजांबरोबर मेळ घालण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी योग्य नियोजन पुर्वक योजना आणि कार्यक्रम तयार केले जातात. त्यासाठी लोकसंख्या स्वरूप स्पष्ट करणारा आराखडा तयार करुन कार्य केले जात असते. लोकसंख्याशास्त्र अभ्यास विविध नियम व सिद्धांत व कसोट्यावर आधारित असतात. माल्थस कार्लमार्क्स यांच्या सिद्धांताच्या आधारे लोकसंख्येचा परिणामात्मक अभ्यास केला जात असतो. देशाच्या विकासासाठी लोकसंख्यात्मक आकलन महत्त्वाचे ठरत आहे. देशातील स्त्री-पुरुष प्रमाण, दारिद्र, शैक्षणिक स्तर वगैरे बाबींचा योग स्वरूपातील माहिती केवळ लोकसंख्या अभ्यासातूनच मिळत असते.

लोकसंख्या अभ्यास संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीने अभ्यास केला जात असतो. लोकसंख्येचे आकारमान, रचना, विषय विभाजन तसेच काळानुरुप होणारे बदल त्या बदलास जबाबदार कारणे यांचा मानवी कल्याण करण्यासाठी फायदा होत असतो. लोकसंख्येत केवळ व्यक्तींचा अभ्यास केला जातो असे नाही तर वातावरण, इतर संबंधी गोष्टीचा सखोल अभ्यास केला जातो. अशा महत्त्वाच्या शास्त्राला संपूर्ण जगाने स्विकार केले आहे.

## १.१० सराव प्रश्न

१. लोकसंख्याशास्त्राची व्याख्या द्या आणि स्वरूप व सिद्धांत स्पष्ट करा.
२. लोकसंख्याशास्त्राचा अर्थ सांगून व्याख्या स्पष्ट करा.
३. लोकसंख्याशास्त्राचा संकल्पना स्पष्ट करुन महत्त्व सांगा.
४. टीपा लिहा
   १) लोकसंख्याशास्त्र
   २) माल्थस व मार्क्सचा सिद्धांत
   ३) लोकसंख्याशास्त्राचे महत्त्व
   ४) लोकसंख्याशास्त्राचा अर्थ

## १.११ संदर्भ ग्रंथ


१) डी.एस. बघेल, किरण बघेल - जनंकिकी, विवेक प्रकाशन २०००

२) डॉ. आगलावे प्रदिप, भारतीय समाज संरचना आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन २००३

३) सर्जेराव बोराडे, डॉ. प्रदीप गांगुर्डे, भारतीय समाजातील समकालीन मुद्दे, निराली प्रकाशन, मुंबई, २०१७

४) Asha A Bhende, Tara Kanitkar, ‘Principles of population, Himalaya publishing House, Mumbai - 2014

५) Raj H; Population Studies, Surjeet Publication, Delhi - 1998

६) Bhagat R; Jones G; Population change and Migration in Mumbai Metropolition Region; Implication for planning and Goverance; Asia Research Institute National University of Singapore.


❖❖❖❖

munotes.in

# २अ

# विवाहवेळचे वय, जनन आणि मर्त्यता – संकल्पना आणि कारक घटक


२अ.० उद्दिष्टे

२अ.१ प्रस्तावना

२अ.२ विवाहवेळचे वय

२अ.२.० प्रस्तावना

२अ.२.१ जागतिक स्तरावरील विवाहवेळचे वय

२अ.२.२ अपाश्चात्य देशांमधील विवाहवेळचे वय

२अ.२.३ भारतातील विवाहवेळचे वय

२अ.२.४ विवाहवेळच्या वयावर परिणाम करणारे घटक

२अ.३ जनन क्षमता - सामाजिक आणि आर्थिक निर्धारक

२अ.३.० प्रस्तावना

२अ.३.१ जनन नियंत्रणाचे अप्रत्यक्ष सामाजिक कारक

२अ.३.२ जनन नियंत्रणाचे प्रत्यक्ष सामाजिक कारक

२अ.४ मर्त्यता

२अ.४.० प्रस्तावना

२अ.४.१ मृत्युदरातील विभिन्नता

२अ.४.२ अर्भक आणि बाल मृत्यू

२अ.४.३ माता मृत्यू

२अ.४.४ निष्कर्ष

२अ.५ सारांश

२अ.६ सांराश

२अ.७ संदर्भ ग्रंथ


## २अ.० उद्दीष्टे

१. लोकसंख्या वाढीशी संबंधित संकल्पनांमधील परस्पर आंतरक्रियांचे परीक्षण करणे.

२. डेमोग्राफिक संक्रमणाच्या गतीशीलतेचे आकलन करणे.

## २अ.१ प्रस्तावना

नैसर्गिकरित्या होणाऱ्या लोकसंख्येचे आकार आणि इतर वैशिष्ट्ये सतत बदलत असतात. सहसा असा बदल हळूहळू आणि कोणत्याही वेळी महत्प्रयासाने दृश्यमान असतो. कधीकधी नैसर्गिक आपत्ती, तांत्रिक नवकल्पना इत्यादींच्या परिणामी लोकसंख्येमध्ये नाट्यमय बदल घडून येऊ शकतात. अशा घटनांमध्ये आपण “स्फोट”, “भरभराट” किंवा “संकुचन” सारख्या संज्ञाचा वापर करतो. तथापि, क्रमाक्रमाने स्फोटकात बदल होण्याचे दर आणि त्यातील सर्व मुद्द्यांकडे दुर्लक्ष करून, लोकसंख्या वाढीचे किंवा घटण्याचे मूळ कारण जन्म, मृत्यू आणि स्थलांतर या तीन महत्वाच्या घटनांमधील परस्पर आंतरक्रियांमध्ये शोधले जाऊ शकते. हा विभाग लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणाशी संबंधित तीन महत्त्वाच्या संकल्पनांना स्पष्ट करतो उदा. विवाह वेळचे वय (विवाह), प्रजनन क्षमता (जन्म) आणि मर्त्यता (मृत्यू).

## २अ.२ विवाह वेळचे वय

### २अ.२.० प्रस्तावना :

विवाह ही एक सार्वत्रिक संस्था आहे आणि ती प्राचीन, पारंपारिक आणि आधुनिक समाजात प्रचलित आहे. विवाहवेळचे वय ही विवाहाची वारंवारिता, विवाहाची वैशिष्ट्ये आणि लोकसंख्येतील विवाहाचे विघटन होय. विवाहविषयक अभ्यासामध्ये प्रथम विवाह आणि घटस्फोटित किंवा विधवा किंवा विभक्त व्यक्तींचे पुनर्विवाह समाविष्ट आहेत. प्रजननक्षमतेचा आकृतीबंध (स्वरूप) आणि पातळी समजून घेण्याच्या प्रयत्नात हा दृष्टीकोन महत्वाचा आहे. विवाहाची वारंवारिता, ज्या वयात ते निष्कर्ष काढले जातात आणि विभाजन/घटस्फोट, वैधव्य आणि पुनर्विवाहाची वारंवारिता ही प्रजनन गतिशीलतेचे महत्त्वपूर्ण घटक आहेत. म्हणून लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणावर परिणाम घडवून आणण्यात, विशेषत: प्रजननक्षमतेत महत्वाच्या भूमिकेचे मूल्यांकन करणे आणि त्याची पडताळणी करणे फार महत्त्वाचे आहे. ज्याद्वारे सामाजिक आणि आर्थिक बदलांवर लोकसंख्याशास्त्रीय व्यवस्था प्रतिक्रिया देते, त्या यंत्रणांना समजून घेण्यासाठी विवाहवेळच्या वयाच्या स्वरूपाचे मूल्यांकन हे आवश्यक माहिती प्रदान करू शकते. 18 व्या आणि 19 व्या शतकाच्या उत्तरार्धातील लोकसंख्या शास्त्रज्ञांनी यापूर्वीच यास मान्यता दिली होती. विशेषत: मालथस यांनी प्रजनन आणि लोकसंख्येच्या वाढीशी लग्नाचा संबंध हा मालथुसियन सिद्धांताचा मध्यवर्ती विषय होता.

विवाह दर्जांमधील बदलाशी संबंधीत असतो ; इतर वैवाहिक स्थितीपासून विवाहित स्थितीपर्यंत. कायद्याने स्थापित केल्यानुसार विवाह म्हणजे पुरुष आणि स्त्रीचे एकत्रिकरण. लग्न करण्याच्या वस्तुस्थितीमुळे लोकसंख्येची रचना बदलते (नागरी स्थितीत बदल) आणि प्रजननक्षमतेवर प्रभाव पडतो, कारण बहुतेक जन्म विवाहित जोडप्यांद्वारे होतात.

**प्रथम आणि त्यानंतरच्या विवाहांमध्ये फरक आहे :**

- प्रथम-विवाह म्हणजे पुरुष आणि स्त्रीचे एकत्रिकरण, ज्याने पूर्वी कधीही लग्न केलेले नाही. आजपर्यंत, बहुतेक विवाह या प्रकारच्या संघाचे प्रतिनिधित्व करतात.
- त्यानंतरचे विवाह असे कोणतेही विवाह असतात ज्यात पूर्वीच्या जोडीदारापैकी कमीतकमी एखाद्याचा आधी घटस्फोट झाला असेल किंवा विधवा असेल.

बहुतेक देशांमध्ये लोकसंख्या वाढीचा प्राथमिक निर्धारक जन्म दर आहे. हे कुटुंब स्ट्रक्चरल युनिट आहे जे मुख्यत्वे जगभरातील जन्मासाठी जबाबदार आहे, लग्न आणि घटस्फोटाच्या दरांमधील बदल हे लोकसंख्या वाढीमध्ये अप्रत्यक्ष भूमिका निभावतात.

**२अ.२.१ जागतिक स्तरावरील विवाह वेळचे वय**

जगातील विवाहवेळच्या वयाचा आणि त्यामागील प्रवृत्तीचा अभ्यास करण्यासाठी वैवाहिक संघटनांचे प्रकार (विवाह) आणि कोणत्या परिस्थितीतून ते स्थापन केले जातात याची प्राथमिक तपासणी आवश्यक आहे.

**अ) एकविवाह (Monogamy)**: जगभरात वारंवार होणाऱ्या विवाहवाहक संघटना निसर्गात एकरूप असतात. तथापि, बहुपत्नीय संघटनांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, जे विशेषतः आफ्रिकन लोकांमध्ये प्रचलित आहेत.

पाश्चात्य समाजात विवाह हे कायदेशीर प्रक्रियेचे प्रसंग आहेत. म्हणून, सांख्यिकीय डेटा संग्रहित करण्यासाठी जबाबदार एजन्सीद्वारे लग्नाची पद्धतशीरपणे नोंदणी केली जाते. माहिती सहज उपलब्ध असल्याने हे लोकशास्त्राचे कार्य सुलभ करते. तथापि, काही संस्कृतींमध्ये विवाह सोप्या धार्मिक सोहळयाद्वारे केले जातात किंवा ते काही पारंपारीक प्रक्रियेचा परिणाम असू शकतात जे विशिष्ट वांशिक किंवा धार्मिक गटांचे वैशिष्ट्य आहेत आणि त्यांच्या प्रथा आहेत.

**ब) बहुविवाह** : बहुविवाहास मुस्लिम कायद्याने परवानगी आहे. तथापि, भूमध्य समुद्राच्या बाजूने आणि इराणमध्ये मुस्लिम देशांमध्ये याविवाहांना लोकसंख्याशास्त्रीय महत्त्व जास्त दिसत नाही. अलिकडच्या वर्षांच्या राजकीय घडामोडींमुळे ही प्रवृत्ती आणखी मजबूत होऊ शकते; उदाहरणार्थ, बहुपत्नीत्वास आता ट्युनिशियामध्ये बंदी घातली गेली आहे आणि इराण आणि इजिप्तसह इतर अनेक देशांमध्ये त्यांची बदनामी झाली आहे.

**ब्लँक** (1959) सारख्या विद्वानांनी केलेल्या अभ्यासाचा असा आग्रह आहे की बहुतेक गरीब आफ्रिकेतील लोकांमध्ये बहुपत्नीला महत्त्व आहे. हे कमी संख्येच्या पतींकडून वैशिष्ट्यीकृत नसते, प्रत्येकाला अनेक बायका असतात; परंतु मोठ्या संख्येने असलेल्या पतिंना केवळ काही पत्नी असतात. (प्रत्येक पतीसाठी दोन बायका). त्याच वेळी, लोकसंख्येमधील स्त्रीयांची मर्यादित संख्या बहुपत्नीत्वास मर्यादा घालील. बहुपत्नीत्वचा वापर मूलत: वृद्ध पुरुषांकडून केला जातो , जे आधी एकविवाही होते, परंतु नंतर वेळोवेळी अनेक बायकांशी ते लग्न करतात.

**क) सहमती संघटन** : **सहमती** (किंवा मुक्त), संघटन वेगवेगळया मानवी समाजात बहुविध भूमिका बजावतात आणि लॅटिन अमेरिकेत हे एक सामान्य वैशिष्ट्य आहेत. **मोर्टारा** (1963) च्यामते, सहमती संघटन म्हणजे विवाहाचा परिचय किंवा निष्कर्ष नसून त्याऐवजी पर्याय बनतो. सहमती संघटनांची वारंवारता मोजणे अवघड आहे कारण सामान्यत: जनगणनेद्वारे या वगळल्या जातात.

### २अ.२.२ अपाश्चात्य देशांमधील विवाहवेळचे वय

जगभरातील बिगर-पश्चिम देश सांस्कृतिकदृष्ट्या पाश्चात्य देशांपेक्षा वेगळे आहेत, तेथे विवाहवेळच्या वयाची तीव्रता खूप जास्त आहे. भारत, तैवान, कोरिया आणि इतर अशा आशियातील अनेक देशांमध्ये विवाह अनिवार्य आणि सार्वत्रिक आहे. म्हणूनच जवळजवळ सर्व स्त्रिया एकदा तरी लग्न करतात. या देशांच्या संबंधित परंपरांचा अभ्यास करण्याची गरज आहेः कुटुंब बनवणे, लग्नाचे कार्य आणि कुटुंबाची संकल्पना या सर्वांवर आधारित कायदे पाश्चिमात्य देशांपेक्षा सर्वत्र भिन्न आहेत.

### २अ.२.३ भारतातील विवाहवेळचे वय :

भारत बहुधा अशा काही आशियाई देशांपैकी एक आहे, ज्यासाठी विवाहवेळच्या वयाचा अभ्यास सर्वात व्यापक आणि विस्तृत आहे.भारतीय विवाह हा वाङ्निश्चयाद्वारे पूर्वनिर्धारीत आहे. हा वाङ्निश्चय विवाहाइतकाच पवित्र आणि प्रतिबद्ध असतो. खरं तर, विवाहविषयक आरंभ म्हणून भारतीय विवाहवेळच्या वयाचे अभ्यास हेच अधोरेखित करतात की स्त्रियांच्या बाबतीत हे खरे बालविवाह होते. विशेषत: ग्रामीण भारतातील बहुतेक मुलींचे सरासरी वय 14 वर्षे आहे, जे बालविवाह करतात. विवाहवेळचे वय जात आणि धर्म विधवा पुनर्रविवाहविरोधी पूर्वग्रह याचा भारतातील विवाहवेळचे वय यावर परीणाम होतो तथापि, अलिकडील कल असे सुचवितात की पुनर्विवाहाची प्रथा यापुढे निषिद्ध मानली जात नाही.

वधूचे विवाहवेळचे वय जर 22 व त्यापेक्षा जास्त धरले तर ज्या समाजामध्ये लवकर विवाह करण्याची पद्धती प्रचलित आहे तेथे स्त्रीला प्रजौत्पादनाच्या कालमर्यादेमध्ये जास्त मुले होतात. परंतु उशिरा विवाह करण्याची पद्धती रूढ आहे. तेथे मुलांची संख्या मर्यादितच राहते. भारतामध्ये स्त्रीयांचे विवाहाचे वय हे जगात सर्वात कमी आहे. याचे कारण म्हणजे मोठ्या संख्येने होणारे बालविवाह होत.

सामान्यपणे प्राचीन भारतात बालविवाहाची प्रथा नव्हती ती मध्ययुगात रूढ झाली असे म्हटले जाते. त्यावेळेपासुन अनेक वर्ष ही प्रथा सामान्य बनली. भारतात लोकसंख्येने जास्त असणाऱ्या हिंदू धर्माच्या खालोखाल इतर धर्मामध्येही बालविवाहाची प्रथा होती, मुलगी वयात आली की तिचा लवकरात लवकर विवाह करण्याविषयीची धार्मिक समजूत होती.

**विवाहवयातील बदल :**

बालविवाहाच्या प्रथेने चिंतित होऊन समाजसुधारकांनी यावर कायदेशीर उपाय शोधून विवाहाचे वय निश्चित करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात.

munotes.in

अ) 1930 साली सारडा कायदा पास झाला आणि विवाहाच्या वेळी मुलाचे वय किमान 18 आणि मुलीचे वय किमान 14 असे निश्चित करण्यात आले .

ब) 1949 मध्ये विवाहवेळच्या वयाच्या संबंधात कायद्यामध्ये सुधारणा करून विवाहवेळच्या वयात मुलींसाठी 15 वर्ष अशी 1 वर्षाची वाढ करण्यात आली.

क) 1955 मध्ये हिंदू विवाह कायदा संमत झाला या कायद्याने मुलीसाठी विवाहाचे वय 18 आणि मुलांसाठी विवाहाचे वय 21 असे निश्चित केले.

**भारतातील विवाहवेळचे सरासरी वय :**

| कालखंड | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| 1891 ते 1901 | 20.0 | 13.1 |
| 1901 ते 1911 | 20.3 | 13.2 |
| 1911 ते 1921 | 20.7 | 13.7 |
| 1921 ते 1931 | 18.6 | 12.7 |
| 1931 ते 1941 | 19.9 | 14.7 |
| 1941 ते 1951 | 19.9 | 15.6 |
| 1951 ते 1961 | 21.3 | 15.5 |
| 1961 ते 1971 | 22.7 | 17.2 |

स्रोत : भारतीय जनगणना 1974, पृष्ठ 61

वरील सारणीवरून असे दिसून येते की 1891 ते 1921 या तीस वर्षाच्या कालखंडात मुले आणि मुली यांच्या विवाहाच्या वयामध्ये मंद पण धिमेपणाने प्रगति झाली होती तथापी 1921 ते 1931 या कालखंडमध्ये विवाहाचे वय पुन्हा कमी झाले याचे कारण म्हणजे 1929 चा बालविवाह नियंत्रण कायदा होय त्यामुळे अनेक लोकांना अशी भीती वाटली की सदर कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर आपल्याला मुलांचे किंवा मुलींचे विवाह त्यांचे लहान वय असताना करता येणार नाही म्हणून त्यांनी आपल्या मुलांचे व मुलींचे विवाह शक्यतो लवकर ठरवून टाकले. 1931 नंतर विवाहाच्या वयात पुन्हा मंद गतीने वाढ होण्यास सुरुवात झाली. 1930 ते 1940 या कालखंडात ही वाढ दिसून आली.

स्त्रियांच्या विवाहाच्या सरासरी वयामध्ये पुरुषांच्या मानाने खूपच वाढ दिसते व त्यामुळे वराचे सर्वसाधारण वय व वधूचे वय यातील तफावत बरीचशी कमी झाली.

munotes.in

**विवाहवेळच्या वयातील प्रादेशिक विविधता**

विवाहवेळच्या सरासरी वयामध्ये भारतात प्रदेशानुसार विविधता दिसून येते. उदा. केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, आसाम, पंजाब, नागालँड, महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये इतर प्रदेशाच्या तुलनेने विवाहाचे सरासरी वय राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त आहे. तर बिहार, ओरीसा, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, राजस्थान व उत्तरप्रदेश या राज्यांमध्ये विवाहाचे वय राष्ट्रीय सरसरीपेक्षा स्त्री व पुरुष दोघांच्याही बाबतीत खूपच कमी आहे.

**विवाहावेळचे वय आणि धर्म**

भारतात धार्मिकदृष्ट्याही विवाहाच्या सरासरी वयामध्ये फरक दिसतो. ख्रिश्चन धर्माच्या लोकात विवाहाचे वय सर्वात जास्त असून त्या खालोखाल शीख, मुस्लिम, व हिंदू असा क्रम लागतो. 1971 च्या जनगणनेतील याविषयीचे संख्यात्मक वास्तव पुढील सारणीमध्ये मांडले आहे.

| धर्म | ख्रिश्चन | शीख | मुस्लिम | जैन | हिंदू |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष | 22.6 | 21.5 | 19.4 | 20.4 | 16.5 |
| स्त्री | 17.2 | 15.2 | 22.7 | 13.5 | 12.3 |

**२अ.२.४ विवाहवेळच्या वयावर परिणाम करणारे घटक :**

१. **आर्थिक परिस्थिती :** कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा विवाहाच्या वय निर्धारणावर प्रभाव पडत असतो. श्रीमंत व्यक्ति आपल्या मुलांचे विवाह उशिरा करतात. विवाहाच्या अगोदर मुलगा किंवा मुलगी पुर्णपणे स्थिर असली पाहिजेत. अशी त्यांची इच्छा असते.

२. **सामाजिक परिस्थिती :** आर्थिक परिस्थितीप्रमाणेच सामाजिक परिस्थिती ही विवाहाच्या वयावर प्रभाव टाकीत असते. मुलींचे विवाह लवकर झाले पाहिजेत अशी सामाजिक अपेक्षा असते.

३. **हुंडा पद्धती :** हुंडा पद्धतीमुळे काही समाजात गरीबांना नाविलाजाने मुलींचे विवाह उशिरा करावे लागतात. विवाह करण्यासाठी, हुंडा देण्यासाठी ते पुरेश्या पैश्याचा संचय करतात. काही समाज आणि जातींमध्ये विवाहसाठी फारसा खर्च करत नाहीत तर काही समाजात दाखविपणा करण्यासाठी, प्रतिष्टेसाठी पैसा वाया घालविला जातो.

४. **शिक्षण :** काही समाजात मुलगी जोपर्यन्त शिक्षण पूर्ण करत नाही तोपर्यंत तिचा विवाह केला जात नाही. पण दुसऱ्या बाजूला काही समाजात शिक्षणाचा विचार केला जात नाही. शहरामध्ये मुलगा मुलगी यांचे शिक्षण सक्तीचे झालेले असते. तशी परिस्थिती ग्रामीण भागात दिसत नाही. जर पालक आपल्या मुलांचे शिक्षण

munotes.in

करण्यास पात्र नसेल तर तो लवकरात लवकर मुलांचे विवाह करतो,परंतु जिथे शिक्षण सक्तीचे असते तिथे विवाहाचे वय लांबणीवर पडते.

५. **रोजगार** : ग्रामीण भागात सगळेच शेतीमध्ये गुंतलेले असतात तिथे रोजगारच्या कारणाने विवाह उशिरा होण्याची शक्यता नसते परंतु नागरी भागात मात्र मुलामुलींच्या इच्छेप्रमाणे नोकरी मिळेपर्यंत विवाह लांबणीवर टाकला जातो. इच्छित नोकरी मिळत नसल्याने विवाह उशिरा होतात.

**आपली प्रगति तपासा :**

१. भारतातील विवाहवेळच्या वयातील बदलांचा मागोवा घ्या.

२. सन 1921 ते 31 या कालखंडात भारतातील विवाहाचे वय कमी का झाले?

## २अ.३ जनन क्षमता - सामाजिक आणि आर्थिक निर्धारक

### २अ.३.० प्रस्तावना :

जननक्षमतेबद्दलच्या कोणत्याही चर्चेमध्ये सुरुवातीसच जनन क्षमता आणि प्रजाजनत्व यातील फरक लक्षात घेणे उपयुक्त होईल. प्रजाजनत्व ही संज्ञा जिवंत आपत्त्यांना जन्म देण्याची क्षमता म्हणून वापरतात. तर जनन क्षमता म्हणजे प्रत्यक्षात किती आपत्त्यांना जन्म दिला जातो हे दर्शवितात. जैविकदृष्ट्या प्रजाजनत्व याला महत्व असले तरीही आपले प्रमुख औत्सुक्य जनन क्षमता या क्रियेबद्दल आहे. म्हणजेच एखाद्या देशामध्ये प्रत्यक्ष किती आपत्यचा जन्म झाला याबद्दल सामाजिक लोकसंख्या शास्त्राला रस आहे.

जनन क्षमता ही बाळाला जन्म देण्याची वास्तविक क्षमता आहे. मुलींच्या सामान्य आरोग्याचा, विविध आजार, विशेषत: लैंगिक आजार, प्रजनन शक्तीची कमतरता, वंध्यत्व, अन्नाचा दर्जा - यांच्याशी नक्कीच काही संबंध आहे. सुधारित सामाजिक आणि भौतिक वातावरण, सामाजिक आणि आरोग्य क्षेत्राकडे राज्याचे अधिक लक्ष, सर्वांसाठी चांगले शिक्षण, सुधारित आरोग्य सेवा, चांगले पोषण, कमी अर्भक, बाल आणि माता मृत्यु ही काही लोकसंख्या वाढीच्या दरामागील कारणे

आहेत. यावर लोकसंख्याशास्त्रज्ञ सहमत आहेत. जगभरातील लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक घटक निर्णायक भूमिका निभावतात.

जननक्षमतेचे सामाजिक आणि आर्थिक निर्धारक दोन घटकांच्या बाबतीत समजून घेता येऊ शकतात जनन नियंत्रित करणारे अप्रत्यक्ष सामाजिक घटक आणि प्रत्यक्ष सामाजिक घटक.

**२अ.३.१ जनन क्षमता नियंत्रित करणारे अप्रत्यक्ष सामाजिक घटक**

हे समजून घेणे महत्वाचे आहे की प्रजनन नियंत्रणाची प्रत्येक साधने एखाद्या विशिष्ट समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वारशाच्या संदर्भात पाहिली पाहिजेत. दोन समाज जन्म नियंत्रनाच्या समान पद्धतीचा अवलंब करू शकतात परंतु त्यांचे मूळ तसेच त्यांचे हेतू खूप भिन्न असू शकतात. प्रजनन क्षमता आणि आपल्या बऱ्याच सामाजिक आणि आर्थिक पद्धतींमध्ये मजबूत संबंध आहे. बाळाचा जन्म यासारख्या कोणत्याही सामाजिक कार्यक्रमाच्या मागे असे अनेक प्रकार आहेत ज्यांचे परिणाम सहजपणे सांगता येत नाहीत. खाली दिलेल्या लोकसंख्येमध्ये जननक्षमतेतील बदलण्याच्या विश्लेषणामध्ये अनेक घटक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**१. विवाह दर :**

विवाह हा सर्व समाजातील सर्वात पवित्र संस्थांपैकी एक आहे. विवाह सार्वभौमिक असले तरी कोणाशी लग्न करू नये आणि विवाहाचे वय याबद्दल काही नियम आहेत. विवाहाचे दर हे एका विशिष्ट कालावधीत लोकांच्या विशिष्ट गटामध्ये होणाऱ्या विवाहांची संख्या असते. विवाहाचे दर एखाद्या विशिष्ट वयोगटातील विवाहाच्या अनुभवावरील सामाजिक बदलांच्या प्रभावाची मागील किंवा त्यानंतरच्या वर्षांच्या समान वयोगटाच्या अनुभवाशी तुलना करण्यासाठी वापरला जाऊ शकतो. भारतात 20 ते 24 वयोगटातील लग्नाचे प्रमाण सर्वाधिक आहेत. मुलींचे शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि मानसिकतेतील बदल यासारखे अनेक घटक या प्रवृत्तीस कारणीभूत ठरू शकतात.

**२. मृत्यूच्या दरातील घट:**

विसाव्या शतकाच्या मध्यात संपूर्ण जगात मृत्यूचे प्रमाण झपाट्याने कमी झाले आहे. गेल्या 50 ते 60 वर्षात विकसित आणि विकसनशील देशांमध्ये अन्नधान्य उत्पादन, वैद्यकीय सुविधा, वाहतूक आणि दळणवळणाच्या संजाला मध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. काही विकसनशील देशांनी त्यांचे मृत्यूचे प्रमाण इतके कमी केले आहे की ते विकसित देशांमधील मृत्यू नियंत्रणातील कर्तृत्वाच्या बरोबरीचे आहेत. विकसित देशांमधील लोकांनी स्वेच्छेने एक लहान कुटुंबाचे नियम स्वीकारले आणि जन्म नियंत्रणाचे योग्य साधन स्वीकारले. मृत्यू दरांवरील वेगवान नियंत्रणामुळे हे शक्य आहे. विकसित देशांमधील एकूण आयुर्मानात वाढ झाली आहे कारण कमी अर्भक मृत्यूदर (IMR) आणि राहणीमान उच्च आहे. विकसनशील देशांमध्येही ही प्रवृत्ती जोर धरत आहे. मोठ्या कुटूंबाचे दिवस गेलेत जेव्हा साधारणत: 10-12 मुलांना स्त्री जन्म देत असे

munotes.in

**३. विवाहाचे वय:**

1951 च्या सुरूवातीस औपचारिकरित्या कुटुंब नियोजन स्वीकारणारा भारत पहिला देश होता. तथापि, भारत हा संसदीय लोकशाही असल्याने कुटूंबाच्या आकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना राबवता आल्या नाहीत. दीर्घ चर्चेनंतर 1976 मध्ये मुलींचे विवाहाचे किमान वय 18 वर्षे करण्यात आले होते, तरीही लोकसंख्या तज्ञांचा आग्रह आहे की मुलींचे किमान वय २१ वर्षे असावे. लग्नाच्या अनिवार्य नोंदणीने लग्नासाठी वयाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही याची खात्री करण्यात देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावली जाते.

महिलांचे प्रजनन वय 15 ते 49 वर्षे आहे. लवकर विवाह म्हणजे मोठ्या कुटूंबाची शक्यता. पश्चिमेकडील लोक उशीरा लग्न केल्यामुळे कुटुंबाचा आकार नियंत्रित आहे. वस्तुतः पाश्चात्य देशांमध्ये मूल नसलेल्या जोडप्यांची संख्या वाढत आहे.

**४. बहुपत्नीत्व:**

बहुतेक काळापासून बहुपत्नीत्व ही भारत आणि इतर अनेक देशांतील पुरुषांमध्ये एक सामान्य पद्धत होती. आज बहुतेक देशांमध्ये दुसरी पत्नी असण्याविरूद्ध कडक कायदे आहेत कारण आधीपासून लग्नात पुरुषाकडे बायको असते. एक शतकांपूर्वीदेखील उच्च जाती आणि सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रभावी व्यक्तींमध्ये बहुपत्नीत्व बहुतेक सामान्य होते. अशा कुटूंबात (“कुलिन” म्हणून ओळखल्या जाणाऱ्या) विवाहात मुलीला देणे हे बहुतेक वेळेस प्रतिष्ठेचे मानले जात असे.

**५. विभक्त होणे आणि घटस्फोट:**

पश्चिमेस विभक्त होणे आणि घटस्फोट घेणे ही सामान्य घटना आहे, तर पूर्वेमध्ये विभक्त व घटस्फोटाचे प्रमाण कमी आहे. देशाच्या जन्म दरावर किंवा लोकसंख्येच्या घटकावर प्रभाव विच्छेदन आणि घटस्फोटाचे स्वरूप खालील घटकांवर अवलंबून असेलः घटस्फोट/ स्वतंत्र होण्याचे प्रमाण, पती-पत्नीचे वियोगाचे वय, पुनर्विवाहाचे प्रमाण , इ.

**६. वैधव्य:** बहुतेक देश विधवा पुनर्विवाहास प्रतिकार दर्शवित आहेत. विधवा पुनर्विवाह भारतात कायदेशीररित्या संरक्षित आहे. कायदेशीर संरक्षण असूनही, भारत आणि इतर पारंपरिक देशांमध्ये विधवा पुनर्विवाहाच्या घटना अद्याप लोकप्रिय नाहीत. आदिवासी, निम्न जाती गट आणि काही धार्मिक समाजांमध्ये विधवा पुनर्विवाह तुलनात्मकदृष्ट्या जास्त प्रमाणात आढळतो.

**७. विवाहानंतरचा त्रास:** मुलाला स्तनपान देण्याच्या कालावधी दरम्यान लैंगिक संबंध बऱ्याच समाजांमध्ये वर्जित असतात. हा कालावधी कधीकधी 2 वर्षांपर्यंत किंवा त्याहून अधिक काळ वाढू शकतो ज्यामुळे प्रजननक्षमतेवर परिणाम होतो. पारंपरिक कुटुंबात आई आणि मूल सासू किंवा घराच्या वयस्क महिलेच्या थेट

देखरेखीखाली राहतात. मासिक पाळीच्या प्रारंभास जितका विलंब होईल तितका त्याचा परिणाम जन्माच्या दरावर होईल.

**८. मासिक पाळी आणि संयम:** वेगवेगळया समाजात वेगवेगळया कारणांसाठी मासिक पाळी दरम्यान संयम न ठेवण्याची शिफारस केली जाते. तथापि, मासिक पाळी दरम्यानचा कालावधी जन्माच्या दरावर कोणताही महत्त्वपूर्ण प्रभाव पाडण्यासाठी फारच कमी असतो.

**९. ब्रह्मचर्य:** काही लोक आयुष्यभर लग्न करत नाहीत. तथापि, ही संख्या फारच कमी आहे कारण समाज लोकांना लग्न करण्यास आणि सामान्य कौटुंबिक जीवन जगण्यास प्रोत्साहित करतात.

**१०. लैंगिक संभोगची वारंवारता:** लैंगिक संभोग (कोयटस) दररोज होत नाही. लैंगिक संभोगाची वारंवारता आरोग्य स्थिती, मानसिक स्थिती, जास्त शारीरिक हालचाली आणि कौटुंबिक भांडणावर अवलंबून असते. लैंगिक संबंध हा एक वैयक्तिक आणि संवेदनशील मुद्दा आहे. म्हणूनच, त्यासंबंधी तथ्य शोधण्याचे सर्वेक्षण करणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य आहे.

**११. शिक्षण:** विशेषत: विकसित देशांमधील शिक्षणामुळे सामाजिक-आर्थिक स्थितीत वाढ झाली आहे. बाळ जन्मासह निसर्गाच्या शक्तींबद्दल तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोनांनी आम्हाला आदिम कल्पना आणि जुन्या परंपराच्या जोखडापासून मुक्त केले आहे.

**१२. व्यवसाय:** आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पारंपारिक व्यवसायांचा जन्मांवर काही भिन्न प्रभाव पडतो. उद्योग आणि उत्पादन क्षेत्रात नवीन नोकऱ्यासाठी लोकांना प्रवास करण्याची आवश्यकता आहे. संयुक्त कौटुंबिक रचनेचे विघटन झाले आहे, ज्यामुळे जन्म दर कमी होण्यास हातभार लागला आहे.

**१०. उत्पन्न:** उत्पन्न आणि प्रजनन यांच्यातील संबंध खूप गुंतागुंत आहे. शहरी भागात, कुटुंबे मुलांच्या जन्मास प्रतिबंधित करू शकतात, कारण या जबाबदाऱ्या मानल्या जातात. ग्रामीण भागात आर्थिक स्थिती विचारात न घेता, मुलांना मालमत्ता समजले जाते.

**१४. शहरी-ग्रामीण भिन्नता:** शहरी लोकांमध्ये जन्मदर ग्रामीण भागातील लोकांपेक्षा कमी आहे. विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांबाबत हेच आहे. लोकांच्या दोन गटांमधील काही महत्त्वाचे फरक म्हणजेः शिक्षणाची पातळी, आधुनिक व्यवसाय, मासिक पगारावर अवलंबून असणे, आरोग्य सुविधा, जीवनशैली, वेगवान जीवनशैली इत्यादी- हे सर्व शहरी लोकांच्या बाजूने आहेत.

### २अ.३.२ जनन क्षमता नियंत्रित करणारे प्रत्यक्ष सामाजिक घटक

प्रजनन क्षमता थेट गर्भपात, बालहत्या, गर्भनिरोधकांचा वापर इत्यादींशी संबंधित आहे.

**१. तोंडाने घ्यावयाच्या गोळया आणि इतर गर्भ निरोधक उपकरणे:**

अनेक आदिवासी पुरुष आणि स्त्रिया यांच्या तात्पुरत्या संततीनियमनासाठी काही हर्बल आणि औषधी वनस्पती - त्यांची मुळे आणि पाने वापरत असल्याचे आढळले आहे. गर्भ निरोधक गोळया आणि गर्भनिरोधक उपकरणांच्या शोधामुळे जन्म संरक्षण अधिक वैज्ञानिक ठरले आहे.

**२. गर्भपात:**

गर्भधारणेची अकाली समाप्ती तेथे आहे आणि जोपर्यंत गर्भधारणा अशक्य आहे तोपर्यंत मोठी भूमिका निभावेल. पारंपरिक समाजामध्ये बराच काळ गर्भपात केला जात आहे. एकदा कुटुंब नियोजन चळवळीला वेग आला की भारतात गर्भपात कायदेशीर ठरला. 1971 मध्ये भारताने मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी अॅक्ट (एमटीपी) मंजूर केला. परंतु या कायद्याचा घोर गैरवापर केला गेला. भारतातील लिंग-निवड गर्भपात काही राज्यांमध्ये आणि लोकसंख्येच्या काही भागांमध्ये महिलांचा जन्म रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरला गेला आहे.

**३. तात्पुरते आणि कायमस्वरुपी नसबंदी:**

बऱ्याच विकसनशील देशांनी त्यांच्या जन्म नियंत्रण कार्यक्रमासाठी कायमस्वरुपी नसबंदी स्वीकारली आहे. तथापि, जन्म दरावरील नसबंदीच्या परिणामाचा अभ्यास करणे कठीण आहे. भारतातील पुरुष आणि स्त्रिया 35 वर्षांच्या वयानंतर नसबंदी करतात, तीदेखील 4-5 मुले जन्मानंतर. तथापि, तज्ञांचे मत आहे की नसबंदीशिवाय जन्माची संख्या जास्त असू शकते.

**४. अर्भकमृत्यू:**

सर्व समाजात अर्भकमृत्यू एक सामान्य शाप आहे. धार्मिक आणि आर्थिक दोन्ही कारणे ही बालहत्यासाठी जबाबदार आहेत. पुरुषांद्वारे कौटुंबिक वंश चालू ठेवणे, पुरुषांची उच्च धार्मिक स्थिती, मालमत्ता म्हणून पुरुषांचा दृष्टीकोन आणि जबाबदाऱ्या म्हणून महिलांची जबाबदारी यासारख्या विविध सामाजिक बाबी अर्भकमृत्यू साठी जबाबदार आहेत.

**आपली प्रगति तपासा :**

**१.** जननक्षमतेवर नियंत्रण करणाऱ्या अप्रत्यक्ष सामाजिक घटकांची यादी करा.

munotes.in

**२.** जननक्षमतेवर नियंत्रण करणाऱ्या प्रत्यक्ष सामाजिक घटकांची यादी करा.

---

## २अ.४ मर्त्यता

---

### २अ.४.० प्रस्तावना

सर्व मानव प्राणी हे मर्त्य असल्यामुळे केव्हा न केव्हातरी त्यांना मृत्युला सामोरे जावेच लागते. जन्मास आल्यानंतर मानवी शरीराचे जीवन दर्शविणाऱ्या सर्व खुणा कायमच्या नष्ट होणे याला मृत्यू असे म्हणतात मृत्यूच्या प्रक्रियेमुळे विशिष्ट भूप्रदेशांची लोकसंख्या ही संतुलित राहते. जेव्हा लोकसंख्या वाढत असते तेव्हा ही मृत्युची संख्या प्रक्रिया चालूच असते. मृत्यू ही प्रक्रिया नसती तर मानव वंशाने जगातील सर्व भूमी केव्हाच व्यापली असती व आपल्या ग्रहांवर केवळ पाय ठेवायला सुद्धा जागा उरली नसती.मृत्युचे प्रकार व मृत्युदर या गोष्टी आपल्याला लोकसंख्येतील बदल जाणून घेण्यास मदत करीत असल्यामुळे आपण त्याचा अभ्यास करतो, तसेच त्यावरून राज्यातील लोकांच्या आरोग्याचा निर्देशांक समजण्यास मदत होते.

शारीरिक अपंगत्वामुळे चलन वलन विषयक अडथळे निर्माण होतात. मुख्यत्वे करुन हात, पाय, डोळे, कान यांचेशी संबंधित घटकांचा संबंध अधिक येतो. पैकी जोडीतील एक अवयव किंवा दोन्ही अवयव नसणे, कमकुवत वा निकामी असणे यामुळे व्यक्तीच्या बाह्य दिसण्यासोबत त्याच्या सर्वसामान्य वर्तनावर देखील मोठ्या प्रमाणात प्रभाव पडून आपण इतरांच्या तुलनेत अपूर्ण आहोत किंवा इतरांवर आपण विसंबून आहोत अशा प्रकारची भावना निर्माण होण्याची प्रक्रिया यामुळे घडू शकते. सामान्य शारीरिक वर्तन करण्यात अनेक प्रकारच्या अडथळ्यासोबत संघर्ष करावा लागतो. पालक, सहकारी यांचे सातत्याने सहाय्य घ्यावे लागते. सार्वजनिक ठिकाणी अपंग व्यक्ती त्यांच्या शारीरिक लक्षणामुळे अधिक अधिक ओळखली जाते. अशा अपंगासंदर्भात नकारात्मक वृत्ती अनेक ठिकाणी दिसून येते. अधिक सहानुभूती, तुच्छता, द्वेष, अपमान अशा समस्यांना वारंवार सहन करावे लागते. सततच्या हिन दर्जाच्या वागणूकीमुळे अपंग व्यक्तींमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होत जाते.

**मानसिक घटकांशी निगडीत समस्या :**

मानसिक आजारांशी संबंधित अपंगत्वाबाबत विशेष स्वरूपात लक्ष द्यावे लागते. गतीमंदत्व आणि वर्तन विभिन्नता या विषयांशी निगडीत सातत्याने प्रश्न निर्माण होत असतात. गतिमंदत्वासंदर्भात कार्य करणाऱ्या विशेष शाळा आणि प्रशिक्षण केंद्र उपलब्ध असली तरी या प्रकारच्या अपंग व्यक्तींचे सामाजिक स्विकृतीच्या अनुषंगाने प्रश्न निर्माण होतात. अन्य समाजसदस्यांशी अकारण दूरत्व निर्माण होते. पालक, प्रशिक्षक आणि डॉक्टर वगळता अन्य समाजघटकांशी सहजपणे समायोजन साधता येत नाही.

**सामाजिक घटकांसंदर्भातील समस्या :**

समाज नेहमी बहुत्वधारक पद्धतीने चालतो त्यामुळे आपल्यापेक्षा वेगळ्या आणि अल्पसंख्यांक गटांना मोठा गट स्विकारत नाही. यामुळे अपंग लोक समाजात अधिक दूर्लक्षित असतात. काही लोक अपंगांना सामाजिक ओझे समजतात त्यामुळे सातत्याने हेळसांड करणे, अपमान करणे आणि कमी लेखणे अशा प्रकारच्या समस्या अपंगांना भोगाव्या लागू शकतात.

कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, शेजारी आणि कामाच्या ठिकाणचे सहकारी यांचे वर्तन अपंगांसाठी सन्मान देणारे असेलच असे ठामपणे सांगता येत नाही. समाजात वावरतानाही अन्य समाज सदस्यांकडून अपंगांना योग्य वागणूक मिळत नाही. अपंगांना दूर्बल घटक समजून त्यांना त्यांच्या हक्काच्या सामाजिक दर्जापासून दूर ठेवले जाते.

**आर्थिक विषयासंदर्भातील समस्या :**

आर्थिक सक्षम होणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. असे असले तरी आर्थिक घटकांच्या बाबतीत अपंगांना सक्षम होण्यास अडचणी येतात. कौटुंबिक संपत्तीतही अपंगाना समान हक्क आणि उपभोग मिळेल असे सांगता येत नाही. अपंगांना देण्यात येणाऱ्या शासकीय सेवा सुविधांचा लाभ मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. कामाचे ठिकाण, नोकरी, स्वयंरोजगार अशा अनेक आर्थिक सक्षमतेच्या जागा अपंगांसाठी राखीव असल्या तरी त्या संदर्भात न्यायिक भूमिका संबंधित प्रशासन व सामाजिक घटकांकडून घेतल्याचे दिसत नाही. आर्थिक कमकुवततेमुळे अनेक अपंगांना भिक्षावृत्ती स्विकारावी लागते.

अपंगांच्या समस्येंची यादी यापेक्षा मोठी आहे. सामाजिक पातळीवर पूनर्वसन करण्याच्या हेतूने अनेक शासकीय योजना आणि व्यवस्था असल्या तरी प्रशासकीय दिरंगाई आणि तांत्रिक बाबींमुळे अपंगांपर्यंत सेवा सुविधांचा लाभ पोहचत नाही. यामुळे अपंगांच्या विविध समस्यांमध्ये वाढ झाल्याचे दिसते.

**आपली प्रगती तपासा**

१) अपंगांसमोर असणाऱ्या समस्या मांडा.

munotes.in

## ६.१.६ कायद्यातील प्रमुख तरतूदी

दिव्यांगजनांना सन्मानपूर्वक जीवनासाठी नव्या कायद्या अंतर्गत १०२ प्रमुख सुधारणा अंतर्गत अनेक उपकलमांचा समावेश केला गेला आहे. यातील काही प्रमुख तरतूदी पुढीलप्रमाणे सांगता येतात.

a. कलम ३ अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना समानता, सन्मान, आदर आणि सचोटी या विषयीचे हक्क इतरांप्रमाणे बजावता येतील. यासाठी शासनाची जबाबदारी महत्त्वपूर्ण असेल.

b. कलम ४ अंतर्गत दिव्यांग स्त्रिया व बालके हे त्यांचे हक्क इतरांप्रमाणेच उपभोग घेण्यास पात्र असतील. स्थानिक शासन व प्राधिकरणे या कामी मदत करतील.

c. कलम ५ अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना समाजामध्ये सन्मानाने राहण्याचा अधिकार, कोणत्याही विशिष्ट ठिकाणी वा निवासी व्यवस्थेत राहणे त्यांना बंधनकारक असणार नाही.

d. कलम ५ अंतर्गत अत्याचार, अमानुष आणि अपमनास्पद वागणुकीपासून संरक्षण देण्यासाठी उपाययोजना यांची यात तरतूद केली गेली आहे.

e. कलम ७ मधील तरतूदीं अंतर्गत दिव्यागांना शोषण, हिंसा यापासून कायदेशीर मदतीची उपलब्धी केली आहे.

f. कलम ८ अंतर्गत सर्व प्रकारच्या मानवी तसेच नैसर्गिक आपत्ती प्रसंगात समान सुरक्षितता व संरक्षण मिळावे. तसेच जिल्हा स्तरावर अपंग व्यक्तींचा तपशील नोंद करावा या संदर्भात सूचना आहेत.

g. कलम ९ अंतर्गत अपंग बालकांना वा व्यक्तींना त्यांच्या पालकांपासून वेगळे करता येणार नाही. न्यायालयाच्या निर्देशांच पालन कठीण प्रसंगा अंतर्गत केले जाईल.

h. कलम १० अंतर्गत पुनरूत्पादन, आरोग्य सेवा या संदर्भात तरतूदी आहेत.

i. कलम ११ अंतर्गत नागरी हक्काचा भाग म्हणून निवडणूक आयोग मतदानाच्या प्रक्रियेत सुलभता प्रदान करेल.

j. कलम १२ अंतर्गत भेदभावाशिवाय न्यायालयीन व शासकीय इमारतीत प्रवेशाचा अधिकार याची योजना आहे.

k. कलम १३ अंतर्गत मालकी हक्क व आर्थिक हक्क दिले गेले आहेत.

l. कलम १४ अंतर्गत पालकत्वासंबंधी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

m. कलम १६, कलम १७, कलम १८ व कलम १९ अंतर्गत शिक्षण, शिष्यवृत्ती, व्यावसायिक शिक्षण, स्वयंरोजगार संदर्भातील तरतूदी आहेत.

n. कलम २० अंतर्गत शासकीय सेवा सुविधा, बढती, कर्मचारी नियुक्ती व स्थानांतरण संदर्भातील तरतूदी आहेत.

o. कलम २२ व २३ अंतर्गत शासकीय स्तरावर दिव्यांगांच्या अभिलेखांची नोंद ठेवली जाईल. प्रत्येक आस्थापना, रोजगार केंद्र अशा प्रकारच्या नोंदी ठेवतील. अभिलेखे बंधनकारक असतील. अपंगांच्या तक्रार निवारणीसाठी विशेष समिती नेमण्यात येईल. जिल्हास्तरावर विशेष विभाग यासाठी चालविला जाईल.

p. कलम २५ अंतर्गत दिव्यांगाना प्राधान्याने आरोग्य सेवेचा लाभ देण्यासंदर्भात तरतूद आहे.

q. कलम २९ व ३० अंतर्गत दिव्यांगाना सांस्कृतिक आणि इतर मनोरंजनाच्या उपक्रमात सहभागी होण्याचा समान अधिकार राहिल. अपंग कलाकारांसाठी विशेष तरतूद करण्यात येईल, क्रीडा विषयक सुविधा मिळविण्यासाठी ते पात्र राहतील.

r. कलम ३४ व ३५ अंतर्गत शासकीय अस्थापनेत चार टक्के तर खाजगी क्षेत्रात पाच टक्के आरक्षण असेल.

s. कलम ३७ अंतर्गत शेतजमीन आणि घर विषयक अधिकार व आरक्षण, अपंग महिलांसाठी तरतूद

t. कलम ३८ अंतर्गत लक्षणीय अपंगत्वासाठी विशेष सहाय्याची तरतूद

u. कलम ४१ अंतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांच्या ठिकाणी तिकीट काऊंटर, शौचालय इत्यादींची अपंग व्यक्तींशी सुसंगत सोय संदर्भात तरतूद.

v. कलम ७४ अंतर्गत मुख्य आयुक्त तर कलम ७९ नुसार राज्य आयुक्तांची नेमणूक अपंगांना न्याय देण्यासाठी.

w. कलम ८४ व ८५ नुसार विशेष सरकारी वकीलांची उपलब्धी अपंगांसाठी करण्यात येईल.

x. कलम ८८ नुसार राज्य विशिष्ट निधीची तरतूद अपंगांसाठी करेल.

y. कलम ८९ नुसार अपंगांसंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यास दंडाची तरतूद व सोबत शिक्षा

z. कलम ९२ व ९३ अंतर्गत अपंगांना कोणत्याही प्रकारची अप्रतिष्ठा, शोषण, अन्याय करणाऱ्यास दंड आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अपंगांच्या शारीरिक, मानसिक व आर्थिक संरक्षणासाठी विविध कायद्यांचा समावेश या कलमा अंतर्गत करण्यात आला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) दिव्यांगजन कायदा २०१६ मधील प्रमुख तरतूदी स्पष्ट करा.

## ६.१.७ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीचे विशेष अधिकार व योजना

दिव्यांगजन बालकांच्या शिक्षणासाठी विविध प्रकारच्या शासकीय उपयोजनांची निर्मिती करण्यात आली आहे. ज्या बालकांना बोधांत्मक, वर्तनात्मक व मेंदूविषयक अपंगत्व असेल अशा मुलांसाठी विशेष शाळांची निर्मिती केली जाते. अशा बालकांसाठी विशेष साधनसाहित्य पुरविले जाते. श्रवणदोष, दृष्टिदोष असणाऱ्या बालकांसाठी विशेष प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती केली

जाते. मानसिक कमकुवत बालकांसाठीही विशेष प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती केली जाते. वर्गखोलीत मदत, शाळेत सहजसाध्य सुविधा, परीक्षेत लेखनिक, परीक्षेसाठी अधिक वेळ, उपयोगी साधने आणि उपकरणे यांची पूर्तता केली जाते. विशेष शाळांच्या मदतीने कार्यात्मक कौशल्ये व व्यवसाय पूर्व कौशल्ये प्रदान केली जातात. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणासोबतच उच्चशिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांकरिता विविध प्रकारच्या सेवा सुविधांची निर्मिती करण्यात आली आहे.

दिव्यांगजन कायद्यातील कलम १६, कलम १७, कलम १८ व कलम १९ अंतर्गत शिक्षण, शिष्यवृत्ती, व्यावसायिक शिक्षण, स्वयंरोजगार संदर्भातील तरतूदी आहेत. या तरतूदीनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सन्मानपूर्वक शिक्षण व सक्षमीकरणासाठी अनेक सेवासंधी निर्माण करण्यात आल्या आहेत.

i. अपंगांच्या प्रवेशासाठी व शैक्षणिक परिसरातील वावरासाठी उपयुक्त अशा जागांची निर्मिती या अंतर्गत रॅम्प, बसण्याचे वा उभे राहण्याचे टेबल, स्वच्छतागृह यांचा समावेश आहे.
ii. शैक्षणिक सवलतींसोबत विशेष शिष्यवृत्ती देण्यात येणार, प्रवेश प्रक्रियेत विशेष आरक्षण
iii. व्यावसायिक शिक्षणक्रमांना प्रवेश आणि प्रशिक्षण संधी, अपंगत्वाच्या कारणावरुन त्यांचे हक्क नाकारता येणार नाहीत अन्यथा शैक्षणिक संस्थेवर कारवाई.
iv. स्वयंरोजगारासाठी विशेष अल्प दराने कर्जउपलब्धी करण्यात येईल.

या माध्यमातून अपंगाना शैक्षणिक संधी आणि सक्षमीकरणासाठी मदत देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

## ६.१.८ सारांश

अपंगत्व या दूर्लक्षित घटकांकडे सामाजिक न्याय भावनेतून लक्ष दिले गेले पाहिजे. याकरिता शासनाने दिव्यांगजन अधिकार कायदा २०१६ अंतर्गत विशेष तरतूदी केल्या आहेत. दिव्यांगजनांना सन्मानपूर्वक जगण्याचा, आपली प्रगती करण्याचा व समाजातील एक प्रतिष्ठित घटक बनण्याचा परिपूर्ण हक्क आहे. दिव्यांगजनांचे कोणही शोषण करता कामा नये तसेच त्यांना अनादर युक्त वागणूक देऊ नये यासाठी विशेष कायद्याची तरतूद या विधेयका अंतर्गत करण्यात आली आहे. अनेकवेळा प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगताना शारीरिक संघर्षासोबत सामाजिक घटकांतील संघर्ष त्यांना करावा लागतो. यासाठी दिव्यांगाना त्रास देणाऱ्या किंवा अपमानास्पद वागणूक देणाऱ्यांवर ॲस्ट्रॉसिटीचा गुन्हा नोंद होऊन त्यांना दंड व सहा महिने ते पाच वर्षापर्यंत सक्त कारावासाची शिक्षा ठोठावण्याची तरतूद नव्या कायद्याने केली गेली आहे.

शिक्षण, नोकरी, व्यवसाय आदींसाठी विशेष सवलत व आरक्षण आणि आर्थिक अनुदान यांचा समावेश नव्या कायद्याने केला असून यातून दिव्यांगजनांमध्ये आत्मविश्वास, सुरक्षा व आर्थिक सक्षम होण्याकरिता प्रोत्साहन दिले गेले आहे. सरकारी, निमसरकारी व खाजगी क्षेत्रातील आरक्षणासाठी केंद्र व राज्य स्तरावर काही योजनांची निर्मिती करण्यात आली आहे. अनुदानीत उच्चशिक्षणसंस्था, शिक्षण व प्रशिक्षण संस्था यामध्ये किमान ५ टक्के जागा राखीव ठेवणे, स्वयंरोजगारासाठी अल्प दराने कर्ज उपलब्धी यातून दिव्यांगाना सक्षमतेकडे घेऊन

munotes.in

जाण्याचा प्रयत्न केला गेला आहे. विधेयक लागू झाल्यापासून सर्व पाच वर्षांच्या आत सर्व सार्वजनिक इमारती, हॉस्टिपल्स, पोलिंग बुथ, वाहतूक व्यवस्था अडथळा मुक्त म्हणजेच अपंगांच्या सोयीची करण्यात येईल. यापुढे कोणतीही सार्वजनिक इमारत अपंगासाठी सुयोग्य आणि अडथळा विरहित केल्याशिवाय त्याचे ताबा देण्यात येणार नाही. अपंग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वाच्या आधारे कोणताही भेदभाव करता येणार नाही. अपंगत्वामुळे त्यांच्या व्यक्तीस्वातंत्र्यांवर कोणतेही बंधन घालता येणार नाही. सदर कायद्यातील तरतुदींचा भंग करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र राहिल. दिव्यांगांसोबत भेदभाव केल्यास सहा महिन्यांपासून दोन वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दहा हजारापासून ते पाच लक्षपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

## ६.१.९ सरावासाठी प्रश्न

१. अपंगत्व / दिव्यांगजन ही संकल्पना स्पष्ट करा.
२. अपंगत्वाचे प्रकार सांगा.
३. अपंगांच्या विविध समस्यांची चर्चा करा.
४. दिव्यांगजन हक्क कायदा २०१६ ची चर्चा करा.
५. अपंगांना सन्मानपूर्वक वागणूक याची तुम्हाला आवश्यकता वाटते का? आपल्या उत्तराचे समर्थन करा.

## ६.१.१० संदर्भ साहित्य

१. दिव्यांग कल्याण के विविध आयाम प्रियदर्शी मिश्र
२. विकलांग व अपंगासंबंधी शासन निर्णय व परिपत्रके अॅड. अभया शेलकर, नाशिक लॉ हाऊस
३. विकासपिडीआ
४. https://vikaspedia.in/social-welfare/differently-abled-welfare/disability-in-india

❖❖❖❖

# ६.२

# सरोगसी आणि पुनरूत्पादनाचे राजकारण

# SURROGACY AND POLITICS OF REPRODUCTION

**घटक रचना :**

६.२.० सरोगसी आणि पुनरूत्पादनाचे राजकारण
६.२.१ प्रस्तावना
६.२.२ विषयप्रवेश
६.२.३ महत्त्वाच्या संकल्पना
६.२.४ सरोगसी नियमन कायदा २०१६
६.२.५ वादाचे मुद्दे
६.२.६ सारांश
६.२.७ सरावासाठी प्रश्न
६.२.८ संदर्भ ग्रंथ

## ६.२.० सरोगसी आणि पुनरूत्पादनाचे राजकारण (SURROGACY AND POLITICS OF REPRODUCTION)

जैववैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे पुनरूत्पादन व्यवस्थेत क्रांतीकारी बदल झाले आणि या बदलाचे परिणाम म्हणून सकारात्मक अशा वैज्ञानिक बाजूला बाजारपेठीय ग्रहण लागले. स्त्री ची पुनरूत्पादनाची शक्ती ही बाजारपेठेतील वस्तू झाली. पैशाची उलाढाल वाढली आणि यातूनच मानवाधिकार आणि नैतिकता या संदर्भातही प्रश्न निर्माण होऊ लागले. शासनाचे नियंत्रण नसल्याने अनेक चुकीच्या पद्धती पुढे येऊ लागल्या यावरील कायदेशीर नियंत्रणासाठी सरोगसी संदर्भातील विधेयक मांडण्यात आले. सरोगसीच्या बाजारीकरणाला निर्बंध घालण्याचे ठरविले गेले.

## ६.२.१ प्रस्तावना

प्राचीन कथापुराणांमधून आपले मुल इतरांना दिल्याच्या अनेक गोष्टी आहेत. त्या गोष्टी मनोरंजक आणि आकर्षकही वाटतात. कृष्ण आणि कर्ण हे देखील आपल्या मुळ आईपासून वेगळ्या आईकडे वाढल्याचे गोष्टीरूपात वाचावयास मिळते. पुराणकल्पना म्हणून या प्रसंगांकडे दैवी म्हणून पाहता येते. बाबीलॉनियन संस्कृतीच्या संदर्भात देखील आपले मूल दूसऱ्यास

देण्यासंदर्भात उल्लेख आहेत. सद्यकाळात असे आपले मुल दुसऱ्या घरी सहजपणे कोणही देऊ शकत नाही. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे काही विशिष्ट प्रसंगातून आपले मुल अन्य स्त्रीच्या उदरामध्ये वाढविण्याचे प्रयोग यशस्वी झाले आणि काही नैसर्गिक कारणामुळे मुल होण्यात असमर्थ असलेल्या व्यक्तींना आपले मुल जन्मास घालण्याची संधी मिळाली. या प्रकारांतून पुढे सरोगसी या व्यवस्थेचे व्यापारीकरण होऊ लागले आणि या एकूण व्यवस्थेविषयी काही वादाचे विषय पुढे येऊ लागले. कायदेशीर बाबी, फसवणूक, बाजारीकरण, बालकाचे नैसर्गिक हक्क या संदर्भात अनेक चर्चा पुढे येऊ लागल्या. सरोगसी शाप का वरदान अशी स्थिती निर्माण झाली आहे.

## ६.२.२ विषयप्रवेश

वंध्यत्वावर मात करण्यासाठी मानवी शरीर विज्ञानाच्या आधारावर अनेक प्रयोग केले गेले आणि या प्रयोगांतून अपत्य प्राप्तीचा मार्गही उपलब्ध झाला. अक्षम मातापिता आपल्या बीजांतून निर्माण झालेला भ्रुण अन्य सक्षम स्त्रीच्या गर्भात विकसित होण्यासाठी ठेवतात व अपत्य जन्मास आल्यावर ते आपल्या ताब्यात घेतात. या कामासाठी त्या स्त्रीला मानधन स्वरूपात रक्कम दिली जाते. यासाठी मदत करणाऱ्या तांत्रिक घटक यांनाही पैसे दिले जातात. एका अर्थाने हा एक देवघेव व्यापार ठरतो.

भारतात येऊन सरोगसीच्या माध्यमातून मूल मिळविणाऱ्या परदेशी जोडप्यांच प्रमाण आजही इतकं मोठ आहे की त्यातून दरवर्षी दीडशे कोटींच्या जवळपास पोहचणारी बाजारपेठ विकसित झाली आहे. कोणत्याही स्त्रिला तिच्या शरीराचा असा वापर करावा लागणे ही त्या त्या समाजाची नामुष्की नाही का? वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या इतर जाहिरातींप्रमाणेच गर्भाशय भाड्याने देणे किंवा घेणे आहे अशा जाहिराती प्रसिद्ध होण्यास सुरुवात झाली आहे. सरोगसीच्या माध्यमातून मुल ही संकल्पना रूजली आहे. अनेक सेलिब्रेटींनी सरोगसीच्या माध्यमातून मूल मिळविल्यानंतर त्याबद्दल प्रसारमाध्यमांमधून मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरु झाली आहे. त्यामुळे सरोगसीला एकदम ग्लॅमर प्राप्त झाले आहे. याच व्यापाराला बाजारपेठीय स्वरूप प्राप्त होऊ घातले आहे. अशा वेळी नैसर्गिक जनन आणि तंत्रविज्ञानात्मक पुनरूत्पादन व्यवस्था यांतील तफावत यांची चर्चा होणे साहजिकच आहे. सरोगसीच्या माध्यमातून अपत्य प्राप्ती ही चांगली बाब असली तरी अशा पद्धतीचे पुनरूत्पादन नव्या काही वादविषयांनाही जन्म देते. याची सविस्तर मिमांसा आपण सदर प्रकरणात करणार आहोत.

## ६.२.३ महत्त्वाच्या संकल्पना

सरोगसी ही अशी व्यवस्था आहे जी विशिष्ट कायद्याद्वारा समर्थन प्राप्त करुन एक स्त्री दुसऱ्या व्यक्तीसाठी जन्म देण्यास सहमत होते आणि ती दुसरी व्यक्ती त्या बालकाचे कायदेशीर पालक बनते.

सरोगसी हे असे पुनरूत्पादन तंत्रज्ञान आहे की ज्यात गर्भधारणेस व गर्भपोषणास अक्षम असलेल्या स्त्री ऐवजी अन्य स्त्री गर्भधारणा करते आणि अपत्य जन्मानंतर अपत्य मूळ

munotes.in

पालकांना दिले जाते. काहीवेळेस अविवाहित पुरुष अशा पद्धतीने आपले मुल प्राप्त करु शकतात.

सरोगेट मदर दूसऱ्याचे मुल आपल्या गर्भाशयात वाढविणारी स्त्री
सरोगेट बेबी मूळ आई व्यतिरिक्त अन्य स्त्रीच्या गर्भाशयात वाढ झालेले अपत्य

**आपली प्रगती तपासा**

१) सरोगसी म्हणजे काय? सरोगसी संकल्पनेची कोणतीही एक व्याख्या सांगा.

## ६.२.४ सरोगसी नियमन कायदा २०१६

सरोगसी म्हणजे कोणत्याही कारणाने मूल जन्माला घालण्यास असमर्थ असलेल्या जोडप्याने मूल जन्माला घालण्यास समर्थ असलेल्या स्त्रीने गर्भाशय भाड्याने घेऊन त्यात आपला गर्भ वाढवून जन्माला घालणे.

आपल्या देशात गुजरातमध्ये आणंद जवळच्या खेड्यांमध्ये तसेच मोठ्या शहरांतील गरीब वस्त्यांमध्ये सरोगसी फोफावली होती. सरोगसी संदर्भातील नियमांवर कायदेशीर नियंत्रण नव्हते. एक वेगळी बाजारपेठीय व्यवस्था यातून विस्तारली जात होती. इंटरनेटच्या सहाय्याने या व्यवस्थेची माहिती प्राप्त करुन परदेशी लोकांनी अपत्य प्राप्तीसाठी प्रयत्न सुरु केले. त्यातून निर्माण झालेल्या स्त्री गर्भाच्या व्यापारीकरणाला आळा घालणे यासाठी कायदेशीर प्रयत्न करणे गरजेचे होते.

मूल जन्माला येण्याच्या जैविक चक्राला तंत्रविज्ञानाची जोड देऊन स्त्री मुल जन्माला घालण्याचे मशीन बनवायचे काय? अशाप्रकारच्या नैतिक प्रश्नांतून कायद्याची आवश्यकता वाटू लागली.

१. सरोगसीच्या माध्यमातून मूल प्राप्त करण्याची प्रक्रिया वरकरणी सोपी वाटत असली तरी त्यात अनेक गुंतागुंतीच्या प्रक्रियांचाही भाग आहे. जैविक, सामाजिक, आर्थिक घटकांचा त्यात समावेश आहे. यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर नियंत्रण आणण्याकामी सरोगसी कायदा बनवित गेला.

२. सरोगसी नियमन कायदा २०१६ कायदा अंतर्गत देशांतर्गत आणि परदेशी जोडप्यांना व्यापारी सरोगसी करता येणार नाही. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच अपत्य प्राप्ती करता येईल.

३. कायदेशीर विवाह झालेल्या व विवाहास किमान पाच वर्षे झालेल्या अपत्यहीन दाम्पत्यास नात्यातील महिलेच्या मदतीने मूल जन्मास घालणे शक्य होणार आहे.

४. समलैंगिक संबंध असलेल्या आणि लिव्ह इन रिलेशन मधील जोडप्यास या कायद्याचा लाभ मिळणार नाही.

५. या विधेयकानुसार अनिवासी भारतीयांना सरोगसीची परवानगी दिली आहे, परदेशी जोडप्यांना मनाई करण्यात आली आहे.

६. सरोगसीतून मूल हवे असलेल्या भारतीय पतीपत्नीपैकी पत्नीचे वय २३ ते ५० आणि पतीचे वय २६ ते ५५ दरम्यान असणे अनिवार्य आहे.

७. लग्नास पाच वर्षानंतरही मूल होत नसल्यास ते सरोगसीसाठी प्रयत्न करु शकतात. या दाम्पत्याच्या नात्यात असलेल्या विवाहित महिलेला एकदाच सरोगेट आई होण्याची परवानगी मिळेल.

८. व्यावसायिक सरोगसीसाठी पैसे देणाऱ्यांना पाच वर्षापर्यंत तुरुंगवास ठोठावण्यात येईल.

९. नात्यामध्ये सरोगसी करताना लिंगनिश्चितीवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. संबंधित जोडप्यास आधीचे मुल असल्यास किंवा त्यांनी एखादे मूल दत्तक घेतले असल्यास ते सरोगसीतून मूल जन्माला घालू शकणार नाहीत. त्यांना गतिमंद किंवा अपंग मूल असेल किंवा मुलाला असाध्य आजार झाला असेल तरच ते सरोगसीतून मूल जन्माला घालू शकतात.

१०.नवीन विधेयकानुसार सरोगसी करणारी क्लिनिक्स नोंदणीकृत असतील. क्लिनिक सरोगसीसाठी देत असलेल्या सेवेचे पैसे आकारु शकते, पण सरोगेट मदरला पैसे घेता येणार नाहीत. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवरील सरोगसी नियंत्रक मंडळे या सगळ्यांवर देखरेख करतील.

११.सरोगसी संदर्भातील जाहिरातींवर बंदी.

१२.फॅशन आणि फिगरच्या नावाखाली सरोगसीवर बंदी.

**महत्त्वाच्या तरतूदी :**

१. सरोगसीचा पर्याय निवडणाऱ्या माता पित्यांसाठी आवश्यक बाबींचा समावेश.

२. कोणत्याही प्रकारच्या व्यावसायिक सरोगसीला निर्बंध.

३. सरोगसी संदर्भात घडणाऱ्या गुन्ह्यांबाबत जास्तीतजास्त १० वर्षाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

४. सरोगसीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर सरोगेट मदरला तिच्या गर्भाशयात गर्भ सोडण्याआधीच्या टप्प्यापर्यंत या प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा अधिकार देण्यात आला आहे. संबंधित जोडप्याने तिचा १६ महिन्यांचा विमा काढायचा आहे. या १६ महिन्यांत बाळंतपणानंतर निर्माण होऊ शकणारी गुंतागुंत गृहित धरुन नंतरचा सहा महिन्यांचा काळ धरला आहे.

munotes.in

स्थायी समितीने सरोगसीच्या संदर्भातील लाभ घेणाऱ्या व्यक्तींची व्याख्या व्यापक केली होती यात लिव्ह इन मध्ये राहणारी जोडपी, घटस्फोटीत, नवऱ्याचा मृत्यू झालेली स्त्री यांचा विचार करण्याची शिफारस केली होती मात्र ही शिफारस विचारात घेतली गेली नाही.

**आपली प्रगती तपासा**

१) सरोगसी कायद्यातील प्रमुख तरतूदींचे वर्णन करा.

## ६.२.५ वादाचे मुद्दे

अपत्यहीन जोडप्यांसाठी सरोगसी हे मूल मिळविण्याचे उत्तम माध्यम होते असे असले तरी यामुळे सरोगसीचे झालेले व्यापारीकरण ही चिंतेची बाब होती. गुजरातमध्ये सरोगेट मदरसाठी शेकडो स्त्रिया एकत्र हॉस्टेलमध्ये ठेवण्यात आल्या होत्या. आपले गर्भाशय भाड्याने देणाऱ्या या स्त्रिया समाजातील निम्न स्तरातील होत्या. सरोगसीतून मूल मिळविणाऱ्या जोडप्याला याकामी १५ ते २० लाख खर्च करावा लागतो. यातील डॉक्टर्स, एजंट, व्यवस्थापन यांत खर्च होऊन सरोगेट मदरचा चार ते पाच लाखापर्यंत पैसे मिळतात.

आपल्या पत्नीला एखाद्या नवऱ्याने यासाठी जबरदस्तीने तयार केले असेल तर सर्व पैसा नवराच ताब्यात घेतो. मूल जन्माच्या आधी दगावलं तर कोणतेही पैसे मिळत नाहीत. मूल अपंग जन्मास आल्यास किंवा भविष्यात त्या मूलाच्या पालकांचा घटस्फोट झाल्यास त्या मूलाची जबाबदारी कुणाची.

एकूणच प्रजनन क्षमता ही स्त्रियांचे सामर्थ्य मानले गेले तर या क्षमतेचा व्यापारासाठी वापर करावा किंवा नाही यासंदर्भात निर्णय कोण घेणार? देहाचे वस्तूकरण, व्यापारीकरण आणि अनैसर्गिक शोषण यांवर नियंत्रण कोणाचे? जैविक कृतीचे यांत्रिकीकरण करणे आणि एका विशेष व्यापारी क्षेत्राची निर्मिती करणे हे नैतिकतेच्या चौकटीत बसणारे वाटत नाही.

व्यावसायिक सरोगसीतून भारतात दरवर्षी दोन हजार अपत्य जन्मास येतात. यातून दरवर्षी कोट्यवधींची उलाढाल होते. काही नियमांशिवाय सरोगसीत कोणताच अंकुश नव्हता. विज्ञानाच्या प्रगतीचा वापर करुन पैसेवाल्या परदेशी नागरिकांनी गरीब देशातील स्त्रियांचे अशाप्रकारे शोषण करावे हे योग्य ठरते का? डान्सबारमध्ये नाचणाऱ्या मुली आपल्या व्यवसायाचे समर्थन करतात त्याप्रमाणे सरोगसी माध्यमातून पैसे मिळविणारी स्त्री देखील आपल्या कामाचे समर्थन करते. पैशाच्या जोरावर काहीही शक्य आहे ही भावना निर्माण होणे समाजासाठी योग्य ठरेल काय याचा विचार केला गेला पाहिजे.

munotes.in

जन्मणाऱ्या बाळाचे मानवाधिकार आपण नाकारू शकत नाही. सरोगेट बेबी एका आठवड्याभरात त्याच्या मुळ पालकांना देण्यात येते पण या सर्व प्रकारात त्या बाळाचे मानवी अधिकार आपण हिरावून घेतोच. सरोगेट मदरच्या बाळंतपणाची रजा या संदर्भातील वादविवादही तितकाच महत्त्वपूर्ण आहे. ज्या स्त्रिने प्रत्यक्ष बाळाला जन्म दिलेला नाही अशा स्त्रीला बाळंतपणाच्या रजेचे फायदे पुरविणे कितपत योग्य आहे ?

**आपली प्रगती तपासा**

१) सरोगसी संदर्भातील गंभीर घटकांची चर्चा करा.

## ६.२.६ सारांश

सरोगसी म्हणजे वेगवेगळ्या कारणांमुळे मुल होऊ न शकणाऱ्या आणि मुल हवंच अशी मनापासून इच्छा असलेल्या जोडप्यांपैकी पुरुषाच्या शरीरातले शुक्राणू आणि स्त्रिच्या शरीरातील बीजांड काढून त्याचे प्रयोगशाळेत फलन घडवून आणले जाते. त्यातून निर्माण झालेला गर्भ दुसऱ्या स्त्रिच्या गर्भाशयात सोडला जातो. तो त्या स्त्रिच्या शरीरात रूजला की तिच्या माध्यमातून नऊ महिन्यांच्या काळात मुल जन्माला येते. याअर्थी एका जोडप्याचे मुल दुसऱ्या स्त्रिच्या गर्भाशयात वाढते. सरोगसी या शब्दाचे मूळ लॅटीन सरोगेट्स आहे. याचा अर्थ आहे पर्याय. मराठीत त्याला उदरदान असाही शब्द वापरला जात असला तरी आज होत असलेले व्यवहार पाहता दुसऱ्या स्त्रिचे गर्भाशय भाड्याने घेणे वा देणे त्यात आपले मुल वाढविणे आणि त्याचा मोबदला देणे हाच रोकठोक व्यवहार आहे.

जन्मजात गर्भाशय नसणे, गर्भधारणा होण्यात अडचणी, वारंवार गर्भपात होणे, आजारांमुळे गर्भाशय जननक्षम नसणे अशा कारणांमुळे डॉक्टर सरोगसीचा पर्याय सुचवितात. समलिंगी जोडपीसुद्धा मुल हवे असते म्हणून सरोगसीचा पर्याय निवडतात.

सरोगसीचे ट्रॅडिशनल सरोगसी आणि गेस्टॅशनल असे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात जोडप्यातील स्त्रीच्या स्वतःच्या बीजांडाचे जोडप्यातील पुरुषांच्या शुक्राणुंशी मिलन घडवून आणून त्याचे महिलेच्या गर्भाशयात फलन केले जाते तर गेस्टॉशनल सरोगसी या प्रकारात एखाद्या जोडप्यांपैकी स्त्रीचे बीजांड आणि शुक्राणुंचे प्रयोगशाळेत मिलन घडवून आणले जाते आणि तो गर्भ दुसऱ्या महिलेच्या गर्भाशयात ठेवला जातो. नऊ महिन्यानंतर मुल जन्माला आल्यावर ते बाळ संबंधित जोडप्याकडे सोपविले जाते.

सरोगसीची प्रक्रिया सोपी आणि पटकन होणारी नसते. एका सरोगसीसाठी खूप काम केले जाते. काहीही झाले तरी मुल हवंच अशी भूमिका असणाऱ्या व आठ ते बारा लाख खर्च

करण्याची तयारी असणारी जोडपी आपण सरोगसी साठी तयार असल्याचे डॉक्टरांना सांगतात. सरोगसीसाठी काम करणाऱ्या लहान मोठ्या अशा एजन्सीज असतात. लहानात लहान एजन्सी वर्षभरात साधारणपणे १० ते १५ सरोगसी केसेस करतात. तर मोठ्या एजन्सीत एका वेळी २० ते २५ सरोगसी केसेस असतात. या एजन्सीकडे तळागाळात संपर्क असलेले एजंट असतात. पैशांची गरज असलेल्या मुलांचे शिक्षण पूर्ण व्हावे यासाठी आर्थिक गरज असलेल्या स्त्रिया सरोगसीसाठी तयार होतात. तसेच एखाद्या स्त्रिला तिचा नवरा सरोगसी करायला लावतो. फक्त पैसे मिळविण्याच्या दृष्टिकोनातून काही स्त्रिया सरोगसीकडे पाहतात आणि त्या सरोगेट मदर बनण्याचा मार्ग पत्करतात मग त्या एजंटच्या संपर्कात येतात.

सरोगसीतून जन्मलेलं बाळ जन्मल्यानंतर आठवड्याभरातच त्याच्या नैसर्गिक पालकांकडे सोपविले जाते. त्या बाळाला सोरोगेट मदरचे दूध दिले जाते. परंतू सरोगेट मदरचे दूध कधीकधी बाळाला अपुरे पडते त्यामुळे प्रत्यक्ष बाळ जन्माला न घालता काही होर्मोन्सची ट्रीटमेंट घेऊन स्त्री स्तनपान करु शकते. सरोगेट मदरचे त्या जन्मलेल्या बाळाशी कोणतेही भावनिक नाते निर्माण होत नाही. बाळ जन्माला आल्यानंतर ते संबंधित आईवडिलांकडे सोपवून आपले पैसे घेऊन सरोगेट मदर निघुन जाते. हे आपले मुल नाही आपण त्याला फक्त गर्भाशयात वाढविले आहे याची स्वच्छ जाणीव त्यांच्यामध्ये असते. तिथे भावनिक गुंतागुंतीचा मुद्दाच नसतो. त्या बाळाचे नैसर्गिक पालक हे कधीकधी जास्त भावनिक होऊन ठरल्यापेक्षा जास्त पैसे देतात. सरोगेट मदरला, तिच्या मुलांना कुटुंबांना भेटवस्तू देतात. आपलं बाळ तिच्या गर्भाशयात नीट वाढावं यासाठी तिची जास्तीत जास्त काळजी घेतात.

विकसित देशांमध्ये सरोगसीसाठी भारतापेक्षा ५ ते ६ पट अधिक खर्च येत असल्याने भारतात येऊन सरोगसी मुल मिळविण्यात परदेशी जोडप्यांचे प्रमाण मोठे आहे. जपान, चीन, फ्रान्स या देशात सरोगसीवर बंदी आहे. रोमन कॅथलिकांचा प्रभाव असलेल्या काही देशांमध्ये सरोगसी, गर्भपात यावर बंदी आहे. शारीरिक असमर्थतेमुळे मुल होऊ न शकणारी जोडपी, समलिंगी जोडपी यांचे भारतात येऊन सरोगसीतून मुल मिळविण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची ओळख सरोगसी हब अशीच आहे. सरोगसीसाठी भारतात येणाऱ्या परदेशी जोडप्यांसाठी भारत सरकारने काही नियम लागू केले आहेत. त्यानुसार टुरिस्ट व्हिसावर येऊन सरोगसीतून मुल मिळवता येणार नाही. सरोगसीतून मुल मिळवू इच्छिणाऱ्या जोडप्याच्या लग्नाला दोन वर्ष पूर्ण झाली असली पाहिजेत. अशा निकषांमुळे सरोगसीमुळे अगदी सहज भारताकडे वळणारी पावले आता थायलंड, मेक्सिको अशा देशांकडे वळायला लागली आहेत.

सरोगेट करणारी स्त्री विवाहित असणे तिला स्वतःची एक किंवा दोन मुले असणे अपेक्षित आहे. तिच्या नवऱ्याचीही संमती असावी लागते व ती संमती लेखी लिहून घेतली जाते. सरोगेट मदरला सरोगसीसाठी एकूण अडीच ते तीन लाख रूपये मिळतात. सिझरिन करावे लागले तर पन्नास हजार रूपये ठरल्यापेक्षा अधिक मिळतात. जुळी मुले झाली तरी पैसे वाढतात. कोणत्या टप्प्यावर किती पैसे मिळणार हे आधीच ठरलेले असते. हे पैसे एजन्सी कडून त्यांना टप्प्याटप्प्याने मिळतात. सरोगसी मदरच्या नावाने बँकेत अकाऊंट उघडून त्या अकाऊंटचे चेक तिला दिले जातात. सरोगेट मदरकडून आपल्याला सगळे पैसे मिळाले हे स्टँप पेपरवर लिहून घेतले जाते.

munotes.in

सरोगसीच्या माध्यमातून अनेकांना माता पिता होण्याचा आनंद मिळाला आहे. या सगळ्या समांतर यंत्रणा सरोगसीशी संबंध येण्या व्यतिरिक्त कुणाला फारशा माहिती नसतात. हे सगळे आपल्या आसपासच घडत असते पण बहुतेक सर्वसामान्य माणसे अनभिज्ञ असतात. सरोगसीतून मुल जन्माला घालणे ही लोकांना एकदम विज्ञानाची झेपच वाटते तशी ती आहेच पण तिची सामाजिक किंमत काय आणि ती कोण कशी काय मोजते हा मुद्दा महत्त्वाचा आहे. तो विधेयकाने अधोरेखित केला आहे. सरोगसी नियमन विधेयक २०१६ या विधेयकाने सरोगसीच्या व्यापारीकरणाला चाप लावला आहे.

## ६.२.७ सरावासाठी प्रश्न

१. सरोगसी संकल्पना स्पष्ट करा.
२. सरोगसी संदर्भातील कायद्यातील प्रमुख तरतुदी सांगा.
३. सरोगसी संदर्भातील वादविवादावर प्रकाश टाका व तुमचे मत मांडा.

## ६.२.८ संदर्भ साहित्य


१. सती ते सरोगसी मंगला गोडबोले
२. पॉलिटिक्स ऑफ दि वूम्ब पिंकी विराणी. अनु. रेश्मा कुलकर्णी पाठारे मेहता पब्लिशिंग हाऊस.
३. Surrogacy in India Anil Malhotra, Ranjit Malhotras
४. https://dhr.gov.in/sites/default/files/surrogacyregbill 0.pdf


❖❖❖❖

# ७

# गुन्हा आणि न्याय
# CRIME AND JUSTICE

**घटक रचनाः**


७.१ अभ्यासाचे उद्देश

७.२ प्रस्तावना

७.३ कायद्याच्या दृष्टिने गुन्ह्यांची संकल्पना

७.४ समाजशास्त्रीय दृष्ट्या गुन्ह्याची संकल्पना व व्याख्या

७.५ गुन्हेगारीचे स्वरूप व कारणमीमांसा

७.६ गुन्ह्यांचे वर्गिकरण किंवा प्रवाह

७.७ गुन्हेगार पुनर्वसन पद्धती

७.८ पोलीस दल

७.९ सारांश

७.१० सरावासाठी प्रश्न

७.११ संदर्भ सुची


munotes.in

## ७.१ अभ्यासाचे उद्देश

१. गुन्ह्यांच्या विविध स्वरूपाचे संकल्पना स्पष्ट करुन सांगणे.

२. गुन्ह्यांचे स्वरूप कारणांसह माहिती करुन देणे.

३. गुन्ह्यांच्या विविध प्रकाराची परिक्षण करुन देणे.

४. गुन्हेगारांच्या पुनर्वसनासाठी आमलात आणल्या जाणाऱ्या पद्धती स्पष्ट करणे.

५. गुन्ह्या संबंधीत महत्त्वाचा घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोलीस पदाचे रचना व जबाबदारी विस्ताराने माहिती करुन देणे.

## ७.२ प्रस्तावना

'गुन्हा' समाजवृक्षाला पोखरणाऱ्या अनेकविध उपाधीपैकी एक भयंकर उपाधी आहे. गुन्हेगारीचे शास्त्र स्वतंत्र शास्त्र म्हणून अस्तित्वात आले असून गुन्हा व गुन्हेगारी या विषयाचा त्यात स्वतंत्रपणे अभ्यास करण्यात येतो. सामाजिक परिवर्तन ही समाजामधील अपरिहार्य घटना

आहे व सामाजिक विघटन हे सामाजिक परिवर्तनाच्या शतीचे एक अंग आहे. सामाजिक परिवर्तनाचा रोख योग्य दिशेला वळविण्याची जबाबदारी समाज नियंत्रकाची असते.

समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या कायद्यांचे उल्लंघन सतत होत असते. अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक नियंत्रणाचा भंग करणारा मानवी स्वभावधर्म पूरातन काळापासून दृष्टोत्पत्तीस येतो. पूर्वी अस्तित्वात असलेल्या गूंतागूंतीच्या कायद्यांमध्ये कायदेमंडळाने आणखी नवीन कायदे करुन सामाजिक कायद्यांची संख्या वाढविलेली आहे. त्यामुळे व्यक्तीकडून अनावधनाने त्यांचे केव्हातरी उल्लंघन होते.

उदा. रहदारीचे नियम, निरनिराळे कर व भाडे नियंत्रण कायदा इत्यादी कायदे अस्तित्वात आल्याबरोबर त्यांचे जनतेकडून पालन करवून घेण्यासाठी बराच मोठा नोकरवर्ग नेमण्यात आला. त्यामूळे अनावधानाने एखाद्याकडून कायदेभंग झाल्यास लगेच त्याच्यावर कायदेशीर इलाज केला जातो.

गुन्हेगारीच्या वाढीबाबत विचार करताना त्याचा संबंध इतर काही कारणांशी आहे का हे ही पाहणे जरुरीचे आहे. जसे सुशिक्षीत समाजात अपराधाचे प्रमाण कमी असते असा सर्वसामान्य समाज आहे तसेच नीती व अनीती यांचा अपराधांशी कोठपर्यंत संबंध आहे? सर्व अनैतिक वर्तन प्रकार म्हणजे गुन्हा असे म्हणता येईल का? मग गुन्हा म्हणजे अधर्माचरण असा त्याचा अर्थ होतो का? की गून्हा म्हणजे समाजाला असंमत वर्तन असाही प्रश्न अभ्यासकांना पडतो. म्हणूनच गुन्हा किंवा अपराध म्हणजे काय याबाबत प्रथम माहिती घेणे इष्ट होईल. गुन्हेगारी म्हणजे काय? तसेच गुन्हेगारीचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी पुढील दोन दृष्टिकोणाचा विचार करणे जरुरीचे आहे.

## ७.३ कायद्याच्या दृष्टिने गुन्ह्यांची संकल्पना

कायद्याच्या दृष्टिकोनातून समाजाच्या प्रचलित कायदेशीर दृष्टिकोनातून प्रस्थापित कायद्याच्या विरुद्ध जाणारा व्यक्ति वर्तनाचा कोणताही प्रकार गुन्हा समजला जातो. अर्थात, ही व्याख्या केवळ व्यक्तीच्या वर्तनाचा निर्देश करते, वर्तनामागील हेतूचा नाही, कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतात, त्यामुळे कायद्याविरुद्ध जाणारे कोणतेही व्यक्तीवर्तन गुन्हा या सदरात मोडते. समाजशास्त्रीय दृष्ट्या विचार करता कायद्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेली गुन्ह्याची व्याख्या स्वीकारता येण्यासारखी नाही, कारण -

अ) या व्याख्येप्रमाणे प्रस्थापित कायद्याच्या विरुद्ध जाणारे कोणतेही व्यक्तीवर्तन गुन्हा होऊ शकते. तथापि, कायद्याच्या चौकटीत बसणारे, परंतू समाज विघातक असणारे व्यक्तिवर्तन गुन्हा ठरत नाही.

ब) तसेच किरकोळ स्वरूपाचे गुन्हे व गंभीर स्वरूपाचे गुन्हे यांनी नेमका फरक या व्याख्येतून स्पष्ट होत नाही.

क) त्याचप्रमाणे या व्याख्येद्वारे गून्ह्यांची सातत्याने बदलणारी संकल्पना वास्तव अर्थाने विशद होत नाही, कारण गुन्ह्याच्या संकल्पना वास्तव अर्थाने विशद होत नाही. कारण गुन्ह्याच्या संकल्पनेत वेळोवेळी निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या विभागात आणि एकाच विभागातील प्रदेशांत बदल होत जातात असे दिसून येते.

गून्ह्याचे स्वरुप सर्वत्र सारखे नसते. निरनिराळ्या संस्कृतीमध्ये ते निरनिराळे आढळते. म्हणजेच गुन्ह्याचे स्वरूप स्थलकालसापेक्ष असते. पूर्वीच्या काळी कायदेशीर असणारी एखादी कृती सध्याच्या काळी बेकायदेशीर ठरु शकते किंवा पूर्वीच्या काळी बेकायदेशीर असणारी एखादी कृती सध्याच्या काळी कायदेशीर ठरु शकते. इतकेच नव्हे, तर तिला समाजमान्यताही लाभते. उदा. दारुबंदी. भारतातील काही राज्यांमध्ये मद्यपान हा गुन्हा मानला जातो तर काही राज्यांमध्ये त्यास समाजमान्यता प्राप्त झाली आहे. बहूपत्नी प्रथा आपल्या समाजात एकेकाळी गुन्हा समजला जात नसे, आज तो गुन्हा ठरतो. या भूमिकेतून विचार केल्यास कायद्याच्या दृष्टिकोनातून केलेली गुन्ह्याची व्याख्या समर्पक ठरत नाही. कारण या व्याख्येद्वारा कायद्याच्या विशिष्ट वर्तनप्रकाराचा अथवा कृतींचाच निर्देश केला जातो. लोककल्याणाच्या दृष्टिकोनातून अन्य वर्तन प्रकार ही धोकादायक असू शकतात. परंतू त्यांचा विचार या व्याख्येच्या कक्षेत होत नाही.

कायद्याने गून्हा सिद्ध झाल्यास कायद्यानुसार गुन्हेगार व्यक्तीस शिक्षा दिली जाते. म्हणूनच इलियट व मेरिल यांनी कायद्यांच्या दृष्टिकोनातून कायद्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"गून्हा म्हणजे कायद्याच्या विरुद्ध होणारे वर्तन की, जे केले गेल्यास मृत्यूदंड किंवा कारागृहात किंवा सुधारगृहात किंवा तत्सम जागी डांबून ठेवण्या शिक्षा दिली जाते."

## ७.४ समाजशास्त्रीय दृष्ट्या गुन्ह्याची संकल्पना व व्याख्या

गून्ह्याबाबतचा कायद्याचा दृष्टिकोन आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोन यांत फरक आहे. कायद्याच्या दृष्टिकोनातून प्रस्थापित कायद्याच्या विरुद्ध जाणारे कोणतेही व्यक्तिवर्तन गून्हा ठरते. याउलट, समाजशास्त्रीयदृष्ट्या समाजहितास धोकादायक ठरणारे व्यक्तीचे कोणतेही कृत्य गुन्हा, या सदरात येते. याचाच अर्थ समाजशास्त्रीय दृष्ट्या जे व्यक्तिवर्तन गुन्हेगारी स्वरूपाचे ठरेल ते कायद्याच्या दृष्टिकोनातून तसे ठरेलच असे नाही, कारण समाजकल्याणाला धोकादायक ठरणारे व्यक्तीचे अनेक वर्तनप्रकार कायदेशीर दृष्टिकोनातून शिक्षापत्र ठरतातच असे नाही. उदा. मद्यपान, हे व्यक्ती, कुटुंब, शेजारी व पर्यायाने समाज या सर्वांच्या दृष्टीने विघातक ठरु शकते. परंतू सर्वच समाजात ते कायदेशीर गून्हा ठरत नाही. समाजशास्त्रीयदृष्ट्या गून्हा हा मूलतः सामाजिक नियमांचा भंग असतो. सामाजविघातक असे हे वर्तन असते आणि लोकमतानुसार ते गुन्हेगारी स्वरूपाचे समजले जाते.

**समाजशास्त्रीय दृष्ट्या गून्ह्यांची व्याख्या :**

अमेरिकेतील प्रसिद्ध गून्हाशास्त्रज्ञ डॉ. गिलिन यांनी समाजशास्त्रीय दृष्ट्या गून्ह्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

"गून्हा ही वस्तूतः समाजविघातक कृती असते किंवा ती कृती समाजविघातक आहे असे दर्शविले जाते किंवा ती कृती समाजविघातक आहे असा समाजातील एका लोकसमूहाचा विश्वास असतो. अर्थात अशा लोकसमूहाला आपला हा विश्वास इतरांवर लादण्याची सत्ता असते, इतकेच नव्हे तर हा लोकसमूह संबंधित व्यक्तीला अशा कृत्याबद्दल निश्चितपणे शिक्षा करु शकतो." - डॉ. गिलिन

"गून्हा हे एक असे दृष्कृत्य आहे की, ज्यामूळे प्रचलित समाज संरचनेला बाधा निर्माण करुन आणि कायद्याचे उल्लंघन करुन सामाजिक व राष्ट्रीय सूव्यवस्थेला धोका निर्माण केला जातो अशा मानवी वर्तनाला 'गून्हा' संबोधले जाते." - प्रा. सर्जेराव बोराडे

"गून्हा हे असे समाजविरोधी वर्तन आहे की ज्या वर्तनास समूहाने नाकारले आणि त्याचबरोबर दंड देण्याची व्यवस्था केलेली असते." - इलियट आणि मेरिल

"समूहाचा किंवा समाजाचा सामाजिक नियम भंग करणारे वर्तन म्हणजे विचल किंवा गून्हा"

वरील व्याख्यांचा विचार करता समाजशास्त्रीय दृष्ट्या 'गून्हा' या संकल्पनेचे पुढील तीन भाग स्पष्ट होतात.

१. समाजकल्याणाच्या दृष्टिकोनातुन व्यक्तीचे एखादे कृत्य किंवा वर्तनप्रकार धोकादायक आहे असा विश्वास निर्माण झाला पाहिजे.
२. ज्या लोकसमूहाकडून असा विश्वास निर्माण होईल त्याला आपले निर्णय इतरांवर लादण्याची सत्ता असली पाहिजे.
३. त्या लोकसमूहाकडून अशा स्वरूपाच्या कृत्यांवर किंवा वर्तनप्रकारांवर निश्चित स्वरूपाची नियंत्रणे घातली गेली पाहिजेत.

या व्याख्येमध्ये एक बाब गृहीत धरलेली आहे की, व्यक्तीचे एखादे वर्तन किंवा कृत्य समाजविघातक ठरु शकते. उदा. मद्यपान, जूगार इत्यादी.

अर्थात, अशा प्रकारचा विश्वास काही एका कारणाने निश्चितपणे निर्माण होतो असे नव्हे, कदाचित, असा विश्वास निर्माण होणे हे सहज प्रवृत्तीनूसार घडत असेल किंवा अशा प्रकारचा विश्वास, रूढी, प्रथा व परंपरा यावर आधारलेला असेल किंवा लोकांच्या स्वतःच्या अनूभवातुन तो निर्माण झाला असेल. उदा. चोरी, मद्यपान याबाबतचे समाजाचे दृष्टिकोन सहज प्रवृत्तीनुसार निर्माण झालेले, प्रथागत किंवा अनुभवसिद्ध असू शकतात.

या संदर्भात सामाजिक कोणत्याही व्यक्तीला अशा प्रकारच्या विश्वासाची सत्या-सत्यता पडताळून पाहता येणार नाही, म्हणजेच असा विश्वास बरोबर आहे की चूक आहे हे शास्त्रीयदृष्ट्या ठरविता येणार नाही.

## ७.५ गुन्हेगारीचे स्वरूप व कारणमीमांसा

भारतामध्ये गून्ह्यांचे स्वरूप इतर देशातील गून्ह्यांच्या स्वरुपासारखेच आहे, साधारणतः खून, मारामारी, लुटालूट, उचलेपणा, खिसे कापणे, फसवणूक, दूसऱ्याच्या मालमत्तेचे अपहरण करणे, भेसळ व बनावट माल निर्माण करुन लोकांना फसविणे, सरकारी वा सार्वजनिक पैशाचा अपव्यय व देशद्रोह इत्यादी निरनिराळ्या प्रकारचे गून्हे देशात सर्वत्र असल्याचे आपण पाहत असतोच.

गून्हेगार जमातीचे लोक पिढीजात गुन्हे करुनच पोट भरीत आहेत असे म्हटल्याने त्यांच्यावर अन्याय होईल, कारण छप्परबंद लोक मूघलकाळात लढाईच्या वेळी झोपड्या व तंबू उभारण्याचे ठेके होत, तर लमाणी लोक धान्य व इतर सामानाच्या वाहतूकीचे ठोके होत, परंतू कालांतराने परिस्थितीत बदल झाला व या लोकांचे वर उल्लेखिलेले पिढीजात धंदे बंद पडले, त्यामुळे चारितार्थ चालविण्याकरिता दूसरे साधन उपलब्ध न झाल्याने त्यांना अपमार्गाने योगक्षेम चालवावा लागला.

आजसूद्धा स्टीलची भांडी जास्त उपयोगात येऊ लागल्यामुळे कल्हई, पिठाच्या गिरण्या निघाल्यामुळे धान्य दळण्यासाठी जाती करणे किंवा टाकविणे, सोन्यावर निर्बंध आल्यामुळे सोनाराचा धंदा करणारे लोक यांचे पिढीजात धंदे मोडकळीस आल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांना उदरनिर्वाहाकरिता नवीन धंद्याकडे वळणे भाग पडत आहे. त्या सर्वांना अर्थार्जनाचा दूसरा सामान्य मार्ग उपलब्ध होतोच असे नाही व ज्यांना तो होत नाही त्यांच्यासमोर आत्महत्या किंवा चोरी इत्यादी उपमार्गाचा अवलंब करण्याशिवाय दूसरा मार्गच नसतो.

गुन्हेगार जमातीवर सरकारने बरीच नियंत्रणे घातली असून त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी एक वसाहत अधिकारी नियुक्त केला आहे. वसाहतीत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला रोज हजेरी द्यावी लागते. त्यांना परवानगीशिवाय वसाहत सोडता येत नाही. तसेच एखादे काम किंवा धंदा पत्करल्यास त्यांना या अधिकाऱ्याला कळवावे लागते. सतत तीन वर्षे चांगली वर्तणूक राहिली व एकही गून्हा केला नाही तर त्या व्यक्तीचे गून्हेगारांच्या यादीतील नाव काढून टाकण्यात येते व ती व्यक्ती सामान्य, नागरिकाप्रमाणे वागू शकते. अशा तऱ्हेने वंशपरंपरागत धंद बसल्यामुळे गून्हेगार बनून उदरनिवाह करणाऱ्या या जमातीना एका जागी राहावयास भाग पाडून चांगले रोजगार मिळवून देऊन त्यांना चांगले शिक्षण देऊन त्यांच्यावर चांगले संस्कार घडवून त्यांना सदाचाराने राहण्यास शिकविण्याचे प्रयत्न होत आहेत.

**गून्हेगारी किंवा अपराधाची कारणमीमांसा :**

**१) भौतिक कारणे :**

भौतिक परिस्थितीचा व्यक्ति विकासाशी अतिनिकटचा संबंध आहे. हवामान, पाऊसपाणी व पिके या सर्वांनी मानवी जीवन नियंत्रित होत असते. जीवनाश्यक सर्व बाबी नैसर्गिक होत असते. जीवनाश्यक सर्व बाबी नैसर्गिक साधनसामग्रीवरच अवलंबून असतात. म्हणून सूपीक प्रदेशातील लोकसंख्या अतिदाट असते. तर बर्फाळ, डोंगराळ व वाळवंटी प्रदेशात ती विरळ असते. आर्थिक व सांस्कृतिक विकास हा नैसर्गिक परिस्थितीशी अत्यंत निगडित असते.

**२) सामाजिक कारणे :**

पृथक व एकसंध समाजात गून्ह्यांचे प्रमाण कमी आढळते. उदा. जनजाती, ग्रामीण विभाग, याउलट, शहरातील समाजरचनेत आढळणाऱ्या विविधतेमुळे गून्ह्यांचे प्रमाण जास्त असते. सांस्कृतिक संघर्ष तीव्र असल्यास समाजात गून्ह्यांचे प्रमाण जास्त असते. तद्वतचे ज्या समाजरचनेत अत्यंत गतिमान परिवर्तन होत असते. तेथेही गून्ह्यांचे प्रमाण जास्त आढळते. स्थानांतरित व्यक्ति व स्थानिक रहिवाशी यांच्या तुलनेत स्थानांतरित व्यक्तीत गून्हेगारीचे प्रमाण जास्त आढळते, कारण आपल्या मूळच्या समाजरचनेप्रमाणे या व्यक्तींचा पिंड तयार झाला

असल्याने स्थानांतर केल्यावर त्या नवीन समाजरचनेशी ते एकरुप होऊ शकत नाहीत. तसेच त्या समाजातील सामाजिक आदर्श मूल्ये व आचार यांचाही गून्ह्यांच्या प्रमाणाशी संबंध असतो.

### ३) जैविक कारणे :

वंश-संक्रमणाचा व गून्ह्याचा संबंध दाखविण्याचा प्रयत्न झाला असून काही व्यक्तीमधील गुन्हेगारी वृत्ती वांशिक असते असेही मत मांडण्यात आले. तथापि, गुन्हेगारी वृत्ती ही आनूवंशिकतेपेक्षा (Bio logical Heredky) सामाजिक वारसाशी (Social Heritage) जास्त संबंधित असल्याचे पुढे सिद्ध करण्यात आले. शरीरात असलेल्या विविध ग्रंथीच्या स्त्रावांवर मनुष्यांचे मनोव्यापार बऱ्याच प्रमाणावर अवलंबून असतात. ग्रंथीच्या कमी-अधिक स्त्रावावर मानसिक विकृती निर्माण होऊन गून्हे घडल्याची अनेक उदाहरणे आहेत. तसेच मानसिक संघर्ष दारुण निराशा, मानसिक विकृती व व्यंग इत्यादीमूळेही गून्हे घडल्याचे आढळते.

व्यक्तीला मानव बनविण्यासाठी अगदी लहानपणापासून विकारवश न होण्याचे शिक्षण दिले जाते तरीही काही लोकांच्या भावना फार लवकर जागृत वा तीव्र होतात. अशी माणसे भावना वेगात कोणतेही कृत्य सारासार विचार न करता व ती दूर्घटना घडल्यानंतर त्यांना पश्चाताप होतो ही एक प्रकारची मानसिक विकृतीच आहे. मानवी जीवनात निवड व तडजोडीला फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यासाठी चटकन निर्णय घेण्याची क्षमता माणसात नसल्यास मनूष्य असमर्थ ठरतो. त्याच्या मनात संघर्ष निर्माण होतो. सतत मानसिक संघर्षामुळे त्याच्या मनावर अतिशय ताण पडतो. या ताणाचा विसर पडण्याकरिता तो दारु पिणे जूगार खेळणे, इत्यादी वाईट व्यसनांमध्ये आपले मन गुंतविण्याचा प्रयत्न करतो व शेवटी व्यसनाच्या आहारी जातो. आई किंवा बायकोशी सतत होणारे भांडणे, सावत्र आई वा बाप यांचा जाच, पती-पत्नीपैकी एकाचे अनैतिक वर्तन किंवा दूष्ट वागणूक इत्यादी अनेक बाबी मानसिक संघर्षाला कारणीभूत ठरतात.

### ४) आर्थिक कारणे :

आत्यंतिक दारिद्र्यामुळे व्यक्ती गुन्हे करते असे म्हटले जाते. कार्ल मार्क्सने भाकरीचा सिद्धांत मांडून असे दाखविले की, सर्व सामाजिक समस्यांचे मूळ आर्थिक विषमतेत आहे. आर्थिक विषमता नष्ट करुन प्रत्येकाला योग्य प्रमाणात चारितार्थांचे साधन मिळाल्यास चोऱ्या, दरोडे, खून व मारामाऱ्या इत्यादी गून्हे होण्याचे कारणच राहणार नाही. तथापि, ही गोष्ट पटण्यासारखी नाही. कारण सर्वच गरीब माणसे व व्यक्ती या गून्हेगार नसतात. तसेच सर्व श्रीमंत व्यक्ती कधीच गून्हे करीत नाहीत असेही नाही. पाश्चात्य देशांत पांढरपेशा वर्गात दिवसेंदिवस वाढत असलेले गुन्हेगारीचे प्रमाण कार्ल मार्क्सच्या सिद्धान्तातातील फोलपणा दाखविते. म्हणुन गरिबीमुळेच नेहमी गून्हे घडतात असे नसून गून्हे घडण्याची शक्यता मात्र वाढते असे म्हणता येईल.

हिंदीत एक म्हण आहे - 'भूका क्या न करता' माध्यान्हीत वेळी पोटात कावळे ओरडू लागले की, सर्व नीती-अनीतीच्या कल्पना व चांगले - वाईट विचार बाजूला सारुन मिळेल त्या मार्गाने पोटाची खळगी भरली जाते. आज आपल्या देशात एकूण लोकसंख्येच्या २/३ लोकांना दोन्ही वेळचे पोटभर योग्य अन्न मिळत नाही हे सर्वश्रूतच आहे. भारताचे दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न दोन हजार रुपयांपेक्षा कमी आहे हे नजरेआड करता येत नाही. जेथे पोटभर अन्न नाही तेथे योग्य निवाऱ्याची सोय अपेक्षिणे योग्य होणार नाही. लहान व अपूरी घरे, उजेड व हवेचा अभाव आणि घरातील एकांताचा अभाव अशा वातावरणात सतत राहाणाऱ्यांच्या मनावर चांगले

संस्कार कसे होणार ? या परिस्थितीमुळे ही माणसे अनेक असाध्य रोगांचे भक्ष्य बनतात. आधीच वाईट असणारी त्यांची शारीरिक व मानसिक स्थिती अधिकच वाईट बनते. त्यामूळे त्यांचे मानसिक संतुलन राहत नाही. या सर्वाचा परिणाम म्हणजे सामाजिक बंधने झुगारुन देऊन मिळेल त्या मार्गाने गरजपूर्ती करण्याचा प्रयत्न केला जातो.

**५) इतर कारणे :**

**अ) घरातील वातावरण :**

घरातील मोठ्या माणसांचे आचरण जर नीतिबाह्य असेल तर साहजिकच इतर त्यांचे अनुकरण करतात. घरात भांडणे, एकमेकांबद्दल द्वेष इत्यादी प्रकार असणे. त्याचप्रमाणे घरातील व्यक्तींच्या आवश्यक गरजा किंवा इच्छा पूर्ण होत नसतील तर त्या व्यक्ती आपल्या गरजा वाममार्गाने पूर्ण करतात.

**ब) वाईट शेजार :**

शेजाराच्या वर्तणूकीचा माणसाच्या मनावर व आचरणावर दूरवर परिणाम होतो. नित्य तेच वर्तन पाहिले तर व्यक्ती नकळत शेजाऱ्यांचे अनुकरण करते. व्यक्तीच्या आयुष्यात तिचा समाजातील ज्या-ज्या क्षेत्रांशी संबंध येतो त्या-त्या ठिकाणी तिचा काही व्यक्तीशी घनिष्ठ संबंध येतो यालाच आपण संगत म्हणतो. प्रत्येक माणसाला थोडेबहुत मित्र नसलेले परवडले परंतु वाईट, दुराचारी, व्यसनी मित्रांची संगत नको कारण अशी गोष्ट लवकर आत्मसात होते व त्यामुळे मनूष्याची अधोगती होते, कूसंगे नासती फळे गोमटी.

**क) रिकामा वेळ :**

प्रत्येक व्यक्ती तिला मिळालेल्या फावल्या वेळेचा कसा उपयोग करते त्यावरुन त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे परीक्षण केले जाते. माणसाला रिकामापणा मिळाले म्हणजे तो नको ते उपद्व्याप करु लागतो. त्या दृष्टीने व्यक्तीचा रिकामपणाचा वेळ एखाद्या चांगल्या उपयुक्त धंद्यामध्ये किंवा खेळामध्ये घालविता येईल असे वातावरण निर्माण करुन प्रत्येक व्यक्तीला त्याकरिता उपयुक्त केले पाहिजे.

**ड) सदोष प्रकृती :**

दूर्दैवाने काही लोकांना जन्मापासुनच एखाद्या शारीरिक दोषाने पछाडलेले असते. काही व्यक्ती निरनिराळ्या रोगांमुळे किंवा अपघातामुळे अपंग वा पंगू होतात. कमी बूद्ध्यांक असणारे लोक यातच मोडतात. शारीरिक वा मानसिकदृष्ट्या या व्यक्ती अपंग किंवा सदोष असल्यामुळे त्या जीवनातील विविध क्षेत्रांत सामान्य माणसांची बरोबरी करु शकत नाहीत. तशी बरोबरी करण्याकरिता किंवा स्वतःचे दोष लपविण्याकरिता या व्यक्ती गुन्हेगारी वृत्तीचा अवलंब करुन जीवन जगण्याचा प्रयत्न करतात.

**इ) मद्यपान :**

दारु, गांजा, भांग व अफू अशा मादक पदार्थाच्या सेवनांची एकदा सवय लागली की ति सोडणे फारच कठीण जाते, या व्यसनापायी मनुष्य स्वतःचे शरीर, संपत्ती, विवेक आणि शील गमावून बसतो. त्याच्या मनावर गून्हेगार प्रवृत्तींचा सहज पगडा बसतो व त्याच्याकडून समाजविघातक कृत्ये घडतात.

munotes.in

**ई) हाव किंवा अधाशीपणा :**

पुष्कळदा सर्व गोष्टी अनुकूल असूनही अनेक लोक संतोषी नसतात. त्यांच्या मनात असंतोषाचे निखारे सदैव धगधगत असतात. त्यामुळे जे स्वतःला मिळाले आहे त्यापेक्षा अधिक मिळविण्याची त्यांची सारखी धडपड चालू असते. परंतू प्रत्येक व्यक्तीच्या शक्ती मर्यादित असतात, पण त्यांच्यामध्ये असलेली हावरट वृत्ती त्यांना स्वस्थ बसू देत नाही. स्वतःच्या आवाक्याबाहेर असणाऱ्या गोष्टी हे लोक अनैतिक मार्गाने प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.

**उ) परोकोटीचा स्वार्थीपणा :**

काही माणसे अत्यंत स्वार्थी असतात आणि स्वार्थाने आंधळी झालेली ही माणसे जगाकडे आपूलकीच्या, सौजन्याच्या किंवा सहकार्याच्या भावनेने पाहू शकत नाहीत, पराकोटीच्या स्वार्थी वृत्तीमुळे त्यांच्याकडून दुसऱ्याला उपसर्ग पोहोचेल अशा घटना घडतात.

**ऊ) आळस व तिरस्कार :**

पुष्कळदा काही लोकांना कष्ट करुन लोकमान्य मार्गाने पैसा मिळविणे आवडत नाही. ही माणसे आळसाचे गुलाम बनलेली असतात. अशा व्यक्ती कमी कष्टात व लोकांना मान्य नसणाऱ्या मार्गांनी पैसा व कीर्ति मिळवितात.

**ए) अज्ञान :**

"अज्ञान हा माणसाचा शत्रू आहे व ज्ञान हा माणसाला लाभणारा तिसरा चक्षू आहे." शिक्षणाने ज्ञान वाढते व माणसाची विचारशक्ती तीव्र होते तसेच अज्ञानाने व अविचाराने व्यक्ती गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहारी गेल्याचे आढळून येते.

बऱ्याचदा "एकदा कानफाट्या, तर जन्मभर कानफाट्या" या नावाने समाज त्या व्यक्तीला कुटूंबाला अथवा जमातीला वागवितो. त्यामुळे अशा लोकांना आदराने किंवा सहानूभूतीने कधीच जगता येत नाही. अर्थातच नाईलाजाने त्यांना, जे लोक आपलेपणाने वागवितात अशाच लोकांच्या सहवासाने जगणे भाग पडते आणि परत हे लोक आपलेपणाने वागवितात. अशाच लोकांच्या सहवासाने जगणे भाग पडते आणि परत हे लोक गुन्हेगार लोकांमध्ये वावरु लागतात. अशा तऱ्हेने गून्हा घडण्यास वर निर्देशिलेली विविध कारणे असतात. मूळातच गुन्हे घडू नयेत व त्यांचे प्रमाण कमी व्हावे म्हणून काही उपाय योजले जातात.

## ७.६ गुन्ह्यांचे वर्गिकरण किंवा प्रवाह

सर्वच गुन्हे एकसारखे नसतात. त्यावरुन विविध कसोट्याच्या आधारे गून्ह्यांचे वर्गीकरण केले जाते. त्यांचे प्रकार समजावून घेतले जातात याबाबतचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे -

**१) गून्ह्यांच्या गांभिर्यावरुन केलेले वर्गीकरण :**

गुन्हेगाराने केलेल्या गून्ह्यांचे गांभिर्य लक्षात घेऊन (अ) गंभीर स्वरुपाचे गुन्हे व (ब) कमी गंभीर स्वरुपाचे गून्हे असे वर्गीकरण केले जाते. खून, प्राणघातक हल्ला, जबरी चोरी, दरोडा, बलात्कार, राजद्रोह, वगैरे गून्हे अत्यंत गंभीर समजले जातात. मृत्यूदंड व तुरुंगवास अशा शिक्षा या प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगाराला दिल्या जातात. तर उचलेगिरी, शिवागीळ व

खिसा कापणे वगैरे गून्हे हे कमी गंभीर मानले जातात व त्यामार्गाने त्यांना सोम्य शिक्षा केली जाते.

देश -कालमानांनुसार गुन्ह्यांची संकल्पना बदलत असते. त्यामुळे गुन्ह्यांचे गांभिर्य ठरविणे ही अवघड बाब आहे. आधुनिक समाजात विवाहबाह्य संबंध ही गंभीर बाब असली तरी आदिवासी समाजात याकडे फारसे गांभिर्याने पाहिले जात नाही.

**२) गून्ह्यापाठीमागील हेतू किंवा उद्दिष्टांवरुन वर्गीकरण :**

गून्हा करताना गुन्हेगाराचा हेतू किंवा उद्दिष्ट विचारात घेऊन वर्गीकरण केले जाते. उदा. राजकीय गुन्हे लैंगिक गुन्हे, धार्मिक गुन्हे वगैरे परंतू अशा प्रकारे केवळ एकाच हेतूने गुन्हे होतात असे म्हणणे हे अशास्त्रीय आहे. फारतर तो हेतू प्रभावी असेल पण त्याचबरोबर त्यात अनेक हेतूही गुंतलेले असतात.

**३) हितसंबंधावर आधारित गून्ह्यांचे वर्गीकरण :**

आधुनिक समाजशास्त्रीय विचारानुसार गून्ह्यांचे वर्गीकरण व्यक्तीच्या हितसंबंधांचा विचार करुन करणे योग्य आहे. समाज हा सतत व्यक्तीच्या हितसंबंधांचे संरक्षण करीत असतो. मालमत्ता, कुटुंबसंस्था व धर्मसंस्था इत्यादीत व्यक्तींच्या हितसंबंधांचा विचार केलेला असतो. साहजिकच, या आधारे गून्ह्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले जाते.

**अ) मालमत्तेविरुद्धचे गून्हे :**

मालमत्तेची आवश्यकता व्यक्तीच्या उदरनिर्वाहासाठी, निवाऱ्यासाठी असते. त्यामूळेच व्यक्तीला सामाजिक सुरक्षितता लाभते व व्यक्तिगत हिताची जपणूकही होत असते. यातूनच समाजाचेही हित सांभाळले जाते. त्यामुळे व्यक्ती व तिची मालमत्ता याविषयीचे हक्क सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी समाजाची आहे. हे हक्क नष्ट करण्याचा कोणताही प्रयत्न. उदा. चोरी, खिसा कापणे, दरोडे, खोटे दस्तऐवज करुन मालमत्ता गिळंकृत करणे, भ्रष्टाचार वगैरे गुन्हा ठरतो. गुन्हेगारास त्यानुसार शिक्षा केली जाते. मालमत्तेविरुद्ध घडणारे गूऩ्हे हा व्यक्तिगत प्रश्न नाही तर तो एक सामाजिक प्रश्न असल्यामुळे सामाजिक सूरक्षितता धोक्यात येते.

**ब) सार्वजनिक शांतता व सूव्यवस्थाविरोधी गुन्हे :**

व्यक्ती व समाजहिताच्या दृष्टिने समाजात शांतता आणि सुव्यवस्था असणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्याशिवाय कुटुंब, राज्य, धर्म, शिक्षण वगैरे विविध सामाजिक संस्थांची कार्ये सुरळीतपणे पार पाडणार नाहीत. समाजाचे स्वास्थ्य व कल्याणच धोक्यात येईल. त्यामुळे राजद्रोह, प्रस्थापित सत्तेविरुद्ध कट यांसारखे राजकीय स्वरूपाचे गुन्हे सार्वजनिक शांततेविरुद्धचे ठरतात व त्यांना शिक्षापात्र गुन्हे समजले जाते. उदा. नक्षलवादी कृत्ये.

**क) कुटुंबसंस्थेविरुद्धचे गुन्हे :**

कुटुंबसंस्था ही एक मुलभूत सामाजिक संस्था आहे. समाजाचा विकास व प्रगती होण्यासाठी समाजाला स्थैर्य प्राप्त होणे आवश्यक आहे. समाजाचे स्थैर्य हे कुटुंब संस्थेच्या स्थैर्यावर अवलंबून असते. म्हणूनच कुटुंबसंस्थेविरोधी जे गुन्हे घडतात त्यांना समाजाकडुन शासन केले जाते. कुटुंबसंस्थेविरोधी घडणाऱ्या गुन्ह्यांची अनेक उदाहरणे देता येतील. उदा.

द्विपत्नीत्वाचा गून्हा, व्यभिचार, मूलांकडे दुर्लक्ष करणे एखाद्याची बायको पळवुन नेणे नवविवाहितेचा छळ करणे इत्यादी.

**ड) नीतीविरोधी गुन्हे :**

काही नैतिक भावना व कल्पना समाजात निर्माण झालेल्या आहेत व या भावनांचे समाज संरक्षण करतो. जी कृती समाजाच्या नैतिक भावनांविरुद्ध घडते त्यास समाज गून्हा ठरवितो व शासन करतो. उदा. चोरी, वेश्यागमन वगैरे.

**इ) समाजाच्या साधनांच्या संरक्षणाविरुद्धचे गुन्हे :**

समाजाच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी व समाजाचे कल्याण करण्यासाठी काही साधनांचे संरक्षण करणे जरुरीचे वाटते. समाजाला भावी पिढीचे कल्याण किंवा प्रगती ही करावयाची असते. यासाठी समाज साधनांचे संरक्षण करतो. म्हणूनच जी कृती समाजातील साधनांच्या संरक्षणाविरोधी घडते, ती कृती गुन्हा समजला जातो. उदा. रेल्वे, बस, इमारतीची हानी, यांचे काही प्रकार पुढीलप्रमाणे पाडले जातात.

**i) नैसर्गिक साधनांच्या संरक्षणाविरुद्धचे गुन्हे :**

नैसर्गिक साधनसामग्रीमध्ये पाणी, इंधन, वायू व जंगलसंपत्ती यांचा समावेश होतो. साधनसंपत्तीचा आकारण खर्च करणे हा गुन्हा समजला जातो.

**ii) नैसर्गिक साधनांच्या संरक्षणाविरुद्धचे गुन्हे :**

लहान बालकांकडे दुर्लक्ष करणे, मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे व त्यांना नितिमत्तेचे शिक्षण न देणे या सर्व गोष्टींना गुन्हा समजले जाते. कारण ही कृत्ये मानवी हिताच्या विरोधी आहेत. उदा. बालक, स्त्री, दलित, आदिवासी विरुद्धचे गुन्हे.

**उ) सार्वजनिक आरोग्याविरुद्धचे गुन्हे :**

सार्वजनिक आरोग्याच्या विरोधी घडणाऱ्या कृतींना गुन्हा समजले जाते. सार्वजनिक आरोग्यासंबंधीच्या नियमांचे पालन न करणे व आजारी माणसाला औषधोपचार न करणे हे दोन्ही सार्वजनिक आरोग्याच्या विरोधी गुन्हे आहेत. समाज अशा गुन्ह्यांना शासन करतो. उदा. प्रदूषण, अन्न भेसळ.

## ७.७ गुन्हेगार पुनर्वसन पद्धती

विसाव्या शतकात गुन्हेगारी समस्येकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहिले जाते. गुन्हेगारांना शिक्षा करणे यापेक्षा समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होण्यावर भर दिला जात आहे. आधुनिक अपराधतज्ज्ञ व समाजशास्त्रज्ञ यांनी याबाबत उपचार पद्धतीचा पुरस्कार केला आहे. उपचार पद्धतीमुळे गुन्हेगार व्यक्तींचे पुनर्वसन करण्यात यावे यावर त्यांनी भर दिला आहे.

**उपचार पद्धती :**

ज्या प्रक्रियेमुळे व्यक्तीला आपल्या जवळील क्षमतेचा व साधनसामग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्यास साहाय्य केले जाते. त्या प्रक्रियेला 'उपचार' असे म्हणतात. गुन्हेगार हा

जन्मतः गुन्हेगार नाही तर परिस्थितीने तो गुन्हेगार बनला आहे. ही परिस्थिती जर दूर केली तर तो देखील सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे जीवन जगू शकेल, एवढेच नव्हे तर समाज व्यवस्थेतील गुन्हेगारीस पोषक घटक दूर केले तर गुन्ह्यांचा प्रभावी प्रतिबंध घेऊ शकेल. तेव्हा गुन्हेगाराला शिक्षेच्या कालावधीत स्वतःचे परिक्षण करुन सुधारण्यासाठी संधी दिली पाहिजे. त्याच्या शारीरिक व बौद्धिक क्षमतेचा विचार करुन त्याला मार्गदर्शन केले पाहिजे. शिक्षेच्या कालावधीत त्याला व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे. त्याचप्रमाणे त्याच्यावर चांगले संस्कार घडविले पाहिजेत, त्यामुळे तो शिक्षेतून मुक्त झाल्यावर त्याला समाजमान्य मार्गाने स्वतःचा उदरनिर्वाह तर करता येईलच, पण त्याचबरोबर त्यालाही गुन्ह्याबाबत घृणा वाटेल, अर्थात, अशा प्रकारचे उपचार करण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञ, सेवाभावी प्रशिक्षित कार्यकर्ते यांची व दीर्घ कालावधीची आवश्यकता असते.

भारतात सन १९२० नंतर गुन्हेगारीच्या प्रतिबंधासाठी उपचार पद्धतीचा अवलंब करण्यात येऊ लागला, गुन्हेगारांचे पुनर्वसन करण्यासाठी तुरुंग सुधारणा मंडळाने (१९१९) केलेल्या बहुतेक शिफारशी सरकारने अमलात आणल्या आहेत. गुन्हेगार तुरुंगात असताना व तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर त्याला सर्वसामान्य माणसाप्रमाणे मानाने, सुखाने जीवन कंठता येणे व त्याच्याकडून समाजविघातक कृत्ये न घडणे म्हणजे त्याचे पुनर्वसन होय. त्याच्या पुनर्वसनासाठी खालील मार्गांचा अवलंब केला जातो.

### १) परिवीक्षा (Probation) :

परिवीक्षा म्हणजे गुन्हेगाराला माफ करणे नव्हे तर गुन्हेगाराची शिक्षा सशर्त स्थगित करणे होय. अपराधशास्त्रज्ञ डॉ. सुंदरलॅंड यांनी परिवीक्षेची व्याख्या करताना म्हटले आहे की, "परिवीक्षा ही अपराध्याला चांगले वर्तन ठेवण्याच्या शर्तीवर शिक्षा तात्पुरती स्थगित करुन मोकळे ठेवण्याची पद्धत आहे. या कालावधीत अपराध्यावर व्यक्तिगत निरीक्षण ठेवून त्याला सदाचरणाने वागता यावे यासाठी शासन सतत मदत करते."

परिवीक्षा ही प्रथमतः बालगुन्हेगारींसाठी अवलंबविण्यात आली. त्यानंतर जे प्रौढ गून्हेगार प्रथमच गुन्हा केलेले आहेत व जे तुरुंगाबाहेर चांगल्याप्रकारे वागण्याची व सुधारण्याची शक्यता आहे अशानाही लागू करण्यात येऊ लागली. परंतु जर परिवीक्षेच्या कालावधीत गुन्हेगाराने दुसरा गुन्हा केला वा त्याला घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन केले तर त्याला ही दिलेली सवलत रद्द केली जाते व त्यास पुन्हा शिक्षा भोगायला लागते. परिवीक्षा ही गुन्हेगारांचे पुनर्वसन व्हावे यासाठी दिली जाते, त्याला सहानुभूती दाखवून त्याला त्याच्या कुटुंबियांशी, मित्रांशी व इतरांशी संबंध ठेवता येतात. तो समाजापासून दूर राहत नाही. त्याच्या कुटुंबांचे विघटन होत नाही. सुधारलेल्या राष्ट्रांत या परिवीक्षा पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर करता येतो.

भारतात १९३७ साली मद्रास व १९३८ साली मुंबई राज्यात परिवीक्षेसंबंधीचा कायदा पास झाला. नंतर तो इतरत्र रुढ झाला. या पद्धतीत असलेल्या तरतूदी पुढीलप्रमाणे -

अ) गुन्हेगाराला काही वेळा नुसती ताकीद देऊन सोडण्याचा अगर चांगल्या तर त्याचा पूर्वतिहास व वय इत्यादींचा विचार करुन न्यायालय त्याला चांगल्या वर्तणूकीसाठी मुक्त करु शकते. त्याच्याकडून या संदर्भात करारपत्र लिहून घेतले जाते. या कराराचा भंग केल्यास त्याला शिक्षा भोगायला भाग पाडले जाते.

ब) विशिष्ट गंभीर गुन्ह्याबाबत शिक्षा झालेल्या गुन्हेगाराने पूर्वी गुन्हा केला नसेल तर त्याचा पुर्वतिहास व वय इत्यादींचा विचार करुन न्यायालय त्याला चांगल्या वर्तणूकीसाठी मुक्त करु शकते. त्याच्याकडून या संदर्भात करारपत्र लिहून घेतले जाते. या कराराचा भंग केल्यास त्याला शिक्षा भोगायला भाग पाडले जाते.

क) गुन्हेगाराला व्यक्तिगत जामीन द्यावा लागतो. परिवीक्षा अधिकाऱ्यासमोर हजेरी द्यावी लागते. बदललेला पत्ता कळवावा लागतो. बाहेरगावी जाण्याच्या वेळी परिवीक्षा अधिकाऱ्याची परवानगी द्यावी लागते.

ड) परिवीक्षा अधिकारी गुन्हेगाराच्या कौटुंबिक सामाजिक, आर्थिक व मानसिक परिस्थितीसंबंधी माहिती गोळा करतो. परिवीक्षेच्या काळात गुन्हेगाराकडून अटींचे पालन होते की नाही ते पाहतो. त्याचप्रमाणे त्याला कामधंदा मिळवून देणे इतर मदत करणे याही जबाबदाऱ्या पार पाडतो.

### २) अभिवचन (Parole) :

अभिवचन किंवा पॅरोल म्हणजे गुन्हेगाराने शिक्षेच्या जास्तीत जास्त भाग पूर्ण झाल्यानंतर राज्याने मान्यता दिलेल्या एखाद्या संस्थेमार्फत चांगल्या वर्तनाची हमी देऊन अंतिम सुटका होईपर्यंत गुन्हेगाराला मुक्त करणे होय. पॅरोल पद्धतीत गुन्हेगाराला काही शिक्षा भोगून झाल्यानंतर तुरुंगाबाहेर राहून सुधारण्याची संधी दिली जाते. परिविक्षा अधिकारी याबाबत महत्त्वाची भूमिका बजावतो. त्याची तुरुंगातील वर्तणुक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी, त्याच्या मनोवृत्तीत झालेला बदल इत्यादींचा अभ्यास करुन त्याच्या मुक्ततेची शिफारस परिविक्षा अधिकारी न्यायालयाला करतो. ज्या कैद्याचे पुर्ववर्तन चांगले असेल, तुरुंगात त्याची वागणूक चांगली असेल व गुन्हेगारीबद्दल तिटकारा उत्पन्न होऊन त्याला सर्वसामान्य माणसाप्रमाणे शांततापूर्ण जीवन जगण्याची इच्छा असेल तरच त्याला पॅरोलवर सोडले जाते. या मुक्ततेच्या काळात त्याला सरकारी अधिकारी व मान्यताप्राप्त संस्था यांच्या देखरेखीखाली रहावे लागते. परंतु जर पॅरोलवर सुटलेली व्यक्ती अटींचे पालन करीत नसेल, तिला देखरेख नको असेल आणि यास्तव तिचा मुक्त राहण्याचा परवाना रद्द केला असेल तर तिला दिलेली सवलत रद्द होते. पूर्वीची शिक्षा तिला भोगावी लागते, शिवाय जादा दोन वर्षाची शिक्षा किंवा दोन हजार रुपये दंड तिला भरावा लागतो.

### ३) अनुरक्षण सेवा (After - Care - Service):

गून्ह्याबद्दल शिक्षा भोगून झाल्यानंतर त्याचे पुनर्वसन करणे हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे, कारण या काळात त्याच्यापुढे अनेक समस्या उभ्या असतात. जरी त्याने केलेल्या गुन्ह्याबाबत शिक्षा भोगली असली तरी समाजाच्या दृष्टिने तो कलंकितच ठरलेला असतो. त्यामुळे त्याला समाजात मानाने वागविले जात नाही. सरकारी वा खाजगी नोकरी मिळणे कठीण जाते. घर भाड्याने मिळणे, सामान्य माणसाप्रमाणे वागावयास मिळणे कठीण जाते. नातलग व स्नेही इत्यादी पासून देखील वंचित व्हावे लागते. अशाच वेळी खऱ्या अर्थाने त्याचे पुनर्वसन करण्याची नितांत आवश्यकता असते. कारण गुन्हेगारास आलेल्या कटु अनुभवांमुळे तो पुन्हा गुन्हेगारी आयुष्याकडे वळण्याचा संभव असतो. मानसशास्त्रज्ञ, अपराधतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ व समाजसेवक यांनी यासाठी त्याच्या अनुरक्षण सेवेचा प्रश्न महत्त्वाचा मानला आहे.

या काळात त्याला मार्गदर्शन करणे, नोकरीधंदा मिळवून देणे, सेवाभावी व्यक्ती व संस्था यांच्या साहाय्याने आत्मविश्वास मिळवून देणे, समाजात त्याला सामान्य माणसाचे आयुष्य मिळवून देणे हा उपचारात्मक मार्गाचा महत्त्वाचा भाग आहे.

पाश्चात्य व प्रगत देशांत शासनाने यात पुढाकार घेतला आहे, तसेच खासगी सेवाभावी संस्थांनी कौतुकास्पद प्रयत्न केले आहेत. त्यामुळे अनूरक्षण सेवा प्रभावीपणे यशस्वी ठरत आहेत. अधिकाधिक शिक्षामुक्त गुन्हेगारांना त्याचा लाभ घेता येतो. १९२० नंतर भारतात अनूरक्षण सेवा सुरु झाली. आता सर्वच राज्यातून विमूक्त कैदी साहाय्य संस्था स्थापन झाल्या आहेत. जे कैदी मुक्त झाले आहेत पण ज्यांना अनेक कारणास्तव घरी परतणे अशक्य झाले आहे अशांसाठी अनूरक्षण सेवा, वसतिगृहे स्थापन केली आहेत. त्यामुळे ज्या गुन्हेगाराना त्यांचे नातेवाईक व आप्त एवढेच नव्हे तर बायकामुले देखील जवळ करीत नाहीत त्यांना निवारा मिळतो. शासनाने चालविलेल्या वसतिगृहांमूळे गुन्हेगारांच्या पुनर्वसन कार्यक्रमास वेग मिळाला आहे. परंतू याबाबतच सुधारलेल्या देशांच्या मानाने आपण अद्याप मागे आहोत. उत्तर प्रदेश, प. बंगाल व महाराष्ट्रात विमूक्त कैदी साहाय्य संस्था स्थापन झाल्या होत्या. परंतू सरकारी मदत व जनतेची सहानूभूती मोठ्या प्रमाणात मिळाली नाही त्यामुळे या संस्था वाढू शकल्या नाहीत.

### ४) काही उपयुक्त सूचनांचे पालन :

१९५४ साली केंद्रीय समाजकल्याण मंडळाने अनुरक्षण सेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करण्यासाठी काही अभ्यासपूर्ण उपयुक्त सूचना केल्या आहेत. गुन्हेगारांचे समाजात यशस्वी समायोजन करण्यासाठी त्याचे व्यावसायिक पुनर्वसन व सामाजिक पुनर्वसन या दोन्ही संबंधित बाजूंना अनुलक्षून या सूचना केल्या आहेत.

१९५२ साली भारत सरकारने अमेरिकन अपराधतज्ज्ञ डॉ. वॉल्टर सी. रेकलेस यांना भारतात आमंत्रित केले होते. गुन्हेगारांचे पुनर्वसन होण्यासाठी त्यांनी तुरुंगव्यवस्थेत प्रगत उपयांचा अवलंब व परीविक्षा पद्धतीबाबत उदारमतवादाचा अवलंब केला पाहिजे याची शिफारस केली आहे. १९५७ साली तुरुंग महानिरीक्षकांच्या समितीने गुन्ह्यांच्या प्रतिबंध व नियंत्रण, गुन्हेगारांवरील उपचार, अनुरक्षण सेवांना सामाजिक संरक्षणाचेच कार्यक्रम मागण्याची सूचना केली. गुन्हेगारांची देखभाल, शिस्त, धंदेवाईक शिक्षण, उपचार इत्यादींच्याही शिफारशी केल्या आहेत, त्यांची अंमलबजावणी शासनाने मोठ्या प्रमाणात केला आहे. याखेरीज पुनर्वसनासाठी पुढील सूचनांचा अधिक विचार कृतीत आणणे आवश्यक आहे.

#### अ) शिक्षेपेक्षा उपचारास महत्त्व :

तुरुंग हा गुन्हेगारांना शिक्षा भोगण्यासाठी नाही तर उपचार करण्यासाठी आहे. त्याला गुन्हयांबद्दल प्रायश्चित देण्याऐवजी सुधारणा घडवून आणण्यासाठी हा नवीन दृष्टिकोन सर्वांचा बनला पाहिजे.

#### ब) जलद न्यायालयीन चौकशी :

पोलीस तपास, न्यायालयीन सुनावणी व निकालाचे काम इत्यादी बाबी फार रेंगाळतात त्याचा विपरीत परिणाम गुन्हेगाराला भोगावा लागतो. तेव्हा हे कामकाज लवकर निकालात निघावे. शिवाय या काळात गुन्हेगारास काम मिळावे व त्याला त्याचा मोबदला मिळावा.

**क) दंड व शिक्षा :**

गुन्हेगाराने केलेल्या गुन्ह्यांची तीव्रता लक्षात न घेता गुन्हेगाराचे उत्पन्न लक्षात घ्यावे, दंड न भरल्यास अधिक शिक्षा याचा वापर कमी व्हावा.

**ड) अकाली मूक्तता :**

गुन्हेगाराचे तुरुंगातील वर्तन चांगले असेल तर त्याला शिक्षा संपेपर्यंत तुरुंगात डांबू नये त्याची अकाली मुक्तता करावी.

**इ) प्रभावी अनूरक्षण सेवा :**

गुन्हेगारास शिक्षा भोगल्यानंतर समाजात व्यवस्थितरित्या सामावून घेण्यासाठी अनुरक्षण सेवा प्रभावी पाहिजे, नाहीतर तो पुन्हा गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता असते.

**ई) तुरुंगातील सुधारणा :**

तुरुंगातील कैद्यांना देण्यात येणारे अन्न, वैद्यकीय मदत व शिक्षण इत्यादींमध्ये अधिक सुधारणा केली पाहिजे.

**उ) परीविक्षेचा मोठ्या प्रमाणात वापर :**

प्रथम गुन्हा करणाऱ्यांमध्ये सुधारणा होण्याची शक्यता अधिक असते यासाठी शक्यतो प्रथम गुन्हा करणाऱ्यांना परीविक्षेवर सोडावे यासाठी अधिक परीविक्षा अधिकाऱ्यांच्या नेमणूका कराव्यात.

**ऊ) मानसोपचाराची सोय :**

काही गुन्हे हे मानसिक विकृतीमुळे होतात. अशा मानसिकदृष्ट्या दूबळ्या वेड्या व व्यंग असलेल्या व्यक्तींसाठी मानसोपचारांची उत्तम सोय असावी.

**ए) योग्य काम व मोबदला :**

तुरुंगात कैद्यांना आवडणारे व भावी काळात ते करु शकतील असेच काम द्यावे. एवढेच नव्हे तर त्याचा मोबदला / पगार द्यावा त्यामुळे तो ते काम चांगलेच आत्मसात करु शकेल.

## ७.८ पोलीस दल

राज्यातील कायदा व सूव्यवस्था कार्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणजे पोलीस दलाचा उल्लेख करता येईल. सार्वजनिक व्यवस्थेचे रक्षण करणे, गुन्हे रोखणे गुन्हेगारीचा शोध घेणे इत्यादी स्वरूपाची जबाबदारी राज्य पोलीस दलाला पार पाडावी लागते.

भारतीय राज्यघटनेतील तरतूदीनुसार सार्वजनिक व्यवस्था व पोलीस हे राज्यसूचीतील विषय असल्याने त्यासाठी पोलीस दलाच्या यंत्रणेची रचना करण्यात आली, आजची पोलीस यंत्रणा बहुतांशी १८६१ च्या पोलीस कायद्यावर आधारित आहे. पोलीस दलाचे संघटन, कार्यपद्धती व नियंत्रण याकरिता बनविलेले नियम हे क्रिमिनल प्रोसिजर कोड आणि संसदेचे इतर

कायदे यांच्याशी सूसंगत असावेत म्हणून राज्यातील पोलीस दलाचे नियम हे केंद्र सरकारच्या पोलीस दलाच्या नियमांसारखे दिसून येतात. राज्याच्या संपूर्ण पोलीस दलाचा प्रमुख पोलीस महासंचालक किंवा पोलीस महानिरिक्षक असतो. त्याचे राज्यातील संपूर्ण पोलीस यंत्रणेवर नियंत्रण असते.

**जिल्हा पोलीस प्रशासन :**

भारतात जिल्हा हा प्रशासनाचा मुलभूत प्रादेशिक घटक असल्याने जिल्हा पोलीस प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी जिल्हा पोलीस अधिक्षक या जिल्ह्यातील पोलीस दलाच्या मुख्यधिकाऱ्यावर असते. त्याला जिल्हा पोलीस प्रमुख असेही म्हणतात.

**जिल्हा पोलीस अधिक्षकाची कार्ये :**

१. जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करणे.

२. जिल्ह्याच्या पोलीस यंत्रणेवर नियंत्रण ठेवणे.

३. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांची तपासणी व निरीक्षण करणे.

४. जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालणे, त्याकरिता गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती व गुन्हेगार यांना दहशत बसविणे.

५. जिल्ह्यातील इतर पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे, पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविणे.

६. जिल्ह्यात शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्यात जिल्हाधिकाऱ्यांना मदत करणे.

७. जिल्ह्यातील पोलीस दलात शिस्त निर्माण करणे.

८. गून्हे व गुन्हेगार यांचा शोध घेणे.

९. जिल्ह्यातील जनतेच्या मनात पोलीस यंत्रणेबद्दल विश्वासाची भावना निर्माण करण्यासाठी उपाययोजना करणे.

१०. जनता व पोलीस यांच्यातील सहकार्य वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.

११. मंत्री राजकीय नेते व इतर अति महत्त्वाच्या व्यक्ती यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे.

१२. न्यायालये व वरिष्ठ अधिकारी यांच्या आदेशांचे पालन करणे.

## ७.९ सारांश

गुन्हा म्हणजे समाजाच्या प्रचलित व्यवस्थेच्या विरुद्ध व्यक्तीने किंवा समुहाने केलेले वर्तन होय. यातील काही गुन्हे परिस्थितीमुळे घडत असतात. साधारणपणे चोरी, मारामारी, खुन, बलात्कार, भ्रष्टाचार वगैरे सारखे गुन्हे घडत असतात. यामुळे समाजातील सामान्य समाज विचलीत होत असतो. गुन्ह्याच्या सिद्धांतानुसार काही गुन्हे जैविक घटक, आर्थिक घटक, भौगोलिक घटक, राजकीय घटक, सामाजिक घटका मुळे ही घडून येत असतात. काही वेळा गुन्हा न करता ही एखाद्या व्यक्तीला गुन्हेगार ठरवून सजा भोगावी लागते तर एखादी व्यक्ती गुन्हा करुनही उजळ माथ्याने समाजात वावरत असते. असा गुन्हा ही समाजातील प्रवृत्ती नेहमी

नियंत्रीत करण्यासाठी नियम व कायदे केले जातात. याकरिता भारतीय संविधानाने काही कायदे ठरवून दिलेले आहेत. गुन्हा घडल्यानंतर पोलीस गुन्हेगारास पकडून न्यायालयात हाजर करतात. न्यायालय संबंधित गुन्हा संदर्भातील पुरावे परिस्थिती आणि साक्षीदार, याच्या आधारे गुन्हेगार आहे की नाही ते ठरवले जाते. गुन्हा सिद्ध झाल्यास गुन्ह्या स्वरुपात शिक्षा देऊन जेल मध्ये शिक्षा भोगण्यास पाठवले जाते.

## ७.१० सरावासाठी प्रश्न

१. गुन्ह्याची विविध दृष्टिकोनातून संकल्पना स्पष्ट करुन गुन्ह्यांची कारणमिमांसा करा.

२. गुन्ह्याची व्याख्या द्या आणि विविध गुन्ह्यांचे वर्गीकरण स्पष्ट करा.

३. भारतीय समाजातील गुन्हेगारांचे पुनर्वसन पद्धती चर्चा करा.

४. थोडक्यात टिपा लिहा.

   १) गुन्ह्यांची संकल्पना

   २) गुन्हेगारीचे स्वरूप

   ३) पोलीस दल

## ७.११ संदर्भ सुची

१. डॉ. प्रदीप आगलावे भारतीय समाज संरचना आणि समस्या (२००३) साईनाथ प्रकाशन, नागपुर

२. सर्जेराव बोराडे, डॉ. प्रदीप गांगुर्डे, भारतीय समाजातील समकालीन मुद्दे, २०१७, निराली प्रकाशन, मुंबई.

३. Vibhute K.L; Criminal Justice : A human right perpective of the criminal justice process in India : ISBN 2004.

❖❖❖❖

# ८

# लोकांचे हक्क आणि कर्तव्ये आणि गुन्हेगारी न्याय व्यवस्थेत सुधारणांची गरज

घटक रचना :


८.० उद्दिष्टे
८.१ ओळख
८.२ संवैधानिक अधिकार आणि कर्तव्ये
८.३ मूलभूत कर्तव्ये
८.४ भारतीय दंडसंहिते अंतर्गत अधिकार आणि कर्तव्ये
८.५ फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत अधिकार आणि कर्तव्ये
८.६ फौजदारी न्याय व्यवस्थेत सुधारणांची गरज
८.७ निष्कर्ष
८.८ सारांश
८.९ प्रश्न
८.१० संदर्भ


## ८.० उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांना संवैधानिक अधिकार आणि कर्तव्यांचा परिचय करुन देणे
- भारतीय दंडसंहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहितेतील विविध अधिकार आणि कर्तव्ये जाणून घेणे
- फौजदारी न्याय व्यवस्थेचे मूल्यांकन करणे
- फौजदारी न्याय व्यवस्थेत सुधारणा सुचवणे

## ८.१ ओळख

स्वातंत्र्यानंतर गुन्हेगारी न्याय प्रशासनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे अपेक्षित होते, ज्यामध्ये लोक एक कार्यक्षम आणि प्रभावी यंत्रणा बनवण्यासाठी सहकार्य करतील. त्याचप्रमाणे,फौजदारी न्याय अधिकाऱ्यांकडून लोकांबद्दल आणि त्यांच्या समस्यांबाबत दृष्टिकोन बदलणे देखील अपेक्षित होते. मात्र उलटपक्षी,स्वातंत्र्यानंतरच्या काळात गुन्हेगारी कारवायांच्या संख्येत वाढीचे प्रमाण दिसून आले. हे गुन्हे घटनास्थळाच्या आसपासच्या लोकांनी हस्तक्षेप केले असते किंवा पोलिसांना वेळीच कळवले गेले असते तर रोखता येऊ शकतात. तपासात पोलिसांना

मदत करण्यामध्ये अनेक लोकांचा असलेला संकोच आणि साक्षीदारांनी सहकार्य न करण्यामुळे फिर्यादी खटल्यांमध्ये अपयश येणे,यातून हे प्रतिबिंबित होते की लोक गुन्हेगाराची भीती किंवा निव्वळ भ्रष्टाचार अशा अनेक कारणांमुळे या गुन्ह्यांना प्रतिबंधित करण्यात आणि गुन्हेगारांना इच्छित पद्धतीने शिक्षा करण्यास मदत करत नव्हते. गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यामध्ये लोकांनी सक्रिय भूमिका बजवावी,यासाठी त्यांना सक्षम करण्याकरिता कायदे निर्मात्यांनी विविध कायद्यांतर्गत लोकांना मोठ्या प्रमाणात अधिकार आणि कर्तव्ये देऊ केली आहेत. लोकांनी त्यांच्या कायदेशीर हक्कांनी सुसज्ज होऊन,कायदेशीर कर्तव्ये पार पाडण्याच्या त्यांच्या जबाबदाऱ्यांखाली भारताच्या गुन्हेगारी न्याय व्यवस्थेअंतर्गत विशिष्ट भूमिका बजावणे अपेक्षित आहे. लोकांना जागरूक करण्यासाठी त्यासोबतच इतरांचेही ज्ञान अद्ययावत करण्याच्या दृष्टीने,विविध गुन्हेगारी कायद्यांतर्गत लोकांचे महत्त्वाचे अधिकार आणि कर्तव्ये आपण जाणून घेऊया.

## ८.२ संवैधानिक अधिकार आणि कर्तव्ये

लोकांना शांततापूर्ण आणि सन्माननीय जीवन जगण्यास मदत करण्यासाठी,भारतीय राज्यघटनेने "मूलभूत अधिकार" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अधिकारांना मान्यता दिली आहे. मानवी त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असे हे  मूलभूत अधिकार आहेत. मूलतः,घटनेमध्ये लोकांची ही "मूलभूत कर्तव्ये" समाविष्ट नव्हती परंतु नंतर त्या संदर्भात घटनेत तरतुदी करण्यात आल्या. तुमच्या फौजदारी न्यायाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे असे लोकांचे घटनात्मक अधिकार आणि कर्तव्ये खाली नमूद केली आहेत.

- **कायद्यापुढे समानतेचा अधिकार**

कायद्यापुढे समानता म्हणजे कोणतीही व्यक्ती देशाच्या कायद्याच्या वर नाही आणि प्रतिष्ठेची कसलीही पर्वा न करता प्रत्येक व्यक्ती सामान्य कायद्याच्या अधीन आहे तसेच ती सामान्य न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रासाठी उत्तरदायी देखील आहे. सर्व व्यक्ती, अधिकारी आणि खाजगी, श्रीमंत आणि गरीब, नागरिक आणि परदेशी व्यक्ती हे भारतीय प्रदेशात केलेल्या कृत्यासाठी तितकेच जबाबदार आहेत. याचा थेट अर्थ असा आहे की, कोणत्याही व्यक्तीला त्याच्या पार्श्वभूमीची पर्वा न करता त्याने गुन्हा केला किंवा कायदा मोडला तर त्याला शिक्षा होईल. मात्र, संविधान भारताच्या राष्ट्रपती आणि राज्याच्या राज्यपालांच्या बाबतीत काही अपवादांना परवानगी देते, कारण त्यांच्याविरोधात त्यांच्या कार्यकाळात कोणत्याही न्यायालयात कोणतीही गुन्हेगारी कारवाई सुरू करता येत नाही किंवा चालू ठेवली जाऊ शकत नाही.

- **अस्पृश्यतेच्या प्रथेविरोधातील अधिकार**

अनुच्छेद १७ नुसार, अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यात आले आहे आणि कोणत्याही स्वरूपात ती पाळण्यास मनाई आहे. अस्पृश्यतेमुळे उद्भवलेल्या कोणत्याही अपात्रतेची अंमलबजावणी कायद्यानुसार दंडनीय अपराध असेल. संसदेने नागरी हक्क कायदा, १९५५ लागू केला आहे. त्यानुसार, अस्पृश्यतेच्या आधारावर काही कृत्ये गुन्हा म्हणून घोषित केली आहेत आणि त्यासाठी शिक्षा देखील ठोठावण्यात आली आहे.

- **गतकाळाला लागू असणाऱ्या गुन्हेगारी कायद्यांविरोधातील अधिकार**

अनुच्छेद २० (१) नुसार, कायदेमंडळ गतकाळाला लागू असणारा फौजदारी कायदा बनवू शकत नाही. जेणेकरून ज्या व्यक्तींनी त्या कायद्याच्या अंमलबजावणीपूर्वी अशी कृत्ये केली आहेत त्या व्यक्तींवर पूर्वग्रहदूषितरित्या परिणाम होईल.

- **दुहेरी धोक्याविरुद्धचा अधिकार**

कलम २१ (२) च्या तरतुदींनुसार जर एखाद्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला असेल आणि त्याच्यावर आधीच्या कारवाईत शिक्षा झाली असेल तर त्याच्यावर पुन्हा त्याच गुन्ह्यासाठी खटला चालवला जाऊ शकत नाही आणि त्यानंतरच्या कार्यवाहीमध्ये त्याला शिक्षा होऊ शकत नाही.

- **स्वयंदोषाविरुद्ध प्रतिकार करण्याचा अधिकार**

अनुच्छेद २१ मधील कलम तीनमध्ये अशी तरतूद आहे की कोणत्याही गुन्ह्यामध्ये आरोपी असलेल्या कोणत्याही व्यक्तीला स्वत: विरुद्धचा साक्षीदार राहता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की, स्वत: ला दोषी ठरवण्यास भाग पाडण्याविरोधात प्रतिकाराचा दावा करण्यासाठी, असे दिसून आले पाहिजे की जेव्हा व्यक्तीला दोषी विधान करण्यास सांगितले जाते तेव्हा त्याच्यावर औपचारिक आरोप केले गेले आहेत. काही सामान्य चौकशी किंवा तपासावेळी त्याला प्रतिकाराचा दावा करता येत नाही कारण या विधानामुळे नंतरच्या टप्प्यावर आरोप काही होऊ शकतात.

- **जगण्याचा अधिकार आणि वैयक्तिक स्वातंत्र्य**

अनुच्छेद २१ मध्ये अशी तरतूद आहे की कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेखेरीज कोणत्याही व्यक्तीला त्याच्या आयुष्यापासून किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही. याचा अर्थ असा की कायद्याच्या समर्थनाशिवाय कोणत्याही मनुष्याला कोणतीही शारीरिक जबरदस्ती केली जाऊ शकत नाही.

- **अनियंत्रित अटकेविरूद्धचा अधिकार**

अनुच्छेद २२ च्या उपकलम (१) मध्ये अशी तरतूद आहे की अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीला माहिती दिल्याशिवाय कोठडीत ठेवण्यात येणार नाही तसेच शक्य तितक्या लवकर, अशा अटकेच्या पार्श्वभूमीवर त्याला त्याच्या पसंतीच्या कायदेशीर वकीलाकडून सल्लामसलत करण्याचा तसेच बचाव करण्याच्या अधिकाराला नकार दिला जाणार नाही. अनुच्छेदाच्या उपकलम (२) नुसार, अटकेच्या ठिकाणाहून दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात नेईपर्यंतच्या प्रवासाचा कालावधी वगळता अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या कालावधीत दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करणे बंधनकारक आहे. दंडाधिकाऱ्याच्या अधिकाराव्यतिरिक्त अशा अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या दरम्यान कोठडीत ठेवण्यात येणार नाही.

- **शोषणाविरुद्धचा अधिकार**

घटनेने समाजातील दुर्बल घटकांचे इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा राज्याद्वारे शोषण रोखण्यासाठी काही तरतुदी केल्या आहेत. अनुच्छेद २३ ने मानवांच्या शोषणाविरूद्ध सुरक्षा प्रदान केली आहे. या अनुच्छेदातील तरतुदींच्या अनुषंगाने, संसदेने बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६ लागू केला आहे, जो जबरदस्तीची श्रम व्यवस्था रद्द करतो आणि गुन्हेगारांना शिक्षा सुचवतो.

**तुमची प्रगती तपासा**

१. मूलभूत अधिकार म्हणजे काय?

_______________

२. कमीतकमी पाच मूलभूत अधिकारांचे विश्लेषण करा.

_______________

## ८.३ मूलभूत कर्तव्ये

जसे आपल्याला काही अधिकार आहेत, त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला काही कर्तव्येही पार पाडावी लागतात. जर एखादा व्यक्ती कर्तव्ये पार पाडण्याबाबत बेजबाबदार असेल, तर तो कोणत्याही अधिकारांसाठी देखील पात्र नाही. नागरिकांनी अनुच्छेद ५१ अ मध्ये नमूद केलेल्या अपेक्षांनुसार वर्तन केले, तर शांततापूर्ण आणि चांगल्या जीवनासाठी आवश्यक असलेल्या परिस्थितीमध्ये नक्कीच गुणात्मक सुधारणा होईल.

दहा मूलभूत कर्तव्यांपैकी तीन अशी कर्तव्ये ज्यांचा फौजदारी न्याय प्रशासनावर थेट परिणाम होतो, ती खालीलप्रमाणे;

१. भारताची सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता टिकवून ठेवणे आणि संरक्षित करणे.
२. धार्मिक, भाषिक आणि प्रादेशिक किंवा विभागीय विविधता ओलांडून भारतातील सर्व लोकांमध्ये सुसंवाद आणि बंधुत्वाच्या भावनेला प्रोत्साहन देणे तसेच स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या पद्धतींचा त्याग करणे.
३. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि हिंसाचार टाळणे.

अशाप्रकारे, राज्यघटनेने लोकांना फक्त मूलभूत अधिकार बहाल केले नाहीत तर तसेच नागरिकांवर काही मूलभूत कर्तव्ये देखील लादलेली आहेत.

## ८.४ भारतीय दंडसंहितेअंतर्गत अधिकार आणि कर्तव्ये

- **खाजगीरित्या बचाव करण्याचा अधिकार**

खाजगीरित्या बचाव करण्याचा अधिकार सांगतो की स्वतःचे रक्षण करणे हे व्यक्तीचे पहिले कर्तव्य आहे. राज्यातील पोलीस सर्वव्यापी नाहीत आणि एखादी व्यक्ती नंतर स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या सरंक्षणासाठी प्रयत्न करू शकते. नागरिक कायद्याला बांधील असला तरीही, कोणत्याही परिस्थितीत त्याने भ्याडपणाने वागावे, अशी कायद्याची अपेक्षा नाही. खाजगीरित्या बचाव करण्याचा अधिकार असे मानतो की जर एखाद्या व्यक्तीवर हल्ला झाला तर तो कायद्याच्या दृष्टीने न्याय्य ठरेल, जर त्याने स्वतःच्या बचावासाठी प्रतिहल्ला केला, मात्र तो अधिकार बचावासाठी जितका अपाय करणे आवश्यक असेल त्याहून अधिक अपाय करता येण्याइतका व्यापक नसतो. मात्र, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की खाजगीरित्या बचाव करण्याचा अधिकार हा गुन्हा करण्यासाठीचे शस्त्र नव्हे तर हा अधिकार केवळ संरक्षणाच्या उद्देशाने आहे. म्हणून हा महत्त्वाचा अधिकार सावधगिरीने आणि विवेकाने वापरला पाहिजे.

- **इतरांचे रक्षण करण्याचे कर्तव्य**

भारतीय दंड संहिता केवळ स्वतःचे संरक्षण करण्याचा अधिकार परिभाषित करत नाही तर इतरांच्या शरीराचे आणि जंगम किंवा स्थावर मालमत्तेचे रक्षण करण्याचे कर्तव्य देखील त्याच्यावर सोपवते. कलम ९७ नुसार, खाजगीरित्या बचाव करण्याच्या अधिकारामध्ये कर्तव्याचाही समावेश केला आहे. कलम ९७ अंतर्गत मनुष्याला इतरांच्या शरीराचे आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी अधिकृत करण्याचा उद्देश हा त्याच्यावर कर्तव्य सोपवणे हा आहे. मात्र, या कलमाद्वारे लादण्यात आलेले कायदेशीर कर्तव्य हे स्वैच्छिक आणि बेशिस्त हुल्लडबाजीसाठी दंडनीय आहे.

## ८.५ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत अधिकार आणि कर्तव्ये

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ हा भारताच्या फौजदारी बाबींमधील एक प्रमुख प्रक्रियात्मक कायदा आहे. जुन्या गुन्हेगारी प्रक्रियेची संहिता, १८९८ च्या जागी अनेक सुधारणा आणणारी आणि गुन्हेगारी प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी सध्याच्या गुन्हेगारी प्रक्रियेची संहिता लागू करण्यात आली. गुन्हेगारी प्रक्रियेची संहिता लोकांना गुन्हेगारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात सहभागी होण्यासाठी अनेक अधिकार आणि कर्तव्ये स्पष्ट करते.

- **दंडाधिकारी किंवा पोलिस अधिकाऱ्याला मदत करण्याचे कर्तव्य**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३७ नुसार, प्रत्येक व्यक्तीला दंडाधिकारी किंवा पोलीस अधिकाऱ्याची मदत करणे आवश्यक आहे. जिला अटक करण्यास प्राधिकृत असेल अशा व्यक्तीला ताब्यात घेण्याच्या कामी अथवा ती निसटून जाण्यास प्रतिबंध करण्याच्या कामी तसेच शांतताभंगास प्रतिबंध किंवा गुन्हेगाराचे दमन करण्याच्या कामी तसेच सार्वजनिक संपत्तीस कोणतीही क्षती पोहोचवण्याच्या प्रयत्नास प्रतिबंध करण्याच्या कामी पोलिसांना मदत करणे आवश्यक आहे.

- **वॉरंट अंमलात आणणाऱ्या व्यक्तीला मदत**

गुन्हेगारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३८ नुसार, जेंव्हा एखादे वॉरंट पोलीस अधिकाऱ्याखेरीज अन्य व्यक्तीने बजवावे म्हणून तिला निर्देशून अधिकाऱ्याखेरीज लिहलेले असेल तेंव्हा, अन्य कोणतीही व्यक्ती, वॉरंट जिला निदेशून लिहलेले आहे ती व्यक्ती जवळपास अन्य अशा, असून वॉरंटच्या अंमलबजावणीचे कार्य करीत असेल तर, तिला अशा वॉरंटच्या अंमलबजावणीच्या कामी वॉरंट बजावणाऱ्यास मदत करू शकेल. या कलमाअंतर्गत सादर केले जाणारे सहाय्यक बंधनकारक नाही.

- **विविक्षित अपराधाची वर्दी देण्याचे कर्तव्य**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९ नुसार, पुढीलपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र अपराध जसे की खून, दंगल, खंडणीसाठी अपहरण, दरोडा, लोकसेवकाकडून फौजदारीपात्र विश्वासघात करण्यासंबंधीचा अपराध, चलनी नोटा व बँक नोटा यांसंबंधीचे अपराध करण्यात आल्याचे किंवा असा अपराध करण्याचा अन्य कोणत्याही व्यक्तीचा उद्देश असल्याचे माहीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीने तात्काळ जवळच्या दंडाधिकाऱ्याला अथवा पोलीस अधिकाऱ्याला अशा कृतीची किंवा उदेशाची वर्दी दिली पाहिजे. इतकी माहिती असलेला व्यक्तीने कोणत्याही वाजवी सबबीच्या अभावी, ती सबब सिद्ध करण्याची जबाबदारी याप्रमाणे माहिती असलेल्या व्यक्तीवर राहील, कायदेशीररित्या त्याचे कर्तव्य पार पाडण्यास बांधील आहे, अन्यथा तो भारतीय दंडसंहितेच्या कलम ११८, १७६ आणि २०२ अंतर्गत दंडात्मक कारवाईस जबाबदार असेल.

- **काही गोष्टींविषयी माहिती देण्याचे कर्तव्य**

फौजदारी गुन्हेगारी प्रक्रियेच्या कलम ४० नुसार, एखाद्या गावाच्या कारभारासंदर्भात नियुक्त केलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याने आणि गावात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने काही बाबींसंदर्भात त्याच्याकडे जी कोणतीही माहिती असेल ती सर्वांत जवळचा दंडाधिकारी किंवा सर्वांत जवळच्या पोलीस अधिकाऱ्यास तात्काळ कळवली पाहिजे. चोरीची संपत्ती स्वीकारणारा किंवा विकणारा व्यक्ती, ठग, जबरी चोर, पळून गेलेला सिद्ध दोषी, कोणताही बिनजामीनी अपराध किंवा भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४४, १४५, १४७ किंवा १४८ अन्वये शिक्षापात्र गुन्हा; कोणताही आकस्मिक किंवा अनैसर्गिक मृत्यू घडून येणे; आणि गुन्हेगारी प्रतिबंधक आदेशाच्या अंमलबजावणीवर परिणाम होण्याची शक्यता असलेली कोणतीही गोष्ट इ. बाबत ही माहिती असू शकते. या कलमांतर्गत टाकण्यात आलेले कर्तव्य बंधनकारक आहे आणि ते योग्यरित्या पार पाडण्यात अपयशी ठरल्यास ती व्यक्ती भारतीय दंडसंहितेच्या कलम १७६ अंतर्गत दंडात्मक कारवाईसाठी जबाबदार असेल.

- **दस्तऐवज किंवा वस्तू हजर करण्याचे कर्तव्य**

फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम ९१ अंतर्गत, प्रत्येक नागरिकांचे हे कर्तव्य आहे की जर कोणत्याही न्यायालयाला किंवा पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला कोणत्याही तपास, खटल्याच्या किंवा इतर प्रयोजनासाठी आवश्यक वाटल्यास कोणतेही दस्तावेज किंवा वस्तू सादर करण्यासाठी न्यायालय समन्स किंवा लेखी आदेश फर्मावू शकते.

- **झडतीस उपस्थित राहण्याचे आणि मुभा देण्याचे कर्तव्य**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०० नुसार, व्यक्तीला झडतीस उपस्थित राहणे आणि साक्षीदार राहणारे बंधनकारक आहे. याच कलमाअंतर्गत असे नमूद आहे की, जर एखादी व्यक्ती सुपूर्द अथवा देऊ केलेल्या लेखी आदेश फर्मावून सुद्धा तिने झडतीला उपस्थित राहण्यासाठी वाजवी कारणाशिवाय नकार दिला किंवा त्याबाबत उपेक्षा केली तर भारतीय दंडसंहितेच्या कलम १८७ अंतर्गत त्या व्यक्तीने गुन्हा केला असल्याचे मानले जाईल.

- **प्रथम माहिती अहवालाची नोंद**

एखाद्या पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याला दखलपात्र गुन्ह्याबद्दल माहिती देणे प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आणि कर्तव्य आहे, असे मानले जाते. दिलेली माहिती पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अंतर्गत नोंदवावी लागते आणि सामान्यतः ती प्रथम माहिती अहवाल म्हणून ओळखली जाते.

- **पोलीस अधिकाऱ्यासमोर हजर राहण्याचे कर्तव्य**

प्रत्येक व्यक्तीचे हे कर्तव्य आहे की त्याने ज्या अधिकाऱ्याने तपास केला असेल अशा पोलिस अधिकाऱ्यासमोर हजर राहावे. एखादी व्यक्ती हे कर्तव्य पार पाडण्यास अयशस्वी झाल्यास आयपीसीच्या कलम १७४ आणि १७९ अंतर्गत ती शिक्षेला जबाबदार राहील.

- **पोलिसांना सत्य सांगण्याचे कर्तव्य**

तपास करणाऱ्या कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६१ अंतर्गत कोणत्याही व्यक्तीची औपचारिकपणे तपासणी करण्याचे अधिकार आहेत. प्रत्येक व्यक्तीने खटल्याशी संबंधित सर्व प्रश्नांची सत्य उत्तरे दिली पाहिजेत. चुकीची माहिती दिल्यास भारतीय दंडसंहितेच्या कलम २०२ आणि २०३ अंतर्गत कारवाई केली जाऊ शकते.

**तुमची प्रगती तपासा**

१. भारतीय दंडसंहितेअंतर्गत असलेल्या अधिकारांचे आणि कर्तव्याचे विश्लेषण करा.

२. फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत कोणते अधिकार आणि कर्तव्ये आहेत?

munotes.in

## ८.६ फौजदारी न्याय व्यवस्थेत सुधारणांची गरज

आपण भारताच्या गुन्हेगारी न्याय व्यवस्थेच्या कामकाजाकडे आधीच पाहिले आहे आणि व्यवस्थेच्या कार्याबाबत अन्वेषण देखील केले आहे. आता त्या कामाला अधिक चालना देण्यासाठी सुधारणा घडवून आणण्याची गरज पाहूया.

- **गुन्हेगारी कायदे सुलभ करा**

जे कायदे कालबाह्य झाले आहेत ते रद्द करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या गुन्हेगारी कायद्यांचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे. ज्या कायद्यांमध्ये बदलांची आवश्यकता आहे त्यामध्ये सुधारणा करा, सद्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणि गुन्हेगारी कारवायांच्या नवीन पद्धतींचा समावेश करण्यासाठी नवीन कायदे करा. कार्यपद्धती सोपी करणे आवश्यक आहे जेणेकरून एक सामान्य नागरिक ती सहजपणे समजून घेऊ शकेल आणि त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी त्या कायद्यांचा वापर करेल.

- **पीडितांना नुकसान भरपाई द्या**

भारतातील गुन्हेगारी न्याय व्यवस्थेअंतर्गत गुन्ह्यातील पीडित हे सर्वात दुर्लक्षित घटक आहेत. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या, कलम ३५७ अंतर्गत काही विशिष्ट परिस्थितीत पीडितांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद असली तरी, सध्या पीडितांना भरपाई देण्याची प्रथा फारशी प्रचलित नाही. ज्याला काही वर्षे लागू शकतात अशा खटल्याच्या निकालाची वाट न पाहता पीडिताला नुकसानभरपाईची रक्कम दिली गेली पाहिजे आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे आरोपी दोषी आहे की नाही याची पर्वा न करता पीडिताला नुकसानभरपाई मिळाली पाहिजे.

- **भेदभाव हा गुन्हा म्हणून घोषित करा**

राज्यघटनेच्या अनुच्छेद १५ मध्ये धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव करण्यास मनाई आहे. भेदभाव हा कायद्यानुसार दंडनीय गुन्हा घोषित करण्यासाठी संविधानाच्या अनुच्छेद १५ मध्ये सुधारणा केली जावी असे सुचवले आहे. जेणेकरून भेदभावाने पीडित लोक ज्यांनी भेदभाव केला आहे त्यांच्याविरुद्ध तक्रार नोंदवण्यासाठी पोलिसांकडे धाव घेऊ शकतील. कारण अनुच्छेद १५ हे खाजगी नागरिक तसेच राज्याच्या भेदभावाच्या कृतींविरूद्धचे संरक्षण आहे. या कायद्यात समाविष्ट असलेल्या अधिकारांचा गैरवापर होण्याची शक्यता टाळण्यासाठी सरकारी नोकरांविरोधात आरोपपत्र भरण्यापूर्वी किंवा अटक करण्यापूर्वी सरकारची पूर्व परवानगी यासारखे संरक्षणे आवश्यक आहेत. या व्यतिरिक्त, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी थेट जबाबदार असणाऱ्या पोलीस विभागाच्या योग्य आणि कार्यक्षम कारभारासाठी पोलिस कायद्यात सुधारणा करणे, पोलिसांची ताकद वाढवणे, पोलिस प्रशिक्षणावर विशेष भर देणे, पोलिसांना वस्ती करण्यास योग्य निवास उपलब्ध करून देणे आणि त्यांची प्रतिमा सुधारणे हे देखील आवश्यक आहे. पोलीस आणि फिर्यादी यांच्यात समन्वय वाढवणे आणि तो कायम राखणे देखील आवश्यक आहे. फौजदारी खटल्यांमध्ये यश मिळवण्यासाठी वकिलांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्यामुळे ते त्यांच्या कामात तज्ञ आणि अधिकारी असणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे वकिलांनी त्यांचे कायदेशीर ज्ञान सखोल करण्यासाठी आणि

त्यांना प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने खटले सादर करण्यास शिकवण्यासाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे. प्रलंबित खटल्यांची वाढती संख्या हा वेगवेगळया न्यायालयांमध्ये न्यायाधीशांच्या अपुऱ्या संख्येचा मोठा परिणाम आहे. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयासह न्यायालयांमध्ये सध्या न्यायाधीशांची संख्या ही एकूण कामाच्या ताणाच्या प्रमाणात नाही. त्यामुळेच न्यायाधीशांची संख्या वाढवणे अत्यंत आवश्यक आहे जेणेकरून कामाचा ताण समप्रमाणात वितरित करता येईल आणि प्रलंबित प्रकरणे सोडवता येतील. कारागृहांमधील गर्दी टाळण्यासाठी उपाययोजना राबवल्या जाव्यात, तुरुंग कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करावे आणि गुन्हेगारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात लोकांना सामील करून घ्यावे. गुन्हेगारांना अटक करण्यात आणि गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यामध्ये यश मिळवण्यासाठी लोकांनी गुन्हेगारी न्याय व्यवस्थेच्या प्राधिकरणाला जागृत करण्यासाठी सहकार्य करणे अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून, लोकांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, त्यांना आपल्या राष्ट्राप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव होण्यास तसेच राज्यघटनेने दिलेले अधिकार समजून घेण्यामध्ये मदत केली पाहिजे. मोहल्ला समित्या, ग्राम संरक्षण पक्ष इत्यादी ऐच्छिक योजनांद्वारे लोकांना विविध संधी उपलब्ध करून देण्यात पोलीस प्रमुख भूमिका राबवू शकतात. लोकांना न्याय देण्यामध्ये निष्पक्षता असेल तर ती गुन्हेगारी न्याय व्यवस्थेवर विश्वास ठेवतात अशा नागरिकांमध्ये दृढविश्वास निर्माण करण्यास मदत करू शकते. जास्त वेळ न लावता योग्य निकालांसह प्रकरणे सोडवणे अत्यंत आवश्यक आहे. जिथे गुन्हेगार अजूनही मुक्तपणे फिरतो अशी बरीच महत्वाची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत आणि अशा प्रकरणांमुळेच गुन्हेगारी न्याय व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. खटले सोडवण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट ठेवून गुन्हेगारी न्याय व्यवस्थेवर लोकांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण सरतेशेवटी, न्याय देण्यास विलंब करणे म्हणजे एकप्रकारे न्याय नाकारल्यासारखेच आहे.

**तुमची प्रगती तपासा**

**१. तुमच्या मते, फौजदारी न्याय व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे का?**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ८.७ निष्कर्ष

भारतीय राज्यघटना, भारतीय दंड संहिता आणि गुन्हेगारी प्रक्रियेच्या संहितेने लोकांना त्यांचे जीवन स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा सुनिश्चित करण्यासाठी आणि संरक्षित करण्यासाठी काही अधिकार आणि कर्तव्ये बहाल केलेली आहेत. लोकांना गुन्हेगारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनात सहभागी होण्यासाठी हे त्यांना मदत करतात. लोकांना न्याय देण्यासाठी आणि गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी गुन्हेगारी न्याय व्यवस्थेने लोकांच्या या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यांनी लोकांना त्यांचे अधिकार वापरण्यापूर्वी त्यांचे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रेरित केले

munotes.in

पाहिजे. सरकारी नोकर नसतानाही लोकांना काही पोलिसी अधिकार प्राप्त होतात आणि तसेच त्यांना पोलिसी कर्तव्ये देखील दिली जातात. ते स्वतःचे शरीर आणि मालमत्ता तसेच इतरांचे शरीर आणि मालमत्ता यांचेदेखील संरक्षण करू शकतात. मात्र, लोक त्यांच्या या अधिकार आणि कर्तव्यांबद्दल फारसे उत्साही दिसत नाहीत. सामान्यतः दिसून येते की, अधिकाऱ्यांकडून सक्ती केल्याशिवाय ते त्यांची कर्तव्ये करण्यास कचरतात. त्यांनी असा संकोच करण्याचे एक कारण म्हणजे गुन्हेगाराची भीती असते किंवा कायद्याबाबत असलेल्या ज्ञानाचा अभाव असतो.

## ८.८ सारांश

भारतीय राज्यघटनेने "मूलभूत अधिकार" म्हणून ओळखले जाणारे काही अधिकार बहाल केले आहेत. मानवी व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ठरतील असे हे मूलभूत अधिकार आहेत. मूलतः, राज्यघटनेमध्ये लोकांची "मूलभूत कर्तव्ये" समाविष्ट नव्हती परंतु नंतर, त्या संदर्भात घटनेमध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. जसे आपल्याला काही अधिकार आहेत, त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला काही कर्तव्येही पार पाडावी लागतात. जर एखाद्याने कर्तव्ये पार पाडण्यामध्ये बेजबाबदारपणा दाखवला, तर तो कोणत्याही अधिकारांनादेखील पात्रठरणार नाही. अनुच्छेद ५१ अ मध्ये नमूद केलेल्या अपेक्षांनुसार नागरिकांनी वर्तन केल्यास, शांततापूर्ण आणि चांगल्या जीवनासाठी आवश्यक असलेल्या परिस्थितींमध्ये गुणात्मक सुधारणा नक्कीच होईल.

## ८.९ प्रश्न

1. मूलभूत अधिकारांचे तपशीलवार वर्णन करा.
2. भारतीय दंडसंहितेअंतर्गत असलेले नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्ये स्पष्ट करा.

## ८.१० संदर्भ


- Chakrabarthi, N.K. (1999). Institutional Corrections in the Administration of Criminal Justice. New Delhi: Deep & Deep Publications Pvt. Ltd.
- Nehad, A. (1992). Police and policing in India. New Delhi: Common Wealth Publishers.
- Raghavan, R. K. (1989). Indian police: Problems, planning and perspectives. New Delhi: Manohar Publication
- Thilagaraj, R., & Varadharajan, D. (2000). ―Probation: Approach of the Indian Judiciary The year book of legal studies (Vol. 23). Chennai: Directorate of Legal Studies
- http://www.legalserviceindia.com/articles/op.htm
- https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/89957/12/13_chaptger%20-v.pdf
- https://www.jatinverma.org/criminal-justice-system


❖❖❖❖

## नमुना प्रश्नपत्रिका

1. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत (100 गुण).
2. सर्व प्रशांना समान गुण आहेत.
3. उजवीकडील आकडे उप-प्रश्नाचे गुण दर्शवतात.

प्रश्न १. खालीलपैकी कोणत्याही 2 प्रश्नांचा प्रयत्न करा (घटक १) 20 गुण

अ

ब

क

प्रश्न २ . खालीलपैकी कोणत्याही २ प्रश्न सोडवा (घटक २) 20 गुण

अ

ब

क

प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही २ प्रश्न सोडवा (घटक ३) 20 गुण

अ

ब

क

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही २ प्रश्न सोडवा (घटक ४) 20 गुण

अ

ब

क

प्रश्न ५. टिपा लिहा (कोणतेही दोन) 20 गुण

अ

ब

क

ड

munotes.in